सोलापूर तरुण भारत
आसमंत



# अमेरिकेचा स्वार्थी खेळ...

**भारताशी आमचे संबंध हे ऐतिहासिक असून, भारत आमचा महत्त्वाचा भागीदार असल्याचे शपथेवर सांगणाऱ्या अमेरिकेने, भारताला पाकिस्तानविरुद्धच्या युद्धस्थितीत पाठिंबा देण्यास नकार दिल्याचा ताजा अहवाल प्रसिद्ध झाला. या अहवालानुसार, पाकिस्तानविरोधात कोणत्याही परिस्थितीत अमेरिका भारताच्या बाजूने उभी राहणार नाही. तसेच पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय पातळीवर अलग करण्यासाठीही सक्रिय भूमिका घेणार नसल्याचे त्यात म्हटले आहे. अर्थात, यावर अमेरिका सरकारच्या वतीने अद्याप कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नसले. तरीही, अमेरिकेची भारताबाबतची आजवरची भूमिका बघता, या अहवालाला नाकारण्याचे धाडस करता येणार नाहीच. अमेरिकेकडून भारत- अमेरिका संबंध 'रणनीतिक भागीदारी'च्या उंचीवर पोहोचल्याचे वारंवार सांगितले जात असताना, हा अहवाल अमेरिकेचे पोटातील दात दाखवणारा ठरतो.**

लक्ष्यवेध
कौस्तुभ वीरकर

इतिहासात डोकावले असता, अमेरिकेची भूमिका भारतासाठी कधीच पूर्णपणे अनुकूल नव्हती. शीतयुद्धकाळात पाकिस्तान अमेरिकेचा विश्वासू लष्करी सहयोगी होता. १९७१च्या 'बांगलादेश मुक्तिसंग्रामा'च्या वेळीदेखील अमेरिकेने उघडपणे पाकिस्तानचा पक्ष घेतला; अगदी अमेरिकी नौदलाच्या सातव्या ताफ्याची हालचाल करून भारतावर दबाव आणण्याचाही प्रयत्न केला. त्यानंतर अफगाणिस्तानातील सोव्हिएतविरोधी युद्धकाळातही अमेरिकेने पाकिस्तानला डोक्यावर घेतले होते. याच काळात पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांचे जाळे अधिक बळकट झाले, ज्याचे परिणाम भारताला भोगावे लागले.

१९६५ च्या भारत- पकिस्तान युद्धामध्ये अमेरिका जरी वरवर तटस्थ राहिली असली, तरीही त्यांनी पाकिस्तानचा अर्थपुरवठा रोखला नव्हता. साधारणतः '९/११'च्या हल्ल्यांनंतर अमेरिकेला दहशतवादाविरोधात लढा उभारण्याचा साक्षात्कार झाला. 'दहशतवादाविरोधी लढा' ही अमेरिकेची अलीकडची अधिकृत भूमिका असली, तरी प्रत्यक्षात पाकिस्तानकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोन नेहमी संदिग्धच राहिला. अमेरिकेच्या विविध अहवालांत पाकिस्तान हा दहशतवादी संघटनांना आश्रय देणारा देश असल्याचे स्पष्टपणे म्हटले असले, तरीही त्या देशावर निर्णायक कारवाई करण्याचे अमेरिकेने कायमच टाळले. दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मात्र अगदी सुस्पष्ट आहे.

भारताचा संघर्ष पाकिस्तान या राष्ट्राशी नसून, त्याच्या भूमीवर कार्यरत असलेल्या दहशतवादी संघटनांविरुद्ध आहे. भारताने अलीकडे केलेल्या कारवाया या दहशतवादी तळांवरच मर्यादित होत्या. पाकिस्तान लष्कराने त्याचा आवाका भारताच्या लष्करी तळापर्यंत वाढवला.

भारतातील दहशतवादी हल्ल्यांमागेही पाकिस्तानस्थित गटांचा हात असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. तरीही, आंतरराष्ट्रीय स्तरावर हा प्रश्न 'भारत-पाकिस्तान तणाव' म्हणून मांडला जातो. परिणामी, दहशतवादाचा मूळ मुद्दा गौण ठरतो आणि दोन्ही देशांना समान जबाबदार धरण्याची सोयीस्कर भूमिका स्वीकारली जाते.

अमेरिकेच्या ताज्या भूमिकेमुळे तिच्या दहशतवादविरोधी धोरणावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जर एखाद्या देशात दहशतवादी संघटनांना आश्रय मिळत असल्याची कबुली स्वतः अमेरिकेच्या अहवालांत दिली जाते, तर त्याच देशाविरोधात ठोस भूमिका घेण्यास ती का कचरते? याचे उत्तर अमेरिकेच्या व्यापक सामरिक हितसंबंधांमध्ये दडलेले आहे.

दक्षिण आशियातील शक्तिसंतुलन राखणे, चीनच्या वाढत्या प्रभावाला आळा घालणे, तसेच इस्लामिक जगतातील राजकीय समीकरणे सांभाळणे या सर्व बाबी अमेरिकेच्या धोरणाला आकार देतात. भारत अमेरिकेची ही भूमिका जाणून आहे. म्हणूनच, अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी, अमेरिकेला रशिया होण्यासाठी भारताचा विश्वास जिंकावा लागेल, असे उत्तर दिले होते. त्यांच्या या वक्तव्यावरूनच अमेरिकेच्या भूमिकेचे यथायोग्य आकलन भारत सरकार करत असल्याचे स्पष्ट होते.

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये मित्र ही संकल्पना भावनिक नसून, हितसंबंधांवर आधारित असते. अमेरिका असो वा अन्य कोणतीही महासत्ता, तिची भूमिका तिच्या राष्ट्रीय हितांनुसारच ठरते. अमेरिकेची आजची भूमिका पाहता, सध्याची भारताची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे अधोरेखित होते.

**आज आपण इंटरनेटवर व्हिडिओ स्ट्रीमिंग, ईमेल पाठवणे, 'क्लाऊड'वर अशा डिजिटल आठवणी साठवणे किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणे असे जे काही करतो, या सगळ्याच्या मागे 'डेटा सेंटर' शांतपणे, अविरतपणे कार्यरत असतात. २४ तास कार्यरत असलेली ही विशाल संरचना आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसत नसली, तरी आधुनिक तंत्रज्ञान जगासाठी ती 'ऑक्सिजन'सारखी अत्यावश्यक ठरली आहे.**

# डिजिटल जगाचा अदृश्य पाया

वेध
गायत्री श्रीगोंदेकर

आज आपण इंटरनेटवर व्हिडिओ स्ट्रीमिंग, ईमेल पाठवणे, 'क्लाऊड'वर अशा डिजिटल आठवणी साठवणे किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणे असे जे काही करतो, या सगळ्याच्या मागे 'डेटा सेंटर' शांतपणे, अविरतपणे कार्यरत असतात. २४ तास कार्यरत असलेली ही विशाल संरचना आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसत नसली, तरी आधुनिक तंत्रज्ञान जगासाठी ती 'ऑक्सिजन'सारखी अत्यावश्यक ठरली आहे. 'एआय'च्या वाढत्या वापरामुळे या क्षेत्राचा विस्तार अभूतपूर्व वेगाने होत असून, गुंतवणूकदारांसह सरकारेही आता याभोवती धोरणे आखत आहेत. नुकताच 'आंतरराष्ट्रीय डेटा सेंटर दिन' साजरा करण्यात आला. दरवर्षी मार्च महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी हा साजरा केला जातो. '७ बाय २४ एक्सचेंज इंटरनॅशनल' या संस्थेच्या पुढाकाराने हा दिवस साजरा केला जात जातो. डेटा सेंटर उद्योगाबद्दल जनजागृती करणे आणि नव्या पिढीला या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रेरित करणे, हा यामागचा उद्देश आहे. विद्यार्थी, व्यावसायिक आणि सर्वसामान्यांना डेटा सेंटरचे महत्त्व व संधी याबाबत माहिती देणे, यावर भर दिला जातो. डिजिटल सेवा, क्लाऊड कॉम्प्युटिंग आणि 'एआय'चा वाढता वापर लक्षात घेता, डेटा सेंटरची गरज वाढत आहे. त्यामुळे या उपक्रमाचा उद्देश डेटा सेंटर कसे कार्य करतात, त्यांची भूमिका काय आहे आणि या क्षेत्रात करिअरच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे लोकांपर्यंत पोहोचवणे, हा आहे. यामुळे कुशल मनुष्यबळाची निर्मिती आणि उद्योगाशी नव्या पिढीचे नाते मजबूत करण्याचा प्रयत्न केला जातो.

(पान ४ वर)



# आखाती पेचप्रसंगामध्ये पाकिस्तानची मध्यस्थी निष्फळ?

लक्ष्यवेध
कौस्तुभ वीरकर



**आखाती युद्ध रोखण्यासंदर्भात इजिप्त, तुर्कीये, सौदी अरब आणि पाकिस्तान या चारही देशांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची बैठक नुकतीच इस्लामाबाद येथे पार पडली. पण, त्यातून अजून काही निष्पन्न झालेले नाही. उलट इराण आणि त्यानंतर इस्रायलनेही भारताने या युद्धात मध्यस्थी करावी, असे म्हटले आहे. त्यानिमित्ताने पाकिस्तानने केलेली मध्यस्थी निष्फळ ठरेल का, याचा आढावा घेणारा हा लेख...**

अमेरिका आणि इस्रायलच्या इराणविरुद्धच्या युद्धाला एक महिना पूर्ण झाला आहे. इस्रायलने 'हिजबुल्ला'विरुद्ध आघाडी उघडून दक्षिण लेबनॉन ताब्यात घेतला आहे, तर डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या वीजनिर्मिती केंद्रांवर हल्ला करण्यासाठी दिलेली मुदत दि. ६ एप्रिलपर्यंत वाढवली असली, तरी त्यापुढील कारवाईसाठी सैन्याची जमवाजमव सुरू केली आहे. सध्याच्या परिस्थितीत मोठे नुकसान झाले असले, तरी इराणचे पारडे जड असल्याचे दिसते. युद्ध सुरू होण्यापूर्वी जगाच्या खनिज तेलाच्या उत्पादनात इराणचा वाटा अवघा एक टक्के होता.

आजच्या घडीला होर्मुझची सामुद्रधुनी इराणच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे, जगातील सुमारे २० टक्के खनिज तेलाचे नियंत्रण इराणकडे आले आहे. दुसऱ्या महायुद्धापासून आखातातील तेलावर अमेरिकेचे नियंत्रण होते. हे नियंत्रण ती सहजासहजी घालवणार नाही. त्यामुळे अमेरिकेकडून सादर करण्यात आलेल्या युद्धविराम प्रस्तावाच्या अटींकडे पाहिल्यास इराणकडून अण्वस्त्र तंत्रज्ञाननिर्मिती प्रकल्प आणि दीर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांचे प्रकल्प गुंडाळणे, इस्रायल आणि आखाती देशांना न धमकावणे, तसेच होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणे अशा अटी आहेत. इराणने शांतता वाटाघाटी सुरू असल्याचे वृत्त फेटाळले असले, तरी इराणकडून व्यक्त करण्यात आलेल्या अपेक्षांमध्ये अमेरिकेने इराणला युद्ध खर्च आणि नुकसानभरपाई देणे, इराणच्या राजवटीवर भविष्यात हल्ले न करण्याचा वायदा करणे, तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीवर इराणचे नियंत्रण मान्य करणे, असे मुद्दे आहेत. दोन्ही देशांच्या अपेक्षांमधली दरी रुंद असताना शांतता वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करणे, हे वाघावर स्वार होण्यासारखे आहे.सध्या ही जबाबदारी इजिप्त, तुर्कीये, सौदी अरब आणि पाकिस्तानने घेतली असून, चारही देशांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची बैठक नुकतीच इस्लामाबाद येथे पार पडली.

सौदी अरब हा आखातातील सर्वात मोठा सुन्नी अरब देश असून, त्याची लोकसंख्या सुमारे तीन कोटी आहे. इराणची लोकसंख्या नऊ कोटींहून अधिक आहे. तुर्कीये आणि इजिप्तची लोकसंख्या इराणपेक्षा जास्त असून, पाकिस्तानची लोकसंख्या सुमारे २५ कोटी इतकी आहे. या वाटाघाटींसाठी पाकिस्तानच्या झालेल्या निवडीमुळे अनेक भारतीयांच्या मनात संताप निर्माण झाला. स्वतः अफगाणिस्तानशी युद्ध लढत असलेला, तसेच इराणच्या अण्वस्त्रनिर्मितीच्या महत्त्वाकांक्षेला मदत करणाऱ्या पाकिस्तानवर अमेरिका विश्वास कसा ठेवू शकते? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी पाकिस्तानच्या भूमिकेत गेल्या चार वर्षांमध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास करायला हवा. २०१५च्या आसपास सौदी अरब आणि संयुक्त अरब अमिरातींनी येमेनवर केलेल्या हल्ल्यात पाकिस्तानने तटस्थ भूमिका घेतल्यानंतर तो आखाती अरब देशांपासून दुरावू लागला. आखाती अरब देशांनी पाकिस्तानी, तसेच इतर देशांतील दहशतवादी संघटनांना स्वतःची जमीन आणि बँका वापरण्यास मज्जाव केला. याच सुमारास तुर्कीये मुस्लीम जगतात प्रभाव वाढवू लागला होता. पाकिस्तानची निर्मिती तुर्कीयेकडून प्रेरणा घेऊन झाली असल्यामुळे पाकिस्तान त्याच्या गळाला लागला. पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान इमरान खानचा अमेरिकेला विरोध होता.

पाकिस्ताननेही भारताप्रमाणे स्वायत्त परराष्ट्र धोरण राबवावे, अशी त्यांची इच्छा होती. पण, हाती भिकेचा कटोरा असलेल्या देशांना स्वायत्तता नसते, हे त्यांना कळले नाही. रशियाने युक्रेनवर आक्रमण करण्यापूर्वी मॉस्कोला जाऊन पुतीन यांना भेटणे इमरानना महागात पडले. पाकिस्तानी लष्कराने इमरानना खुर्चीवरून खाली उतरवून निवडणुका घेतल्या. या निवडणुकीनंतर शाहबाज शरीफच्या नेतृत्वाखालील सरकार स्थापन झाले. कमर जावेद बाजवा निवृत्त झाल्यावर त्यांच्या जागी असीम मुनीर पाकिस्तानचे लष्कर प्रमुख झाले. अमेरिकेतील निवडणुकांमध्ये डोनाल्ड ट्रम्प विजयी झाल्यावर पाकिस्तानचा आपला वनवास संपवून अमेरिकेच्या जवळ जाण्याचा प्रयत्न यशस्वी झाला. ट्रम्प यांचे धंद्यातील भागीदार आणि आताचे विशेष दूत स्टीव व्हिटकॉफ यांच्या मुलाच्या 'क्रिप्टो करन्सी' उद्योगामध्ये एक अब्ज डॉलरची गुंतवणूक करणे, 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांना युद्ध थांबवण्याचे श्रेय देणे, ट्रम्प यांना 'नोबेल शांतता पुरस्कार' मिळण्याची शिफारस करणे आणि ट्रम्प यांच्या 'गाझा शांतता मंडळा'मध्ये सहभागी होणे, अशा निर्णयांमुळे पाकिस्तानने अमेरिकेची मर्जी संपादन केली. याच काळात सौदी अरब आणि संयुक्त अरब अमिरातींमध्ये शीतयुद्ध सुरू झाले. भारत आणि इस्रायलचा कल संयुक्त अरब अमिरातींकडे आहे, हे लक्षात घेऊन सौदी अरबने स्वसंरक्षणासाठी पाकिस्तानसोबत करार केला. जून २०२५ मध्ये इस्रायल आणि अमेरिकेने इराणच्या अण्वस्त्र तंत्रज्ञान प्रकल्पांवर हल्ला केल्यानंतर १२ दिवसांनी युद्धविराम झाला. आता युद्धविरामासाठी १५ मुद्द्यांचा जो मसुदा अमेरिकेने बनवला आहे, त्यातील बरेचसे मुद्दे सप्टेंबर २०२५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेकडून पाकिस्तानमार्फत इराणला देण्यात आले. याच मुद्द्यांवर यावर्षी ओमानच्या मध्यस्तीने अमेरिका आणि इराणमध्ये वाटाघाटी सुरू होत्या. पाकिस्तान आणि इराणमध्ये ९०० किमीहून अधिक सीमा आहे. इराणला अण्वस्त्र तंत्रज्ञान पुरविण्यात पाकिस्तानचाच हात होता. कदाचित, त्यामुळे अमेरिकेने तेव्हा मध्यस्थीसाठी पाकिस्तानची निवड केली असावी. न्यूयॉर्कमधील महत्त्वाच्या जागी पाकिस्तान सरकारच्या मालकीचे रुझवेल्ट हॉटेल आहे. पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने ते विकण्यासाठी पाकिस्तान प्रयत्नशील होते. व्हिटकॉफ यांच्या कंपनीने हे हॉटेल विकत घेऊन त्याचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला आहे.

अमेरिका आणि इराण यांच्यामध्ये वाटाघाटी झाल्यास त्यात पाकिस्तानची भूमिका केवळ निरोप पोहोचवण्याची असणार आहे. दोन्ही देशांमधील अविश्वासात वाढ झाली आहे. अमेरिका वाटाघाटींसाठी बोलावून हल्ला करत असल्याची इराणची मुख्य तक्रार आहे; तर इराण वाटाघाटींचा देखावा उभा करून प्रत्यक्षात अण्वस्त्र आणि दीर्घ पल्ल्याची क्षेपणास्त्रे विकसित करण्याचा प्रयत्न करत आहे. इराणच्या एक तृतियांश अर्थव्यवस्थेवर इस्लामिक 'रिव्हॉल्यूशनरी गार्ड कॉर्प'चा ताबा असून, त्यांना इराणच्या नागरिकांच्या भावनांशी कोणतेही देणेघेणे नाही. परिस्थिती अस्थिर करून त्याचा फायदा उकळण्याचे काम इराणची सध्याची राजवट करते, अशी अमेरिकेची तक्रार आहे. अमेरिकेने आखातात मोठ्या प्रमाणावर सैन्याची जमवाजमव केली असून, ट्रम्प यांनी आपण इराणचे खार्ग बेट जिंकून त्यांचे खनिज तेलापासून मिळणारे उत्पन्न बंद पाडू, अशी धमकी दिली आहे. गरज आहे. अमेरिकेने असे केल्यास इराण आखाती देशांच्या तेल विहिरी, तेलशुद्धीकरण आणि जलशुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ला करण्याची किंवा मग अमेरिकेच्या सैन्यतळांवर ड्रोनद्वारे हल्ले करण्याची भीती आहे. दुसरी शक्यता म्हणजे, अमेरिका इराणच्या लष्करीदृष्ट्या महत्त्वाच्या अशा काही औद्योगिक ठिकाणांवर बॉम्बफेक करून एकतर्फी युद्धविराम घोषित करेल. असे झाल्यास इराणचे होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण राहील. तेल विकणाऱ्या आखाती देशांना किंवा तेल खरेदी करणाऱ्या भारत, चीन, जपान आणि कोरिया यांसारख्या देशांना इराणला खंडणी देऊन व्यापार करावा लागेल. तिसरा पर्याय म्हणजे, अमेरिकेने इराणच्या अटी मान्य केल्यास ट्रम्प यांची जागतिक स्तरावर नाचक्की होईल. नोव्हेंबर २०२६ मधील अमेरिकेतील संसदेच्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाचा एका किंवा दोन्ही सभागृहांमध्ये पराभव होऊ शकेल. पण, दुसरीकडे इराणलाही या नैतिक विजयानंतर देश चालवणे अवघड जाईल. इराणच्या राजवटीने जनतेचा आक्रोश दडपून टाकल्यास पुन्हा एका युद्धाला तोंड फुटेल. अशा परिस्थितीत भारताने आखातातील आपला सहभाग वाढवण्याची गरज आहे.

श्रद्धांजली **विश्वास पाठक**

# पैसा नव्हे प्रेमच महत्त्वाचे!

**रेमंड हा कापड उद्योगातील अग्रणी ब्रँड जागतिक पातळीवर प्रस्थापित करणारे प्रख्यात उद्योगपती पद्मभूषण विजयपत सिंघानिया यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना विनम्र श्रद्धांजली. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या एका वक्तव्यावरून सोशल मीडियात जी उलटसुलट चर्चा सुरू आहे, त्याबद्दल माझे मत व्यक्त करणे गरजेचे वाटते.**

विजयपत सिंघानिया यांचा जन्म व्यापार उद्योगातील प्रतिष्ठित सिंघानिया कुटुंबात झाला. त्यांनी रेमंड या भारतातील प्रख्यात वस्त्रनिर्माण कंपनीचे नेतृत्व केले. त्यांच्या कर्तृत्वामुळे रेमंड हा आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित ब्रँड झाला. त्यांनी रेमंडचा उत्पादन, किरकोळ विक्री आणि निर्यात या क्षेत्रात प्रचंड विस्तार केला. सिंघानिया यांनी मुंबईचे शेरीफ या मानाच्या पदावर काम केले. त्यांना विमान उड्डाणाची आवड होती. त्यांनी विमान उड्डाण आणि बलून उड्डाणाच्या बाबतीत अनेक विक्रम प्रस्थापित केले. ते प्रशिक्षित पायलट होते व त्यांना मानद एअर कमोडोर पदवी मिळाली होती. उद्योग आणि समाजासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा किताब प्रदान केला.

विजयपत सिंघानिया यांचे वैयक्तिक आयुष्य वादळी होते. त्यांनी त्यांच्या मुलाकडे गौतम सिंघानिया यांच्याकडे आपले रेमंड कंपनीतील मालकीचे सर्व शेअर्स हस्तांतरित केले होते. त्यानंतर गौतम सिंघानिया यांच्याकडे कंपनीची सूत्रे आली. विजयपत सिंघानिया यांना कुटुंबात वाईट वागणूक मिळाल्याचे सांगण्यात येते. एकेकाळी रेमंड या जागतिक कंपनीचे प्रमुख व हजारो कोटींच्या मालमत्तेचा मालक असलेल्या या उद्योगपतीला कुटुंबात उपेक्षा झाल्यामुळे रस्त्यावर यावे लागले व जगणे कठीण झाले. त्यांच्याकडे उरलेल्या थोड्या रकमेवर त्यांना गुजराण करावी लागली.

वरील पार्श्वभूमीवर विजयपत सिंघानिया यांनी २०२३ साली बिझनेस टुडे या नियतकालिकाला दिलेल्या मुलाखतीतील त्यांचे वक्तव्य पुन्हा एकदा सोशल मीडियात चर्चेत आले आहे. त्यावेळी त्यांनी म्हटले होते, पालकांना माझे आवाहन आहे की, आपल्या मुलांना आपल्याकडचे सर्व काही देताना काळजीपूर्वक विचार करावा. मी असे म्हणत नाही की मुलांना देऊ नका. माझे एवढेच सांगणे आहे की, तुमच्या मृत्यूनंतरच त्यांना द्या. तुमच्या जिवंतपणी देऊ नका कारण तुम्हाला खूप मोठी किंमत मोजावी लागेल. सिंघानिया कुटुंबात नक्की काय झाले हे बाहेरच्या लोकांना माहिती नाही. त्यामुळे त्याबद्दल न बोललेले बरे. खरे तर कोणच्याही वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलू नये. तथापि, विजयपत सिंघानिया यांनी जाहीर मुलाखतीत कुटुंब संस्थेविषयी केलेल्या वक्तव्याबद्दल आपण बोलू शकतो. मुलांना आपल्या हयातीत सर्व काही देऊ नका, असे त्यांचे म्हणणे होते. अनेकांनी त्यांचे मत उचलून धरले. तथापि, त्याबद्दल माझे वेगळे आहे.



### सनातन पद्धतीत विश्वास महत्त्वाचा

पालक मुलांना वाढवतात. मुलांना जास्तीत जास्त चांगले आयुष्य मिळावे यासाठी धडपडतात. अफाट कष्ट करतात. त्याग करतात. आपल्याला ज्या अडचणींना तोंड द्यावे लागले त्या अडचणी मुलांच्या आयुष्यात नसाव्यात असे पालकांना वाटते. मुलेही लहानपणापासून आपले आईबाप आपल्यासाठी किती कष्ट करत आहेत, हे पाहत असतात. मुलांचे आणि आईबापाचे नाते हे नैसर्गिक प्रेमाचे नाते असते. त्यामध्ये आर्थिक देवाणघेवाणीचा मुद्दा नसतो. आईबाप गरीब असले तरीही मुलांना त्यांच्याबद्दल प्रेम आणि कृतज्ञता असते. मुलांचा आईबापावर पूर्ण विश्वास असतो. लहानपणी तर आपले पालक म्हणतील तेच खरे असे मुलांना वाटते. पालकांनीही मुलांवर भरवसा ठेवला आणि प्रेमाने वागविले तर मुले सहसा कधी विश्वासघात करत नाहीत. अनेकदा मुले मोठी झाली तरी आपल्या आईला किंवा वडिलांना बाहेर काय घडले हे सर्वकाही सांगतात. आपल्या सनातन समाजामध्ये अशीच रीत आहे. पालक मुलांसाठी सर्वस्वाचा त्याग करतात, मुले त्यांना आत्मीयतेने सांभाळतात, पुढे मुले त्यांच्या मुलांसाठी सर्वस्वाचा त्याग करतात. हे सनातन चक्र चालू राहते. आपणा सर्वांसमोर श्रीरामाचा आदर्श आहे. वडिलांच्या वचनपूर्तीसाठी वनवास सोसणाऱ्या श्रीरामाने त्यागाचा आदर्श निर्माण केला आहे.

विजयपत सिंघानिया यांनी मुलाखतीत मुलाला सर्वकाही देण्याच्या विरोधात मत व्यक्त केले. त्यांच्या निधनानंतर सोशल मीडियावर तशीच चर्चा करणाऱ्यांना भारतीय सनातनी वास्तव ध्यानात आले नाही, असे मला नम्रपणे वाटते. आपल्या आसपास पाहा, पालकांचे मुलांसोबतचे नाते हे विश्वासाचे असते. आपण मुलांना प्रेमाने वाढविले, ते आपल्याला म्हातारपणी आधार देतील असे त्यांना खात्रीने वाटते. आपल्या भोवती पाहा, बहुतांश असेच घडताना दिसते. विजयपत सिंघानिया यांच्या बाबतीत जे घडते ते अपवाद आहे, असे माझे मत आहे. अशा अपवादावरून सनातन समाजातील प्रेमाच्या नात्याबद्दल शंका घेणे चांगले नाही. आमचे वडील संघाचे समर्पित स्वयंसेवक होते. मजदूर संघाच्या कार्याला त्यांनी वाहून घेतले होते. ते रेल्वेमध्ये नोकरीला होते. निवृत्तीच्या वेळी त्यांना मिळालेले १ लाख २० हजार रुपये त्यांनी मला आणि माझ्या भावाला दिले. आमच्या आयुष्याच्या सुरुवातीला मदत होईल, असे त्यांना वाटले. वडिलांच्या निवृत्तीनंतर त्यांनी त्यांच्याकडचे सर्व पैसे आम्हाला दिले असले तरी कुटुंबातील कर्ता पुरुष म्हणून त्यांनाच मान होता. पुढे त्यांच्या आजारपणाच्या काळात आम्ही सर्वांनी त्यांची सेवा केली. वैद्यकीय उपचारांचा खर्चही केला. एकदा मी आणि माझ्या भावाने सहज हिशेब केला त्यावेळी ध्यानात आले की, वडिलांच्या उपचारांवर आम्ही १३ लाख रुपये खर्च केले होते.

(पान ४ वर)

# बंगालचे विदारक वास्तव



**प. बंगालमध्ये यंदाही तृणमूल काँग्रेस विरुद्ध भाजप अशी थेट लढत रंगणार असून, दोन्ही पक्षांनी सध्या एकमेकांवर टीकेची झोड उठवली आहे. त्याचाच एक भाग म्हणून नुकतेच भाजपने ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील तृणमूल काँग्रेसच्या १५ वर्षांच्या गैरकारभाराचा, अनागोंदीचा लेखाजोखाच सादर केला. त्याला नाव दिले गेले 'आरोपपत्र.'**

राजकारण **विजय कुलकर्णी**

हा दस्तऐवज केवळ दीदींच्या कारभाराचे जाहीर वाभाडे काढणारा नाही, तर तो प. बंगालचे विदारक वास्तवही जनतेसमोर मांडणारा आहे. खरेतर या आरोपपत्रातले बरेचसे आरोप भाजपने दीदींवर गेल्या कित्येक वर्षांत वारंवार केले. परंतु, त्या सगळ्या आरोपांचा ४० पानी दस्तऐवजच सादर केल्यामुळे दीदींच्या अनागोंदी कारभाराचे कारनामे वाचल्यावर मन अक्षरशः सुन्न होते. म्हणजे, असे एकही क्षेत्र नाही, एकही वर्ग नाही, जो दीदींच्या कारभारामुळे राज्यात समाधानी असेल.

त्यातील दोन ठळक बाबींचा वेध घेतल्यास, त्याची दाहकता आपसूकच जाणवते. एक मुस्लीम तुष्टीकरण आणि दुसरे महिला सुरक्षेचा गंभीर प्रश्न. अल्पसंख्याकांच्या दाढ्या कुरवाळण्यासाठी दीदींनी गेल्या १५ वर्षांत कोणतीही कसर सोडली नाही. पण, त्यातील सर्वांत धक्कादायक बाब जर कुठली असेल, तर ती म्हणजे दीदींनी ज्या ७७ समाजांना 'ओबीसी' दर्जा जाहीर केला, त्यापैकी ७५ समाज हे मुस्लीमधर्मीय आहेत. म्हणजेच, अप्रत्यक्षरीत्या मुस्लिमांनाच 'ओबीसी' दर्जा बहाल करून सरकारी लाभ, आरक्षण लाटण्याचा हा गोरखधंदाच! सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी आपल्या निकालांमध्ये धर्म हा आरक्षणाचा आधार असू शकत नाही, हे स्पष्ट केले आहे. पण, संविधानाला, कायद्याला ज्या बंगालमध्ये वारंवार पायदळी तुडवले जाते, तिथे न्यायिक राजवटीची मुळी अपेक्षा नाहीच. अल्पसंख्याकांसाठी पाच हजार कोटींची आर्थिक तरतूद; तीन हजार, ५०९ 'वक्फ' मालमत्तांना तपासणीतून जाणीवपूर्वक वगळणे आणि २००१-११ दरम्यान मुस्लीम लोकसंख्येची झालेली १०२ टक्के वाढ, हीच दीदींची गेल्या १५ वर्षांतील बंगालसाठीची देण! ज्या राज्याचे गेल्या १५ वर्षांपासून एक महिला मुख्यमंत्री नेतृत्व करतेय, त्याच राज्यात महिलांवरील अत्याचाराने कळस गाठावा, यासारखे नामुष्कीजनक ते दुसरे काय? 'महिलांच्या मसिहा' म्हणून मिरवणाऱ्या ममतादीदींच्या बंगालमध्येच आज महिलांना 'तृणा'एवढेही सुरक्षित वाटत नाही. याचे कारण म्हणजे, तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते आणि त्यांच्या समर्थकांची बेलगाम गुंडगिरी आणि अनिर्बंध दमनशाही. डी. जी. कर रुग्णालयातील महिला डॉक्टरवरील बलात्कार; गेल्या १५ वर्षांत अशा हजारो महिलांची अब्रू बंगालमध्ये लुटली गेली. 'राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागा'च्या २०२३च्या अहवालानुसार, एकूण ३४ हजार, ७३८ महिला अत्याचारविरोधी गुन्हे बंगालमध्ये नोंदवण्यात आले. देशात महिलांवर झालेल्या

(पान ४ वर)



# गुन्हा पालकांचा; शिक्षा मुलांची?

पोरकी पोरं **डॉ. तुषार सावरकर**

आपण गुन्हा आणि शिक्षा याबद्दल बोलतो तेव्हा एक मूलभूत तत्त्व मान्य करतो, शिक्षा ही गुन्हेगाराला मिळते. पण आपल्या न्यायव्यवस्थेच्या आणि समाजाच्या वास्तवात एक विचित्र गोष्ट घडते. गुन्हा पालकांनी केलेला असतो, पण त्याची सावली त्यांच्या मुलांच्या आयुष्यावर पडते. तुरुंगात जन्मलेली किंवा आईसोबत तुरुंगात वाढणारी मुलं हा विषय अधूनमधून चर्चेत येतो. लोखंडी गजांच्या आत वाढणारं बालपण ही कल्पनाच अस्वस्थ करणारी आहे. त्यामुळे तुरुंगातील बालकांसाठी काही सुविधा, नियम आणि मार्गदर्शक तत्त्वांबद्दल चर्चा होते. पण या चर्चेत एक मोठा गट कायम दुर्लक्षित राहतो. ज्या मुलांचे पालक तुरुंगात आहेत, पण जी मुलं बाहेरच्या समाजात वाढत आहेत.

संख्येच्या दृष्टीने ही मुलं खूप जास्त आहेत. त्यांचा संघर्ष मात्र समाजाच्या नजरेत फारसा दिसत नाही. पालक तुरुंगात गेल्यावर मुलांच्या आयुष्यात अचानक अनेक बदल होतात. घरातील कमावणारा सदस्य नसतो, सामाजिक आधार कमी होतो आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुलांच्या आयुष्यात एक मोठी भावनिक पोकळी निर्माण होते. काही मुलं नातेवाईकांकडे वाढतात, काही मुलं बालसंरक्षण संस्थांमध्ये जातात, तर काहींचं शिक्षण आणि दैनंदिन आयुष्यच विस्कळीत होतं. या मुलांसाठी सर्वात मोठा प्रश्न आर्थिक नसतो, तो असतो कलंकाचा. समाजात अजूनही अशी वाक्यं सहज ऐकू येतात- ''त्याचे वडील जेलमध्ये आहेत.'' ''तिची आई कैदी आहे.'' ही वाक्यं केवळ माहिती नसतात; ती अनेकदा मुलांच्या ओळखीवर लादलेला शिक्का बनतात. मुलांनी काहीही चुकीचं केलेलं नसतं, पण त्यांना समाजाच्या संशय आणि उपेक्षेचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत अनेक मुलं स्वतःला वेगळं समजू लागतात, लाज आणि भीतीमुळे स्वतःबद्दल बोलणं टाळतात. या परिस्थितीचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर आणि मानसिक आरोग्यावरही होतो.

काही मुलं शाळा सोडतात, काही मुलं भावनिक तणावामुळे अभ्यासात मागे पडतात, तर काही मुलं समाजापासून दूर राहू लागतात. एका अर्थाने, न्यायव्यवस्थेची शिक्षा अप्रत्यक्षपणे पुढच्या पिढीपर्यंत पोहोचते. तुरुंगात वाढणाऱ्या मुलांचा प्रश्न महत्त्वाचा आहेच; पण तुरुंगाबाहेर वाढणाऱ्या या मुलांचा प्रश्न अधिक व्यापक आहे. कारण त्यांची वेदना दिसत नाही, ती मोजली जात नाही आणि अनेकदा तिची दखलही घेतली जात नाही. याच ठिकाणी राज्यव्यवस्था आणि समाज दोघांचाही प्रश्न उपस्थित होतो.

कैद्यांच्या पुनर्वसनाबद्दल चर्चा होते, पण कैद्यांच्या मुलांच्या संरक्षण आणि पुनर्वसनाबद्दल फार कमी धोरणात्मक विचार दिसतो. या मुलांसाठी समुपदेशन, शैक्षणिक आधार, आर्थिक मदत आणि सामाजिक संरक्षण यासारख्या गोष्टींची गरज असते. काही स्वयंसेवी संस्था अशा मुलांसोबत काम करीत आहेत. त्या मुलांना शिक्षणात मदत करतात, मानसिक आधार देतात आणि कुटुंबीयांशी संपर्क राखण्याचा प्रयत्न करतात. पण ही कामं अजूनही मर्यादित स्वरूपात आहेत. या प्रश्नाला व्यापक सार्वजनिक धोरणाचा भाग बनविण्याची गरज आहे. कारण इथे प्रश्न केवळ काही मुलांचा नाही; तो न्यायाच्या तत्त्वाचा आहे. जर एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला असेल तर त्याला शिक्षा होणं आवश्यक आहे. पण त्या शिक्षेची किंमत एखाद्या निरपराध मुलाला मोजावी लागते, हे वास्तव स्वीकारणं कठीण आहे. न्यायव्यवस्थेचा उद्देश गुन्हेगाराला शिक्षा देणं असतो; त्याच्या मुलांचं बालपण हिरावून घेणं नाही. म्हणूनच या प्रश्नाकडे अधिक संवेदनशील आणि व्यापक दृष्टीने पाहण्याची गरज आहे. अशा मुलांसाठी विशेष शैक्षणिक आणि मानसिक आधार व्यवस्था, कुटुंबीय संपर्क राखण्यासाठी सुलभ प्रक्रिया आणि सामाजिक कलंक कमी करण्यासाठी जनजागृती या गोष्टी आवश्यक आहेत. समाज म्हणून आपण अनेकदा म्हणतो की, मुलं ही देशाचं भविष्य आहेत. त्या भविष्यावर एखाद्या गुन्ह्याची सावली पडू नये, याची जबाबदारीही आपलीच आहे. कारण शेवटी एक साधा प्रश्न उरतो- 'पालकांच्या गुन्ह्याची शिक्षा मुलांनी का भोगावी?'

कथा **नीता खोत**

# बक्षीस



आज अथर्व खूप आनंदात हारेता; जणू काही त्याला स्वर्ग चार बोटच उरली होती. 'मला बक्षीस मिळालं' असं तो सगळ्यांना सांगू लागला. आई-बाबा तसंच दीप्तीलादेखील खूप आनंद होत होता. खरंच आज देशपांडेंच्या घरात आनंदाला उधाण आलं होतं. कारणही तसंच होतं, आज अथर्वला जे बक्षीस मिळालं होतं ते म्हणजे त्याच्या सुप्त गुणांचं कौतुक होतं. प्रत्यक्ष राष्ट्रपतींकडून दिल्लीला २५ जानेवारीला 'बालश्री' पुरस्काराने त्याला सन्मानित करणार होते. अथर्व लहानपणापासूनच हुशार असलेला शाळेतला आणि कुटुंबातलाही सर्वांचा लाडका. त्याचे हस्ताक्षर तर जणू मोत्यांचे दाणेच! प्रत्येक विषयातील त्याची उत्तरपत्रिका बघत राहावी अशीच होती.

विशेष करून मराठी विषयाची अधिकच आवड असल्याने तो मराठी विषयात नेहमीच चांगले गुण घेत असे. त्याला वाचनाची आणि लेखनाची फार आवड होती. अनेक पुस्तक त्याने लहान वयातच वाचून पूर्ण केली होती. अशा सर्वगुणसंपन्न अथर्वला कविता करायची आवड कधी निर्माण झाली, हे त्याचं त्यालाच कळलं नाही. शाळेत मराठीच्या वहीच्या मागच्या पानांवर तो काव्यांची गुंफण करीत असे. ''तू हे काय लिहितोय? अभ्यास कर'' असं कविता लिहिण्यात मग्न अथर्वला त्याच्या वर्गशिक्षिकेने रागावले. त्या वहीतला कागद बाईंनी काढला आणि फाडला. त्याचा बोळा करून डस्टबिनमध्ये टाकला; त्याची वही पण दूर भिरकावली. अथर्वला फार वाईट वाटलं. मी काय केलं म्हणून मॅडमने माझी कविता फेकली, या विचारात निराश झालेला तो काहीच बोलला नाही; मात्र तो कुठेतरी आतल्या आत दुखावला गेला होता. स्वतःला विनाकारण अपराधी समजू लागला. असं असलं, तरी लेखनाचा नाद त्याला काही स्वस्थ बसू देत नव्हता. निसर्गावर एक छानशी कविता त्यानं लिहिली. त्याचं वाचन तो आपल्या वर्गातील मित्रांसमोर करीत होता; त्याच क्षणी त्याच्या वर्गात मराठी विषय शिकविणाऱ्या बाई वर्गात आल्या. सर्वांना त्यांनी बसायला सांगितलं आणि का कोण जाणे पण अथर्व आपली कविता घेऊन धावतच मॅडमजवळ आला. ''काय रे काय लिहिलं आहे दाखव बरं!'' बाई म्हणाल्या. ''मी एक कविता लिहिली.'' ''अरे वा! शाब्बास खूप छान.'' असं म्हणून साने बाईंनी त्याची कविता पूर्ण वर्गासमोर वाचली आणि त्याची पाठही थोपटली. ''किती छान शब्दांची मांडणी केलीस तू अथर्व! पण यात थोडे काही शब्दांचे फेरबदल सांगू का?'' ''हो, नक्की सांगा बाई, मला आवडेल.'' बाईंनी त्याला काही सूचना केल्या आणि बघता बघता एक सुंदर कविता तयार झाली. मुख्य म्हणजे बाईंनीच ती कविता एका नामांकित वृत्तपत्रात प्रसिद्धीलाही पाठवली. ''अथर्व, तुझी कविता पेपरमध्ये छापून आली बरं.'' असे बाईंनी सांगताच अथर्व जाम खुश झाला. घरातल्या सगळ्यांना पेपरमध्ये प्रकाशित झालेली कविता दाखवू लागला. हळूहळू कविता करण्याचा छंदच त्याला जडला. साने बाईंच्या केवळ प्रोत्साहनपर प्रेमळ शब्दांनी अथर्वला नवसंजीवनीच मिळाली. ''बाई, आज मी पुन्हा एक कविता केली.'' ''अरे वा! छान आणि बरं का सर्व छान लिहितो आहेस. अथर्व, एक कविता लेखनाची स्पर्धा पण आहे. या आंतरशालेय स्पर्धेत तू भाग घ्यायलाच हवा.'' ''हो मला खूपच आवडेल. किती छान संधी मिळाली मला!'' ''हो तर, छान संधी आहे. मी तुझं नाव देते हं या स्पर्धेसाठी.'' झालं, अथर्वची स्पर्धेसाठी कविता लेखनाची तयारी सुरू झाली. बघता बघता स्पर्धेचा दिवस उजाडला. सकाळी लवकर उठून अथर्वने शाळेची तयारी केली. स्वरचित कविता त्याने सोबत घेतली अन् साने बाईंसोबतच त्या स्पर्धेला गेला. तिथे प्रत्येकाने आपापल्या कविता सादर केल्या. आता अथर्वचे नाव घेण्यात आले. तसा संपूर्ण आत्मविश्वासाने अथर्व कविता सादर करायला उभा झाला. व्यासपीठावरील मान्यवर आणि परीक्षक त्याच्या सादरीकरणाने फारच खुश झाले. टाळ्यांच्या कडकडाटात अथर्वची कविता उत्तम सादर झाली.

थोड्याच वेळात निकाल घोषित केला आणि प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला अथर्व. खूप आनंद झाला त्याला. म्हणाला, ''खूप धन्यवाद मॅडम, आज मला जे यश मिळाले त्याचे सारे श्रेय तुम्हाला जाते.'' ''नाही रे, तू छान लिहितोस. तुझं अक्षरही सुरेख आहे म्हणजे खरी मेहनत तुझीच. मी फक्त तुला प्रोत्साहन दिलं बस्स!'' असं म्हणून बाईंनी त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. ''असाच मोठा हो, यशस्वी हो आणि लिहीत राहा.'' बाईंचे बोलणे अथर्वनी मनावर घेतले आणि खरोखरच लिहीत सुटला. या स्पर्धेत एका नंतर एक असे राऊंड होते. त्यात प्रत्येक वेळेस अथर्व पहिला नंबरच घेत राहिला आणि सगळ्यात शेवटी या स्पर्धेत शेवटच्या टप्प्यात देश-विदेशातील बाल लेखक-लेखिका सहभागी होणार होत्या. स्पर्धेचे स्वरूप फार व्यापक झाले होते. शेवटचा टप्पा पूर्णत्वास आला होता. प्रत्येकच टप्प्यात अथर्व यशाच्या भराभर पायऱ्या चढायला लागला आणि तो दिवस उजाडला ज्या दिवशी स्पर्धेचा निकाल कळणार होता. शाळेच्या मेलवर अथर्वसाठी निरोप होता की, 'आपल्या शाळेतील अथर्व देशपांडे याला बालश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे.'

(पान ६ वर)

वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

# जीर्ण पाने आणि रसरशीत संस्कृती



गॅस्थेनिसने त्याच्या प्राचीन 'इंडिका' ग्रंथात २३०० वर्षांपूर्वीच्या भारतीय समाजसंस्कृतीचे सूक्ष्म वर्णन केले. हा ग्रंथ जीर्ण आहे, विस्कळीत आहे; पण यात प्राचीन भारतातील समाजसंस्कृतीचा गाभा वर्णन केला आहे. यामुळेच या ग्रंथराजाला भारतीय इतिहासात अतिशय मानाचे स्थान आहे. या ग्रंथाची सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे त्याकाळच्या वर्णव्यवस्थेची व्यवस्थित मांडणी यात केलेली आहे. त्याकाळी सात स्तरांवर वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. पहिल्या स्तरावरील 'तत्त्ववेत्त्यां'पर्यंत फार कमी माणसे पोहोचायची.

पवित्र यज्ञविधी करायला या स्तरावरील माणसांची मदत व्हायची. वर्षाच्या सुरुवातीला राजा सर्व तत्त्ववेत्त्यांची द्वारसभा घ्यायचा. द्वारसभेत तत्त्ववेत्ते राजाला पीकपाणी उत्पादन सुधारणेबद्दल मौलिक सल्ले द्यायचे. पण कोणी चुकीचे मार्गदर्शन केले तर त्याला आयुष्यभरासाठी मौन पाळण्याची आज्ञा केली जायची. जर कोणा तत्त्ववेत्याकडून राजाला मौलिक सल्ला मिळाला तर त्याला बक्षीस म्हणून करमाफी मिळायची. मेगॅस्थेनिसने वर्णन केलेला दुसरा स्तर शेतकऱ्यांचा आहे. मेगॅस्थेनिस त्याच्या नोंदीत म्हणतो, 'शेतात घाम गाळणारे शेतकरी स्वभावाने अतिशय गरीब आणि संयमी आहेत. त्यांना युद्धावर जाण्यापासून सूट दिलेली आहे. त्यामुळे अतिशय शांतपणे ते आपल्या शेतामध्ये पिके काढीत असतात. आपले शेत सोडून ते उगीचच दुसऱ्या गावांमध्ये भटकायला जात नाहीत.' त्यामुळे देशात कितीही घनघोर युद्ध सुरू असू दे, हजारो सैनिक प्राणपणाने लढत असले, तरी भारत देशाचा शेतकरी मात्र मन लावून आपल्या शेतात हिरवे धन उगवित असतो. त्याला देशासाठी लढणाऱ्या सैनिकांवर पूर्ण विश्वास असतो आणि त्यामुळे देशाच्या संपन्नतेत कधी तूट पडत नाही.

देशाची संपूर्ण जमीन ही राजाची मालमत्ता आहे आणि शेतकरी राजा त्याला मिळणाऱ्या एक चतुर्थांश मिळकतीवर समाधानी आहे, असे मेगॅस्थेनिस म्हणतो. मेगॅस्थेनिसने तिसरा वर्ण मेंढपाळ आणि शिकाऱ्यांचा सांगितला आहे. जंगलात शिकार करण्याची याच वर्णातील लोकांना परवानगी होती.

दुष्काळात जनावरांना विकण्याची किंवा भाड्यावर देण्याचीही याच लोकांना मुभा होती. शेतीचे जंगली प्राण्यांपासून रक्षण केल्यामुळे राजा त्यांना त्या बदल्यात धान्य पुरवायचा. तंबूत राहणारे हे लोक भटके जीवन पसंत करायचे. चौथा वर्ण किरकोळ वस्तू विकणारे व्यापारी आणि कामगारांचा होता. यातले काही कामगार फक्त शस्त्रास्त्रे आणि जहाज बांधणीच्या कामात राजाला मदत करायचे. पाचवा वर्ण सैनिकांचा होता. जेव्हा युद्ध नसायचे तेव्हा रिकामपणात सैन्य दारू प्यायचे देखील. पण युद्धाचा प्रसंग आल्यावर ते ताबडतोब राजाच्या आज्ञेनुसार रणांगणावर हजर व्हायचे.

सहावा वर्ग पर्यवेक्षकांचा होता. राज्यात काय चाललंय किंवा सैन्यामध्ये कोणत्या अंतर्गत घडामोडी घडत आहेत, याची खडानखडा माहिती सांगण्याची जबाबदारी या गुप्तहेरांवरती होती. त्यासाठी वेष बदलून ते कोणत्याही जागेत प्रवेश करू शकायचे.

सातवा वर्ग राजाच्या अधिपत्याखालील मनसबदार, नगराधिपती व प्रशासकीय अधिकारी वर्ग यांचा होता. प्रशासन, न्यायालय, महसूल, कर आकारणी इत्यादी सर्व महत्त्वाच्या गोष्टी या सातव्या वर्गाकडे होत्या. एका वर्गातून दुसऱ्या वर्गात जायची त्याकाळी मुभा नव्हती. त्यामुळे वर्णाबाहेर लग्न करण्याची पद्धत त्या काळात नव्हती असे दिसते. काही अधिकारी बाजारपेठ सांभाळायचे आणि काही लष्करी व्यवस्थेकडे लक्ष द्यायचे.

काही अधिकारी नद्यांकडून येणाऱ्या पाण्याच्या समान वाटपाबद्दल योग्य ते निर्णय घ्यायचे तर काहीजण कर आकारणी करायचे. रस्त्यावर विशिष्ट अंतरावर इतर मार्ग आणि अंतरे दाखवण्यासाठी फलक लावले जात. परकीय प्रवाशांना भारताचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून विशेष प्रयत्न केले जात. जर परकीय प्रवासी भारत देशात मरण पावला तर त्याच्या नातेवाईकांना त्याची संपत्ती दिली जाई. त्याचे अंत्यसंस्कार त्याच्या पद्धतीप्रमाणे होत. प्रत्येक जन्ममृत्यूची नोंद दरबारी ठेवण्यात येत असे. बाजारात जुन्या-नव्या गोष्टींची सरमिसळ करण्यास परवानगी नव्हती.

करचुकवेगिरी केली किंवा कर भरण्यामध्ये लबाडी केली तर देहांताची शिक्षा होत असे. नागरी प्रशासनाप्रमाणेच लष्करी प्रशासन अतिशय प्रभावी होते, असे मेगॅस्थेनिसने सांगितले आहे. पायदळ, घोडदळ, लष्करातील हत्ती या सर्वांची विशेष काळजी घेतली जायची. मेगॅस्थेनिसने भारतीय प्रजेला अतिशय मार्मिक शब्दात गौरविले आहे. तो म्हणतो की, भारतीय प्रजा अतिशय काटकसरीने आणि शिस्तीने राहणारी आहे. चोरी हा प्रकार भारतात अस्तित्वात नाहीच. ज्या देशात लिखित कायदा अस्तित्वात नाही, ज्या देशातील बहुतांशी लोकांना लिहितावाचता येत नाही ते लोक कसोशीने कायदा पाळतात, असे मेगॅस्थेनिसने २३०० वर्षांपूर्वी लिहून ठेवले आहे. भारतीय प्रजा अतिशय आनंदात राहते. यज्ञविधींमध्ये फक्त विधीची पूर्तता करण्यासाठी सोमरस घेतला जातो. जेवणात तांदूळ असतो. कोर्टकचेऱ्यांमध्ये ते वेळ घालवत नाही. एकमेकांना प्रामाणिकपणे माहिती देतात. येथील घरांना कड्याकुलपे लावावी लागत नाही.

भारतीयांची एक गोष्ट मात्र मेगॅस्थेनिसला खटकलेली दिसते. ती म्हणजे येथील प्रत्येक जण एकटा जेवतो. एकत्रित हसूनखेळून जेवताना कोणी दिसत नाही. जेवणासाठी समोर तीन पायांचे मेज ठेवले जाते. त्यावर सोनेरी थाळी असते. शिजवलेला तांदूळ आणि त्याच्या अवतीभवती बऱ्याच पदार्थांची मांदियाळी असते. मेगॅस्थेनिस म्हणतो, साधी राहणी असूनही भारतीयांना दागिन्यांचे खूप कौतुक आहे. टेंभुर्णीच्या गुळगुळीत दंडाने ते मालिश करून घेतात. त्यांच्या पोशाखांवर सोन्याचे जरीकाम केले असते. मखमली पोशाखाला माणिकमोत्यांनी मढविलेले असते. चांगले टापटिपीने राहणे आणि सुंदर दिसणे हे प्रत्येक भारतीय स्त्री-पुरुषाला आवडते.

उच्च घराण्याच्या स्त्री-पुरुषांवर सेवक छत्री धरतात. भारतीय प्रजा सत्यवचनी आहे. फक्त वृद्ध आहे म्हणून येथे कौतुक केले जात नाही. पण जर तो वृद्ध माणूस शहाणपणाचे चार शब्द बोलत असेल तर त्याचा मान राखला जातो. येथे बहुपत्नीत्वाची प्रथा आहे. जर एखाद्या कलाकाराच्या हाताला किंवा डोळ्याला इजा केली गेली तर आरोपीला देहांताची शिक्षा आहे. राजाच्या रक्षणासाठी अनेक दासींची नेमणूक केली जाते. राजा दिवसभरात झोपू शकत नाही आणि रात्री त्याचे शयनगृह वारंवार बदलण्यात येते. कारण कधीही आणि कुठेही त्याच्या जिवाला धोका असतो. राजा शिकारीला जातेवेळीचे रोचक वर्णन मेगॅस्थेनिसने केले आहे.

राजाभोवती अनेक शस्त्रधारी स्त्रिया रिंगण करून उभ्या असतात. काही रथांमध्ये असतात, काही घोड्यांवर, हत्तींवर असतात. प्रत्येकीच्या हातात शस्त्र असते. त्या रिंगणाच्या बाहेर अनेक सैनिक हातात बाण रोखून उभे असतात. रस्त्याच्या दुतर्फा कोणी आत येऊ नये म्हणून मजबूत दोऱ्या लावल्या असतात. पण जर चुकून कोणीही स्त्री किंवा पुरुष या दोरीच्या आत आलेच तर त्यांना मृत्युदंडाची शिक्षा फर्मावली जाते. राजासमोर ढोलताशे वाजत असतात. जर खुल्या मैदानातून राजा शिकार करणार असेल तर तो हत्तीवर विराजमान असतो. जंगलात असेल तर आडोशाला जाऊन शिकार करतो. मेगॅस्थेनिसच्या 'इंडिका'वर अनेक इतिहासकारांनी भाष्ये केली. त्यातील तथ्ये तपासून पाहिली.

या परकीय राजदूताचे 'इंडिका' कालौघात एकसंध राहिले नाहीच; पण जे जीर्ण हाती लागले त्यात २३०० वर्षांपूर्वीचे 'पाटलिपुत्र' म्हणजे आत्ताच्या पाटणा शहराचे सुंदर वर्णन व प्राचीन भारतीय संस्कृतीचे अवशेष हाती लागतात.

गंगा व सोन नदीच्या संगमावर वसलेल्या पाटलिपुत्र शहराच्या १८ व्या शतकापासून सुरू झालेल्या उत्खननात मेगॅस्थेनिसच्या 'इंडिका'मधील काही वर्णनांचे निश्चित संकेत मिळाले, हेही नसे थोडके. इतिहासपुरुष कायम मौन धारण करून असतो. त्याच्या मौनाच्या जागांसमोर स्वल्पविराम द्यायचा, कधी उद्गारवाचक चिन्ह तर कधी प्रश्नचिन्ह धरायचे. तेव्हा कुठे मेगॅस्थेनिसने वर्णन केलेले भारतीय संस्कृतीचे रसरशीत अवशेष हाती येऊ पाहतात.

आनंद स्पदंन

डॉ. अविनाश मोहरील

# मावळत्या दिनकरा



या लेखाचा विचार माझ्या मनात अलीबागजवळील काशीद या ठिकाणी समुद्रकिनारी मावळतीचा सूर्य बघत असताना आला. मावळत्या सूर्याला बघून कविवर्य भा. रा. तांबेंची कविता आठवली- 'मावळत्या दिनकरा, अर्घ्य तूज जोडूनी दोन्ही करा!' मावळतीचा तो दिनकर हळूहळू सागरात विलीन होतानाचा तो अपूर्व सोहळा मी मनापासून अनुभवत होतो. सागराच्या लाटा धरणीकडे झेपावत असताना पश्चिम दिशेला पसरलेला रक्तिमा देखणे दृश्य निर्माण करीत होता. खळखळत्या लाटांसोबत सोनेरी प्रकाशाच्या लहरी धरणीकडे झेपावत असल्याचेच वाटत होते. त्या पृष्ठभूमीवर अस्ताला जाणारा सूर्य बघून अकारण मनाला हूरहूर वाटत होती.

पहाटे पूर्व दिशेला उगवून धरतीच्या प्रत्येक रंध्राला सोनेरी करून टाकणारा सूर्य पहाटेच्या कोवळ्या उन्हात आपल्याला निरागसतेचा आनंद देतो. परंतु तोच दुपारी रणरणते ऊन देऊन घाम गाळायलाही लावतो. तोच दिवाकर सायंकाळी अस्ताला जाताना विविध रंगांच्या छटा आसमंतात रेखाटतो आणि त्याचा आनंद देत अस्त पावतो. त्या सुंदर समुद्रकिनारी, त्या शांत संध्याकाळी नारायणाचा हा दिवसाचा संपणारा प्रवास बघताना मला माणसाच्या या जीवनातील प्रवासाबद्दल तीव्रतेने जाणीव झाली. भा. रा. तांबेंनी वर्णन केल्याप्रमाणे प्रत्येक जण उगवत्या सूर्याला वंदन करीत असतो. पण हा सूर्य दिवसभराचे प्रकाश जीवन प्रदान करून अस्ताला जातो तेव्हा मात्र त्याच्या नशिबी उपेक्षा येते.

आपल्या परिवारासाठी, समाजासाठी, संस्थांसाठी खस्ता खाऊन समर्पण केलेले अनेक मानवरूपी दिनकर उपेक्षित राहिलेले मला आठविले. माणसाचे जीवनदेखील सूर्याप्रमाणेच असते. उगवतीच्या वेळी त्याचे मोठ्या थाटात या जगात स्वागत केले जाते. त्याच्या निष्पाप बाललीलांचे कौतुकही केले जाते. परंतु जबाबदारीचे चटके त्याला लागणे सुरू झाल्यावर त्याचा निष्पापपणा गळून पडतो.

अर्थकारणाच्या चक्रामध्ये त्याला सर्व प्रकारचे कौशल्य वापरावे लागतात व त्यामध्ये तो पुरता अडकून जातो. परिवाराची जबाबदारी, कामाची टारगेट्स, स्वप्नपूर्तीसाठीची धावाधाव हे सारे करता करता त्याच्या आयुष्याची तीस वर्षे कशी निघून जातात, हे त्याचे त्यालाही कळत नाही.

या सर्व काळात तो वेगवेगळ्या मानसिक स्थित्यंतरांमधून जातो. कधी त्याची फसवणूक होते, कधी त्याचे प्रेम जडते, कधी त्याला नाकारण्यात येते, कधी तो जिंकतो, कधी त्याचा हक्क डावलण्यात येतो, कधी तो खचून जातो, कधी तो बंड करतो, कधी तो प्राप्तीसाठी कोणत्याही थराला जातो तर कधी आहे ती परिस्थिती स्वीकारून आनंदी राहतो. परंतु हे सारे करीत असताना त्याच्या कुटुंबाचा विचार कायम त्याच्या मनात असतो.

कुटुंबासाठी सर्व खस्ता तो खातो. स्त्री असो अथवा पुरुष दोघेही मिळून संसाराचा गाडा समर्थपणे ओढतात. यामध्ये त्यांना अनेकदा आपल्या इच्छा-आकांक्षा माराव्या लागतात. अनेकदा मनाविरुद्ध तडजोडी कराव्या लागतात. जीवनाचा तो एक महत्त्वाचा भाग आहे, असे समजून आपल्या मुलाबाळांसाठी सारे काही केले जाते. पण हळूहळू आयुष्याची संध्याकाळ येते. मावळत्या सूर्याप्रमाणे आयुष्याचाही उतरणीचा काळ सुरू होतो.

आतापर्यंत सर्व जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊन जीवनाची यशस्वी वाटचाल केल्यानंतर बरेच वेळा मावळतीच्या सूर्याच्या नशिबी जी उपेक्षा येते, तीच यांच्याही वाट्याला येते. काळ निरंतर चालत असला तरी तो बदलत जातो. काळाच्या बदलानुसार जीवनाच्या संकल्पना बदलत जातात. अनेक वर्षे ठरावीक साच्यामध्ये जीवन जगलेल्या या मावळतीच्या सूर्यांना नव्या संकल्पना स्वीकारणे कठीण जाते आणि तेथूनच संघर्षाला सुरुवात होते.

नव्याने तळपणारे सूर्य नवकल्पना अंगीकारून अधिकाराने त्या राबविण्याचा प्रयत्न करतात आणि त्याचवेळी आयुष्यभर जपलेल्या संकल्पना सोडणे मावळतीच्या सूर्यांना जमत नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांनी त्या संकल्पनांशी आपले अस्तित्व जोडलेले असते. त्या संकल्पनांमधूनच आपले अस्तित्व टिकणार आहे आणि त्या सोडल्यास आपले महत्त्व उरणार नाही, अशी त्यांनी समजूत करून घेतल्यामुळे त्यांच्याकडून जीवन संकल्पना जोपासताना एक प्रकारचे आडमुठे धोरण स्वीकारले जाते. खरे तर त्या संकल्पनांपैकी अनेक कालबाह्य झालेल्या आहेत, हे त्यांनाही पटलेले असते; परंतु आपले महत्त्व सिद्ध करण्यासाठी त्यांना घट्ट धरून ठेवलेले असते.

मावळतीचा सूर्य जसा रंगांची उधळण करून समस्त जगाला आपले अस्तित्व जाणवून देतो तशाच प्रकारे आयुष्याच्या उतरणीला असलेली मंडळी स्वतःचे अस्तित्व जाणवून देण्याचा प्रयास करतात. पण या प्रयासाचा अतिरेक झाला की, या संकल्पनांसोबत त्या पाळण्याचा आग्रह करणारी व्यक्तीही दुर्लक्षित व्हायला लागते.

या मावळतीच्या सूर्यांनी नव्यांच्या सर्वच बाबी स्वीकाराव्या असेही नाही, परंतु त्यांना त्यांनी आपले मावळतेपण स्वीकारायला हवे. कधी कधी नव्या तळपत असलेल्या सूर्यांची ती अपेक्षा असते. याचा अर्थ त्यांनी त्यांच्या तळपण्याने इतरांना भाजून काढावे असा होत नाही. कर्तव्यशील पिढीनेही या मावळतीच्या दिनकरांचा सन्मान करायला हवा. त्यांनी बदलावे ही अपेक्षा करताना ३०-४० वर्षांचा विचारांचा साचा काही दिवसात बदलणे शक्य नसते हे समजून घ्यावे. संसाराची सूत्रे आपल्या हातात घेताना त्यांच्याही विचारांचा आदरपूर्वक विचार व्हावा.

आयुष्यभर जीवनाचा गाडा मोठ्या कष्टाने ओढलेल्या या वृद्ध मंडळींना प्रेमाची व सहानुभूतीची सर्वात जास्त आवश्यकता असते. ती देण्यामध्येही बरेच वेळा कार्यशील पिढी कमी पडते. आयुष्याचा विस्तीर्ण अनुभव असलेल्या सासूला नुकताच संसार सुरू झालेली सून सहजच 'तुम्हाला काही नाही समजत' असे म्हणते. खरे तर अशा पद्धतीचे वाक्य म्हणजे त्या अस्ताकडे निघालेल्या सूर्याने दिवसभर दिलेल्या प्रकाशाचा अपमान करण्यासारखेच आहे. त्यांच्या संकल्पना पूर्णपणे स्वीकारल्या नाहीत तरी चालतील; पण त्यांच्या आयुष्याच्या समर्पणाचा अपमर्द होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी.

भा. रा. तांबे आपल्या कवितेत मावळतीच्या सूर्याने दिवसभर केलेल्या कष्टाचे वर्णन करताना लिहितात- 'असक्त परि तू केलीस वणवण, दिलेस जीवन, हे नारायण मनी न धरिले सानथोरपण, समदर्शी तू खरा !' आपल्या घरी असलेल्या मावळतीच्या सूर्यांच्या कर्तृत्वाची दखल कायम घ्यायला हवी. बरेच वेळा तारुण्याच्या धुंदीत वावरत असताना अत्यंत वाईट वागणूकही दिली जाते. वृद्धाश्रमांमध्ये जीवन व्यतीत करणारे वृद्ध या बाबतीत बरेच काही सांगू शकतात. परंतु तळपणारे सूर्य अशी वागणूक देताना एक महत्त्वाची गोष्ट साफ विसरलेले असतात की, त्यांचाही प्रवास मावळतीच्याच दिशेने सुरू आहे.

लवकरच त्यांनाही तशीच स्थिती अनुभवावी लागणार आहे. एकंदरीत काय की, सूर्यनारायणाचा दिवसभराचा प्रवास हा वेगवेगळ्या स्थितींमधील सुसंवादावर आणि सामंजस्यावर अवलंबून आहे. अशाच एखाद्या समुद्र किनारी घरातील तीनही पिढ्यांच्या प्रतिनिधींनी उभे राहावे आणि मावळतीला जाणाऱ्या त्या सूर्यनारायणाच्या साक्षीने एकमेकांना समजून घेण्याचे, एकमेकांवर विचार न लादण्याचे व एकमेकांच्या आयुष्याच्या अनुभवांचा आदर करण्याचे वचन द्यावे.

आपले अहं मोठे करून विसंवाद करण्यामध्ये काहीच प्राप्त होत नाही. केवळ मनस्ताप व ताणच वाढतो. समजून घेण्याची प्रवृत्ती जगण्याची सकारात्मक ऊर्जा देते. तीनही पिढ्यांच्या लोकांनी हातात हात धरून त्या मावळत्या दिनकराला निरोप द्यावा. त्या दिवशी काशीदच्या किनाऱ्यावर अगदी असेच झाले. आयुष्यभर प्रकाश देणारा मावळतीचा तो भास्कर एक छान विचार देऊन अस्त पावला आणि आम्ही त्याची स्मृती उराशी घट्ट बाळगून परतलो.

विवेचन

श्रीरंग श्री. हिर्लेकर

# इच्छामरणाच्या निमित्ताने...



मरणं प्रकृतिः शरीराणां।' मरण येणे ही शरीराची नैसर्गिक प्रकृती आहे. त्यासाठी विशेष खटपट करण्याची गरज नाही. उलट सर्वजण त्यापासून दूरच पळतात; काही अपवादही दिसतात. इच्छामरण म्हणजे पृथ्वीतलावरील स्वतःचे अस्तित्व स्वतःच संपवणे असा असला, तरी अनेकदा त्यामागील परिस्थिती , भावना, उद्देश, चित्ताची अवस्था, बुद्धीची स्पष्टता आणि आध्यात्मिक पातळी पूर्णतः भिन्न असतात. या सर्वांचा क्रमशः विचार केला तर **१) आत्महत्या:** पंचतंत्रातील उपदेश 'यः पलायती स जीवती' असा असला, तरी आत्महत्या म्हणजे जीवनापासून पळ काढत स्वतःला संपवणे. दुःख, नैराश्य, कशाची तरी भीती यांचा समर्थपणे सामना न करता आल्यामुळे पलायनाचा हा मार्ग स्वीकारला जातो. निकटवर्तीयांवर होणाऱ्या परिणामांची पर्वा न करता फक्त स्वतःपुरताच विचार करून बिकट परिस्थितीतून सुटका करून घेण्यालाच प्राधान्य दिले जाते. यासाठीच आत्महत्येचा नेहमी निषेध केला जातो. आत्महत्या करणाऱ्यास इहलोकीच काय, पण परलोकातही स्थान मिळणार नाही, असे आपले धर्मशास्त्र सांगते.

**२) आत्मत्याग :** 'शब्दातील त्याग' या शब्दात स्वतःपेक्षा इतरांचे हित अध्याहृद असते. यामागे कर्तव्य, प्रेम, परोपकार अशी कारणे असून त्यासाठी सकारात्मक, उदात्त कल्पना मनाशी बाळगलेल्या असतात. म्हणून आत्मत्याग करणाऱ्यांचा गौरव होतो. उदा. पुराणातील दधिची. हे मरणोपरान्त देहदान नसून विश्वकल्याणाकरीता केलेल्या दानासाठी मरण पत्करणे होय.

**३) हौतात्म्य :** राष्ट्र अथवा स्वधर्म यासाठी लढताना प्रसंगी मृत्यू येईल, ही शक्यता दिसत असूनही कर्तव्य करणे याकरिता गीतेने 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं' किंवा समर्थांनी 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' असा गौरव केला आहे. यामागे काही आदर्श, कर्तव्य, देशभक्ती हे मनावर बिंबवून त्यासाठी वीरमरण पत्करणे ही भावना असते.

**४) प्रायोपवेशन, सल्लेखना:** संसाराप्रती सर्व कर्तव्ये संपली आहेत, जीवनातील सर्व भोग भोगून झाले आहेत, अशा वेळेस त्राग्याने नव्हे तर कृतज्ञतेने, आनंदाने, शांततेने, प्रसन्नतेने हळूहळू अन्नत्याग करून शरीराचे लेखन म्हणजे क्षय करत, ईशचिंतनात राहिलेले काही दिवस काढत जीवनयात्रा संपवणे. यावेळेस ईशावास्योपनिषदातील 'क्रतो स्मर-कृतं स्मर' म्हणजे ईश्वराची कृती, त्याचे उपकार आठवत त्याचे नाम रूप गात, आपले सर्व संकल्प त्यातच विलीन करीत देहत्याग करणे. गीता म्हणते- परमेश्वराचे स्मरण करत, ओंकाराचा उच्चार करत देह सोडणारा परमगती प्राप्त करतो. 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन्। यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्।।' ८.१३ आचार्य भीष्म, सम्राट चंद्रगुप्त, स्वातंत्र्यवीर सावरकर किंवा आचार्य विनोबा यांचे प्रायोपवेशन किंवा जैन संप्रदायातील सल्लेखना म्हणजे संथारा पद्धत स्वीकारणाऱ्या काही व्यक्ती म्हणूनच आदरणीय ठरतात. भीष्माचार्य तर इच्छामरणी होते. त्यांनी प्रायोपवेशन करत अंतःकाळी शरशय्येवरील वेदनाही सहन करून उत्तरायणाची वाट बघत मगच देहत्याग केला. अमरावतीतील २० वर्षांपूर्वीचे सल्लेखनेचे एक उदाहरण माझ्या बघण्यात आहे. विषयाच्या स्पष्टतेकरिता अधिक उदाहरणे बघू. अमेरिकन साहित्यिक अर्नेस्ट हेमिंग्वेने वरवर शांतपणे स्वतःवर गोळी झाडून जीवनयात्रा संपवली. त्यामागे गंभीर नैराश्य, मानसिक अस्वास्थ्य, स्मरणशक्ती कमी होणे, अतिरेकी मद्यपानाने मनावरील ताबा गमावणे आणि कुटुंबातही आत्महत्या प्रवृत्तीचा इतिहास अशी अनेक कारणे होती. ते स्वतः महान साहित्यिक होते. त्यांच्याजवळ जीवनावर भाष्य करण्याच्या निमित्ताने का होईना, पण वैचारिक परिपक्वता असूनही त्यांनी केली ती आत्महत्याच. मुळात त्यांना अतिरेकी मद्यपानाचा आश्रय का घ्यावा लागला? त्यांच्याच प्रमाणे अनेक यशस्वी कलाकार, लेखक, कवी याच मार्गाने जातात किंवा प्रयत्न तरी करतात. कदाचित त्यांची असामान्य संवेदनशीलताच त्यांना आत्महत्येला प्रवृत्त करीत असावी. सुखदुःखांवर इतरांपेक्षा ते अधिक उत्कटतेने विचार करतात. अतिरेकी अंतर्मुखता, सतत स्वतःच्या मनात डोकावणे, दुसऱ्याला तुच्छ लेखणे, समाजाशी विसंवाद, मला कोणी समजून घेत नाही अशी भावना वाढून एकाकी राहिल्यामुळे कोणी आत्महत्या करतात तर कोणाच्या वागण्यात अतिरेकी व्यसनीपणा, विक्षिप्तपणा, तिरसटपणा आढळतो.

**वेदना आणि सर्जनशीलता:** अनेकदा वेदनेची तीव्रता आणि त्यातून उत्पन्न होणाऱ्या कलाकृतीची श्रेष्ठता यांचे प्रमाण सम असल्याचे आढळते हेही खरे. एक प्रसिद्ध उदाहरण म्हणजे निष्पाप क्रौंच पक्ष्याला लागलेला पारध्याचा बाण बघून वाल्मीकि कळवळले, पक्ष्याच्या दुःखाशी ते समरस झाले, त्यांची प्रतिभा जागृत झाली अन् त्यांच्या तोंडून आदिकाव्य रामायण प्रसवले. एका हत्येतून शांत रसाने ओतप्रोत अशी श्रेष्ठ कलाकृती उभी राहिली; पण सर्वच कलावंत असे नसतात. सदैव यशाच्या शिखरावर राहण्याचा ताण, असमाधान, त्यातून आलेले नैराश्य याला ते बळी पडतात. वास्तव आणि कल्पना यांच्यातील संघर्षात ते अडकतात. रवींद्रनाथ टागोर, टॉलस्टॉय यांच्यासारखे काही अपवाद जीवनाचे दान आनंदाने स्वीकारतात. असेही लक्षात येते की, भारतीय परंपरा वेदना सहन करायला शिकवते. यामुळेच पाश्चात्त्यांपेक्षा आपल्याकडे आत्महत्येचे प्रमाण तुलनेने कमी आढळत असावे. मग साने गुरुजींच्या मृत्युला काय म्हणावे? लौकिक अर्थाने त्यांनीही नैराश्यातूनच आत्महत्या केली हे खरे, पण त्यांचे नैराश्य वैयक्तिक वेदनेतून आलेले नसून समाजातील विषमता, अन्याय, कलह बघवेनासे झाले म्हणून होते. त्यांनी स्वतःप्रमाणेच समाजाकडूनही करुणा, प्रेम, सात्त्विकता, नैतिकता यांची अपेक्षा केली होती. अपेक्षाभंगातून उद्भवलेल्या खिन्नतेतून त्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. त्यांच्या आत्महत्येत कोणी पलायन शोधू नये.

**स्वातंत्र्यवीर सावरकर आणि आचार्य विनोबा:** दोघांनीही आपले जीवन प्रायोपवेशन पद्धतीने संपवले. सावरकरांनी स्वतःच सांगितले- (पान ६ वर)

पर्यावरण **मिलिंद बेंडाळे**



# पृथ्वीचा ‘आईस हाऊस’ ते ‘ग्रीन हाऊस’ प्रवास

**पृथ्वीचा हवामान इतिहास हा परिवर्तनाचा आणि पुनर्जन्माचा इतिहास आहे. हिमयुगांच्या कठोर थंडीतून ग्रीन हाऊस उष्णतेपर्यंत प्रत्येक टप्प्याने जीवनाला नव्याने आकार दिला. आज आपण त्या इतिहासाच्या नव्या वळणावर उभे आहोत. भूतकाळाचा धडा लक्षात ठेवून सजगपणे पावले उचलली, तर भविष्यातील हवामान अधिक संतुलित ठेवणे शक्य आहे. अन्यथा, इतिहासाची पुनरावृत्ती आपल्यासाठी अधिक कठोर ठरू शकते.**

पृथ्वीने आपल्या प्रदीर्घ इतिहासात हवामानाचे अनेक टोकाचे टप्पे अनुभवले आहेत. कधी ती गोठून जाणाऱ्या ‘आईस हाऊस’ अवस्थेत गेली, तर कधी धगधगत्या ‘ग्रीन हाऊस’ अवस्थेत परिवर्तित झाली. अनेक वर्षांपासून हवामानातील या चढ- उतारांचा थेट संबंध वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईडच्या प्रमाणाशी जोडत आले आहेत; मात्र ताज्या संशोधनाने या समजुतीला नवे वळण दिले आहे. आता आढळून आले आहे की, या कार्बनचा स्रोत आणि त्याचे नियमन करणाऱ्या शक्ती आपल्या पूर्वीच्या कल्पनेपेक्षा कितीतरी जास्त गुंतागुंतीच्या आहेत.

पृथ्वीच्या पृष्ठभागावरील ‘टेक्टॉनिक प्लेट्स’ची हालचाल हवामान बदल घडवण्यात इतकी मोठी भूमिका बजावते की, ती आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर दुर्लक्षित राहिली होती. कार्बन केवळ त्या ठिकाणांहून बाहेर पडत नाही, जिथे प्लेट्स एकमेकांना धडकतात, तर ज्या ठिकाणी त्या एकमेकांपासून दूर सरकतात, ती ठिकाणेही तितकीच महत्त्वाची ठरतात. ‘कम्युनिकेशन्स, अर्थ अँड एन्व्हायर्नमेंट’ या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या नव्या अभ्यासात गेल्या ५४ कोटी वर्षांमध्ये पृथ्वीच्या ‘टेक्टॉनिक प्लेट्स’नी जागतिक हवामान घडवण्यात नेमकी कशी भूमिका बजावली, याचे रहस्य उलगडण्यात आले आहे. टेक्टॉनिक प्लेट्स एकमेकांवर आदळतात, तेथे ज्वालामुखींच्या लांबलचक साखळ्या तयार होतात. त्यांना ‘ज्वालामुखीय कमानी’ (व्हॉल्कॅनिक आर्क्स) असे म्हटले जाते. या ज्वालामुखींशी संबंधित वितळण्याच्या प्रक्रियेमुळे खडकांमध्ये हजारो वर्षे अडकून राहिलेला कार्बन मुक्त होतो आणि पृथ्वीच्या पृष्ठभागावर येतो. ऐतिहासिकदृष्ट्या वातावरणात कार्बन डाय ऑक्साईड सोडण्यासाठी मुख्यत्वे हेच ज्वालामुखी जबाबदार असल्याचे मानले जात होते; मात्र अभ्यास दर्शवितो की, मध्य- महासागरीय पर्वतरांगा आणि खंडीय विदीर्ण प्रदेश म्हणजे टेक्टॉनिक प्लेट्स एकमेकांपासून दूर पसरतात. त्यांनी संपूर्ण भूगर्भीय कालखंडात पृथ्वीच्या कार्बन चक्राचे संचालन करण्यात अधिक निर्णायक भूमिका बजावली आहे.

यामागील प्रमुख कारण म्हणजे जगातील महासागर वातावरणातून प्रचंड प्रमाणात कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात आणि समुद्रतळावरील कार्बनसमृद्ध खडकांमध्ये साठवून ठेवतात. हजारो वर्षांमध्ये ही प्रक्रिया समुद्राच्या गाभाऱ्यात शेकडो मीटर जाडीच्या कार्बन-समृद्ध गाळाच्या थरांची निर्मिती करते. ‘टेक्टॉनिक प्लेट्स’च्या हालचालीमुळे हे खडक पृथ्वीभर फिरत राहतात आणि अखेरीस ‘सबडक्शन झोन’मध्ये पोहोचतात. तिथे प्लेट्स एकमेकांमध्ये सामावून जातात. तिथे पोहोचल्यावर या खडकांमध्ये साठवलेला कार्बन डाय ऑक्साईड पुन्हा वातावरणात मुक्त होतो. या प्रक्रियेला ‘डीप कार्बन सायकल’ म्हणजेच ‘गहन कार्बन चक्र’ असे म्हणतात.

‘टेक्टॉनिक प्लेट्स’वर साठलेल्या कार्बनच्या हालचालींचे पुनर्निर्माण करून गेल्या ५४ कोटी वर्षांमधील प्रमुख ‘ग्रीन हाऊस’ (उष्ण) आणि ‘आईस हाऊस’ (शीत) हवामान अवस्थांची अचूक भाकिते करण्यास यश आले आहे. ‘ग्रीन हाऊस’ कालखंडात पृथ्वी अधिक उष्ण होती, तेव्हा खडकांमध्ये साठवल्या जाणाऱ्या कार्बनपेक्षा वातावरणात मुक्त होणाऱ्या कार्बनचे प्रमाण अधिक होते. उलट, ‘आईस हाऊस’ अवस्थेत महासागरांमध्ये कार्बन साठवण्याची प्रक्रिया प्रबळ ठरली. त्यामुळे वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण घटले आणि जागतिक थंडाव्याची प्रक्रिया सुरू झाली. अभ्यासातील सर्वात महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड नियंत्रित करण्यात खोल समुद्री गाळाची भूमिका अत्यंत निर्णायक आहे. ‘टेक्टॉनिक प्लेट्स’ हळूहळू सरकत असताना आपल्यासोबत कार्बन-समृद्ध गाळ वाहून नेतात. तो शेवटी ‘सबडक्शन’ प्रक्रियेद्वारे पृथ्वीच्या अंतर्भागात परत जातो. हीच प्रक्रिया पृथ्वी ‘ग्रीन हाऊस’ अवस्थेत राहील की ‘आईस हाऊस’ अवस्थेत, हे ठरवणारा प्रमुख घटक ठरते. इतिहासात ज्वालामुखीय कमानींमधून बाहेर पडणारा कार्बन हा वातावरणातील कार्बनडाय ऑक्साईडचा मोठा स्रोत मानला जात होता; परंतु संशोधनानुसार ही प्रक्रिया मुख्यत्वे गेल्या १२ कोटी वर्षांमध्ये प्रभावी ठरली असून त्याचे श्रेय ‘प्लॅन्क्टिक कॅल्सिफायर्स’ या सूक्ष्म समुद्री जीवांना जाते. हे जीव ‘फायटोप्लँक्टन’ समूहातील असून विरघळलेल्या कार्बनचे रूपांतर कॅल्साईटमध्ये करण्याची क्षमता आहे. हे जीव वातावरणातील प्रचंड प्रमाणातील कार्बन शोषून समुद्रतळावर साचणाऱ्या कार्बन- समृद्ध गाळात रूपांतरित करतात. ‘प्लॅन्क्टिक कॅल्सिफायर्स’चा उदय सुमारे २० कोटी वर्षांपूर्वी झाला आणि सुमारे १५ कोटी वर्षांपूर्वी ते जगातील महासागरांमध्ये व्यापक प्रमाणात पसरले. त्यामुळे गेल्या १२ कोटी वर्षांमध्ये ज्वालामुखीय कमानींमधून वातावरणात मुक्त झालेला मोठा कार्बन साठा हा प्रत्यक्षात या सूक्ष्म जिवांनी तयार केलेल्या कार्बनसमृद्ध गाळाचा परिणाम आहे. त्यापूर्वीच्या कालखंडात वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईडमध्ये प्रमुख योगदान मध्य- महासागरीय पर्वतरांगा आणि खंडीय विदीर्ण प्रदेश म्हणजे ज्या ठिकाणी ‘टेक्टॉनिक प्लेट्स’ एकमेकांपासून दूर सरकतात, तिथून मुक्त होणाऱ्या कार्बनचे होते. पृथ्वीच्या टेक्टॉनिक प्रक्रियांनी हवामान कसे घडवले आहे आणि भविष्यातही ते कसे परिणाम करणार आहेत, याबाबत नवा दृष्टिकोन पुढे आला आहे. पृथ्वीचे हवामान केवळ वातावरणातील कार्बनवर अवलंबून नसून पृथ्वीच्या पृष्ठभागावरील कार्बन उत्सर्जन आणि समुद्रतळातील गाळामध्ये त्याच्या साठवणुकीतील गुंतागुंतीच्या संतुलनावर आधारित आहे. हे संशोधन भविष्यातील हवामान मॉडेल्ससाठीही अत्यंत महत्त्वपूर्ण अंतर्दृष्टी देते. ‘टेक्टॉनिक प्लेट्स’नी प्रभावित होणारे पृथ्वीचे नैसर्गिक कार्बन चक्र हे ग्रहाच्या हवामान नियंत्रणात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते, हे आता स्पष्ट झाले आहे. भूगर्भीय काळाच्या या गहन संदर्भाचे आकलन केल्याने भविष्यातील हवामान परिस्थिती आणि मानवी क्रियाकलापांच्या सातत्यपूर्ण परिणामांचे अधिक अचूक भाकीत करण्यास मदत होऊ शकते.

पृथ्वीचा इतिहास हा केवळ खंड, महासागर आणि जीवसृष्टीचा इतिहास नाही, तर हवामानातील सततच्या बदलांचा, उत्क्रांतीचा आणि उलथापालथींचाही आहे. सुमारे ४.५ अब्ज वर्षांच्या प्रवासात पृथ्वीने उष्णतेचे प्रचंड टप्पे, भीषण हिमयुगे, दीर्घकालीन स्थैर्य आणि अचानक घडलेले हवामानिक धक्के अनुभवले आहेत. आज मानवनिर्मित हवामान बदलाच्या पृष्ठभूमीवर या भूतकाळाकडे पाहणे अधिक महत्त्वाचे ठरते. पृथ्वीच्या इतिहासातील सर्वाधिक नाट्यमय टप्प्यांपैकी एक म्हणजे ‘स्नोबॉल अर्थ’ म्हणून ओळखला जाणारा कालखंड. सुमारे ७० कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीचा मोठा भाग बर्फाच्या जाड थराखाली गेला होता, असे भूवैज्ञानिक पुरावे सूचित करतात. या तीव्र थंडीत सागरी आणि स्थलजिवांसमोर अस्तित्वाची भीषण परीक्षा उभी राहिली; मात्र या कठीण परिस्थितीतूनच जीवनाने नव्या रूपात उभारी घेतली. बर्फ वितळल्यानंतर पोषक द्रव्यांची मुबलकता वाढली आणि पुढे जाऊन बहुकोशीय जिवांच्या उत्क्रांतीला चालना मिळाली. यानंतरही पृथ्वीने अनेक हिमयुगे अनुभवली. विशेषतः सुमारे २.६ दशलक्ष वर्षांपूर्वी सुरू झालेल्या प्लायस्टोसीन हिमयुगात हिमनद्या वारंवार वाढल्या- घटल्या. या चक्रांनी समुद्रपातळी बदलली, खंडांचे भूआकार घडवले आणि मानवी उत्क्रांतीलाही आकार दिला. मानवाचे स्थलांतर, शेतीचा विकास आणि सभ्यतेची उभारणी हे हवामानाच्या तुलनेने स्थिर टप्प्यांमध्येच शक्य झाले. हिमयुगांइतकेच ठरलेले टप्पे म्हणजे पृथ्वीवरील उष्ण ‘ग्रीन हाऊस’ कालखंड. (पान ६ वर)

पान १ वरून

## डिजिटल जगाचा अदृश्य पाया

‘जेएलएल’च्या २०२६च्या अहवालानुसार, २०२५ ते २०३० दरम्यान जागतिक डेटा सेंटर मार्केट दुप्पट होऊन सुमारे २०० गिगावॅट क्षमतेपर्यंत पोहोचू शकते. यासाठी सुमारे तीन ट्रिलियन डॉलर्स गुंतवणूक अपेक्षित आहे. ‘एआय’मुळे या क्षेत्रात दरवर्षी सुमारे १४ टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे आणि २०३० पर्यंत अर्धे डेटा सेंटर ‘वर्कलोड एआय’ संबंधित असू शकते. भारतामध्येही या क्षेत्राची वाढ वेगाने होत आहे. २०२४ मध्ये भारताने एक गिगावॅट क्षमतेचा टप्पा ओलांडला असून, २०२७ पर्यंत ही क्षमता १.८ गिगावॅटपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. ‘५-जी’, ‘लाऊड’ आणि ‘एआय’मुळे २०३० पर्यंत आणखी मोठी वाढ अपेक्षित आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये सरकारने विदेशी डेटा सेंटर कंपन्यांसाठी करसवलती जाहीर करून या क्षेत्राला सर्वार्थाने चालना दिली आहे. डेटा सेंटर क्षेत्रात प्रगत इन्फ्रास्ट्रचरची गरज वाढत आहे. उच्च क्षमतेचे सर्व्हर, लिक्विड कूलिंगसारख्या नव्या तंत्रज्ञानांचा वापर आता आवश्यक झाला आहे. मात्र, तांत्रिक कौशल्य असलेले मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही, ही मोठी अडचण आहे. ‘एआय’, ‘क्लाऊड’ आणि सायबर सुरक्षा या क्षेत्रांत प्रशिक्षित व्यावसायिकांची मागणी झपाट्याने वाढत आहे. त्याचबरोबर सायबर हल्ल्यांचा धोका वाढल्याने डेटा सेंटर अधिक सुरक्षित बनवणेही तितकेच महत्त्वाचे ठरत आहे. ‘झिरो ट्रस्ट मॉडेल’, मजबूत ओळख व्यवस्थापन आणि सतत निरीक्षण यांसारख्या उपाययोजना आवश्यक ठरत आहेत. ‘एआय’मुळे डेटा सेंटरची रचना आणि कार्यपद्धती पूर्णपणे बदलत आहे. आता पारंपरिक सर्व्हरऐवजी ‘एआय फॅक्टरी’सारखी उच्च क्षमतेची केंद्रे विकसित होत आहेत. त्यामुळे आज डेटा सेंटर केवळ ‘बॅकएंड’ सुविधा राहिलेले नाहीत, तर डिजिटल अर्थव्यवस्थेचा ते कणा बनले आहेत. भारताकडे युवा मनुष्यबळ, वाढती डिजिटल अर्थव्यवस्था आणि सरकारी पाठबळ असल्यामुळे या क्षेत्रात मोठी झेप घेण्याची क्षमता आहे. मात्र, यासाठी कौशल्य विकास, शाश्वतता आणि सुरक्षा यांवर एकत्रितपणे काम करणे देखील तितकेच आवश्यक आहे. ‘आंतरराष्ट्रीय डेटा सेंटर दिन’ आपल्याला याच गोष्टीची जाणीव करून देतो की, डिजिटल जगाचा पाया आज या अदृश्य डेटा सेंटरमध्ये घडत आहे. म्हणूनच सध्याच्या युद्धकाळातही डेटा सेंटर्सना लक्ष्य केल्याचे प्रकार आखातात दिसून आले. त्यामुळे आजच्या जगात इंधन, ऊर्जेइतकेच म हत्त्व आहे ते डेटाला. म्हणूनच तर 'data ir the new oil' असे म्हटले जाते आणि त्याच न्यायाने डेटा सेंटर्सही तेलशुद्धीकरण प्रकल्पांइतकीच कळीची म्हणावी लागतील.

पान २ वरून

## पैसा नव्हे प्रेमच महत्त्वाचे!

केवळ पैशाच्या जोरावर नाती मोजणाऱ्यांना मी आणखी एक वास्तव नजरेस आणू इच्छितो. विजयपत सिंघानिया म्हणाले त्याप्रमाणे पालकांनी मुलांना हयातीत सर्व काही दिले नाही व स्वतःसाठी संपत्ती राखून ठेवली तरी सर्व प्रश्न सुटतात असे नाही. मला नागपुरातील, पुण्यातील, मुंबईतील अनेक पालक माहिती आहेत. त्यांनी आपल्या आयुष्यात भरपूर पैसे कमावले, मुलांना चांगले शिक्षण दिले, त्यांना आयुष्यात सेटल केले आणि आता दोघे ज्येष्ठ नवराबायको आपल्या बंगल्यात किंवा मोठ्या फ्लॅटमध्ये एकटेच राहतात. घर आहे, पैसा आहे पण एकाकीपणा खायला उठतो. कारण आता मुले परदेशी गेली, परगावी गेली, त्यांची जबाबदारी नाही, त्यांना काही द्यावे लागत नाही, पण त्यांच्याशिवाय करमतही नाही.

माणसाला माणसांशिवाय करमत नाही. आपली रक्ताच्या नात्याची माणसे सोबत असावीत असे वाटते. विशेषतः म्हातारणपणी ही गरज अधिक असते. ती केवळ आर्थिक नसते. अनेकदा पैसा असूनही माणूस सोबत नसेल तर हतबल आहे. किमान आजारी पडल्यावर, रुग्णालयात दाखल केल्यावर ऑपरेशनच्या वेळी फॉर्मवर सही करण्यासाठी तर आपला माणूस सोबत हवा. मानवी नात्यांचा केवळ पैशात विचार करणे चुकीचे आहे. विजयपत सिंघानिया यांच्याबाबतीत नक्की काय झाले हे माहिती नाही. तथापि, त्यांच्याबद्दल बातम्यांमध्ये जे चित्र उभे राहिले त्यावरून मत प्रदर्शन करणाऱ्यांनी व्यापक विचार करायला हवा. मानवी नात्यांत पैशापेक्षा प्रेमच महत्त्वाचे ठरते. आपला सनातन समाज यावर उभा आहे. उगाच एखाद्या अपवादावरून मूळ विचारांबद्दल शंका निर्माण करू नये. विजयपत सिंघानिया विषय हा अपवादात्मक आहे, आपण अपवादला नियम मानून संपूर्ण आपली सनातनी संस्कृती नाकारायची का ?

## बंगालचे विदारक वास्तव

हल्ल्यांपैकी २७.५ टक्के हल्ले हे एकट्या बंगालमध्येच घडून आल्याचे आकडेवारी सांगते. यावरून बंगालमधील ढासळलेल्या कायदा-सुव्यवस्थेचा प्रत्यय यावा. आता एवढ्या मोठ्या संख्येने महिला अत्याचारांची प्रकरणे समोर येत असतानाही, ते निकाली काढण्याचे प्रमाणही तिथे नगण्य. म्हणूनच, बंगालमध्ये २०२३च्या अखेरपर्यंत एकूण ३.६८ लाख प्रकरणे प्रलंबित होती. हेच प्रमाण २०१७ साली २.३४ लाख इतके होते. त्यामुळे पोलिसांकडील प्रलंबित प्रकरणांच्या बाबतीतही प. बंगालचा देशात प्रथम क्रमांक लागतो. एकीकडे प्रलंबित प्रकरणांचा ढिग; तर दुसरीकडे महिलांवरील अत्याचारांशी संबंधित १९ हजार, ००५ प्रकरणांमध्ये निर्दोष मुक्तता करण्यात आली. यावरून महिला अत्याचार बंगालमध्ये बोकाळला असून, दीदी ते रोखण्यात अपयशी ठरल्याचे दिसते. त्यातच दोषींविरोधात कडक कारवाईची पोलिसांची अनास्था, आरोपींचे तृणमूलशी लागेबांधे हे मुद्दे चिंतेत भर घालणारे. म्हणूनच समाजमाध्यमांवर बहुतांश बंगाली महिलांमध्ये ‘आता दीदी नको’ हीच भावना यंदा दृढ झालेली दिसते. कारण, दीदींच्या कुनीतीचे सर्वाधिक घाव हे बंगालच्या महिलांनीच सोसले. तेव्हा कालिमातेची उपासक असलेली बंगालची मातृशक्ती या अन्यायकारी, अत्याचारी व्यवस्थेचा कायमचा अंत केल्याशिवाय यंदा राहणार नाही, हे निश्चित!

मुक्तचित्र **डॉ. संतोष पाठारे**

# अँड ऑस्कर गोज् टू...

भारतीय चित्रपट कलावंत आणि प्रेक्षक यांना राष्ट्रीय पुरस्कारापेक्षाही उत्सुकता असते ती ऑस्कर पुरस्कारांची. दरवर्षी मार्च महिन्यात हॉलिवूडमध्ये दिल्या जाणाऱ्या ऑस्कर पुरस्कारांची चर्चा सहा महिने आधीच होऊ लागते. भारतीय चित्रपटांचा सहभाग नसलेल्या ऑस्कर पुरस्कारांना खरं तर आपण फार महत्त्व द्यायला नको. आपल्याकडे जसे फिल्मफेअर पुरस्कार दिले जातात, त्याच धर्तीचा हॉलिवूडमधील हा एक पुरस्कार सोहळा असतो. मात्र, सुरुवातीपासूनचा भारतीय प्रेक्षकांना हॉलिवूड फिल्म्स, तिथले कलाकार यांच्याबद्दलचं प्रचंड आकर्षण आहे. हॉलिवूडच्या सक्षम वितरण व्यवस्थेमुळे भारतात प्रादेशिक सिनेमांपेक्षा हॉलिवूडचे सिनेमे प्रदर्शनासाठी विविध भाषांतील डबिंगसह सहज उपलब्ध होतात. ऑस्कर पुरस्कारांमध्ये ‘सर्वोत्कृष्ट परदेशी चित्रपट’ असा एक विभाग असतो. या विभागात अंतिम फेरीत फक्त पाच चित्रपट निवडले जातात. जगातील ६० हून अधिक देश या विभागासाठी चित्रपट पाठवतात. काही निर्माते स्वतंत्रपणे आपल्या चित्रपटाची प्रवेशिका भरतात, त्यामुळे या विभागातील पुरस्कार जिंकण्यासाठी स्पर्धा फारच तगडी असते. ऑस्कर पुरस्कारांची घोषणा झाली की, भारतातून कोणत्या चित्रपटाची अधिकृत प्रवेशिका जाणार, याबद्दल तर्क लढवले जातात. यावर्षी नीरज घेयवान दिग्दर्शित ‘होमबाऊंड’ या चित्रपटाची निवड करण्यात आली होती. त्याला पहिल्या १५ मध्ये स्थान मि ळाले; पण तो अंतिम फेरीत येऊ शकला नाही. भारतीय निर्मात्यांनी निर्माण केलेले ‘मदर इंडिया’, ‘सलाम बॉम्बे’ आणि ‘लगान’ हे तीनच भारतीय चित्रपट आजवर अंतिम फेरीत पोहोचले आहेत.




‘गांधी’ आणि ‘स्लमडॉग मिलेनिअर’ या भारतात चित्रीकरण केलेल्या आणि भारतीय कलाकारांचा समावेश असलेल्या चित्रपटांना ऑस्कर पुरस्कार मिळालेले असले, तरी त्यांचे निर्माते परदेशी होते. आशुतोष गोवारीकर यांच्या ‘लगान’ला पहिल्या पाचात नामांकन मिळाल्यानंतर आपल्याकडे ऑस्कर पुरस्कारांबद्दल कुतूहल वाढलं. संदीप सावंत यांचा ‘श्वास’ आणि चैतन्य ताम्हाणे यांचा ‘कोर्ट’ या मराठी चित्रपटांची अधिकृत निवड केल्यामुळे मराठी कलावंत आणि प्रेक्षकदेखील ऑस्करबद्दल सजग झाले आहेत. यावर्षी ट्युनेशियाच्या कौथर बेन हानिया या दिग्दर्शिकेचा ‘व्हॉईस ऑफ हिंदराजब’ ज्याबद्दल मागील लेखात सविस्तर लिहिले होते. स्पेनचा ‘सिरात’ दिग्दर्शक : ऑलीव्हर लॅक्से, ब्राझीलचा ‘द सिक्रेटएजंट’ दिग्दर्शक : क्लेबर मेंडोंसा फिल्हो फ्रान्सतर्फे प्रवेशिका असलेला इराणी दिग्दर्शक जाफर पनाहींचा ‘इट वॉज जस्ट अॅन ॲक्सिडन्ट’ आणि नॉर्वेच्या योआकिम ट्रायरचा ‘सेन्टीमेंटल व्हॅल्यू’ हे पाच चित्रपट अंतिम स्पर्धेत होते. या पाचही चित्रपटांनी विविध स्पर्धा आणि चित्रपट महोत्सव यांमध्ये पारितोषिके मिळविलेली असल्याने ते चांगलेच चर्चेत होते. ‘द सिक्रेट एजंट’, ‘व्हॉईस ऑफ हिंदराजब’ आणि ‘इट वॉज जस्ट अॅन ॲक्सिडन्ट’ या चित्रपटांना असलेले राजकीय संदर्भ, ‘सिरात’मधील जीवनाची क्षणभंगुरता अधोरेखित करणारे आशयसूत्र या सर्वांवर नातेसंबंधाची व्यामिश्रता टिपणाऱ्या योआकिम ट्रायरच्या ‘सेन्टीमेंटल व्हॅल्यू’ने मात करत सर्वोत्तम विदेशी चित्रपटासाठी असलेला ऑस्कर पुरस्कार पटकावला. सिनेक्षेत्रात कीर्ती कमावलेले वडील आणि त्याच्यापासून अनेक वर्षे दुरावलेल्या मुली यांच्यातील नात्यात येणाऱ्या चढ- उतारांचे हळवं चित्रण ‘सेन्टीमेंटल व्हॅल्यू’मध्ये पाहायला मिळतं. पत्नीशी बेबनाव झाल्यामुळे तो तिला आणि दोन मुली- नोरा रेनेट रेन्स्वे व ॲग्नेस इग्ना इब्सडोटर लिलीआस यांना सोडून गेलेला असतो. पत्नीच्या मृत्यूनंतर तो घरी परततो. नोरा नाटकात अभिनय करीत असते आणि ॲग्नेस ऐतिहासिक संशोधक म्हणून काम करीत असते. नोरा तिच्या एका विवाहित सहकलाकाराच्या प्रेमात असते तर ॲग्नेस तिचा नवरा आणि मुलगा एरिक यांच्या सोबत सुखात असते. वडिलांचे असं अचानक येण्याने त्यांना आश्चर्य वाटतं. गुस्तावबोर्ग आपलं वडिलोपार्जित घर विकण्याचा हेतूने आलेला असतो. त्याच्या आईच्या- कॅरीनच्या आयुष्यावर चित्रपट निर्माण करण्याच्या तयारीत तो असतो. कॅरीनला महायुद्धाच्या काळात नाझींचे अत्याचार सहन करावे लागलेले असतात. आपल्या चित्रपटात कॅरीनची भूमिका नोराने करावी अशी गुस्तावबोर्गची इच्छा असते. तो नोराला भेटून तसं सांगतो. पण आईला सोडून गेलेल्या गुस्तावबोर्गबद्दल नोराच्या मनात अढी असते. ती गुस्तावबोर्गचा प्रस्ताव नाकारते. नोराच्या जागी तो रचेल कम्प एली फॅनिंग या नटीला पाचारण करतो. रचेल ही आव्हानात्मक भूमिका आवडते, पण लवकरच तिला आपण हे आव्हान पेलू शकणार नाही, याची जाणीव होते. दरम्यान, गुस्तावबोर्ग चित्रपटाची संहिता ॲग्नेसला वाचायला देतो. ती वाचल्यानंतर ॲग्नेसचे वडिलांबद्दलचे मत बदलून जाते. ती नोराला त्यांनी लिहिलेल्या संहितेबद्दल सांगते. नोरा कॅरीनची भूमिका करायला तयार होते, त्या व्यक्तिरेखेत ती स्वतःला पाहू लागते. ‘सेन्टीमेंटल व्हॅल्यू’चे सर्वात मोठे बलस्थान म्हणजे त्याची कथनशैली! हा चित्रपट एका घरात राहिलेल्या वेगवेगळ्या पिढीतील माणसांचा असल्याने ते घरही या चित्रपटातील एक प्रमुख व्यक्तिरेखा बनून जाते. चित्रपटाच्या सुरुवातीला येणारं घराचं कथन चित्रपटाचा टोन सेट करते. हे घर गुस्तावबोर्गच्या आजोबांनी बांधलं, या घरात गुस्तावचा जन्म झाला. त्याच्या आईला या घरातून अटक झाली, तिने याच घरात गुस्ताव सात वर्षांचा असताना आत्महत्या केली. गुस्ताव आणि त्याच्या बायकोने सिसेलने याच घरात त्यांचा संसार मांडला आणि तिथेच त्यांच्यात बेबनाव सुरू झाला. रंगमंचावर अभिनय करतानादेखील एखाद्या क्षणी ब्लँक होऊन जाते. ॲग्नेस समोर व्यक्त होताना ती म्हणते, ‘‘बालपणाने तुला उद्ध्वस्त केलं नाही, तुला एक सुखी कुटुंब मिळालं.’’ यावर ॲग्नेस तिला प्रत्युत्तर देताना म्हणते, ‘‘मी नेहमीच सुरक्षित होते. कारण माझ्या जवळ तू होतीस.’’ एकाच परिस्थितीत घरातील दोन व्यक्ती वेगवेगळ्या पद्धतीने वागतात. त्यांचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न होतो. अनेकदा आपल्या माणसाच्या एखाद्या कृतीचा आपण विपरीत अर्थ लावतो. नातं टिकवायचं असेल तर आपल्या माणसाला त्याच्या गुणदोषांसकट स्वीकारणं नेहमीच श्रेयस्कर असतं. सध्याच्या विभक्त कुटुंबव्यवस्थेच्या काळात ‘सेन्टीमेंटल व्हॅल्यू’ नाती जपण्याचे महत्त्व अधोरेखित करतो म्हणूनच अँड ऑस्कर गोज् टू, ‘सेन्टीमेंटल व्हॅल्यू’ हे ऐकल्यावर योआकिम ट्रायर आणि त्याच्या टीमचे

कीर्तिरूपांच्या आठवकथा

डॉ. रमा गोळवलकर

# वाक् अम्भृणी

ऋग्वेद हा जगात रचल्या गेलेल्या रचनांचा सर्वात जुना दस्तावेज आहे. मानवी संस्कृतीच्या उष:काळी अर्थात वैदिक काळात या भारतभूमीत जे अत्यंत प्रतिभावंत स्त्री आणि पुरुष होऊन गेलेत त्यांच्या अभिव्यक्तीचं संचित म्हणजे ऋग्वेद. सूक्त म्हणजे एखाद्या वैदिक देव किंवा देवीचं स्तुतिकाव्य! प्रत्येक सूक्त हे काही ऋचांचं मिळून बनलेलं असतं. अशा १० मंडलांत विभागलेल्या एकूण १०२८ सूक्तांत मिळून १०,५५२ पेक्षा जास्त ऋचा आहेत. या सगळ्या ऋचा छंदबद्ध; त्यामुळे या सगळ्या रचना गाता येतात.



आजच्या संदर्भात तर ही सगळी सूक्त म्हणजे गीतंच आहेत. यांची रचना करणाऱ्यांना ऋषी आणि ऋषिका म्हणतात. प्राचीन पारंपरिक मान्यतेनुसार या अंतराळात, आसमंतात 'ऋचा' आधीपासूनच अस्तित्वात होत्या, त्या ऋषिका/ऋषींना दिसल्या! 'ऋचा दिसणं' ही एक अत्यंत अद्भुत अशी अभिव्यक्ती आहे. आपल्या ज्ञानेंद्रियांच्या क्षमतेचा आढावा घेतला तर कानाला विशिष्ट मर्यादेचे ध्वनितरंग ऐकू येऊ शकतात. नाकाला विशिष्ट अंतरावर असलेल्या गंधांचा वास येतो. त्वचेला संपर्कात आल्याखेरीज स्पर्श ही संवेदना नसते आणि चव घेण्यासाठी तर पदार्थ थेट जिभेवरच ठेवावा लागतो. दृष्टी मात्र सुदूर अंतराळात असलेले ज्योतिपिंडदेखील दिसू शकतात. त्यामुळे भारतीय विद्वज्जनांनी दृष्टीला प्राधान्यक्रमावर सर्वात महत्त्वाचं स्थान दिलेलं आहे. म्हणूनच ज्या असामान्य प्रज्ञा आणि प्रतिभेच्या व्यक्तींना 'ऋचा दिसल्यात.' त्या 'द्रष्टा' ऋषिका/ऋषी. अशाच एका दृष्ट्या ऋषिकेचं नाव आहे वाक्. ही अम्भृण ऋषींची कन्या. म्हणून हिचं नाव वाक् अम्भृणी. हिची ओळख म्हणजे ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात अंतर्भाव करण्यात आलेलं, तिनं रचलेलं एक प्रसिद्ध सूक्त.

त्रिष्टुप् छंदात रचलेल्या या सूक्तात एकूण आठ ऋचा आहेत. पण त्यात व्यक्त होणारे विचार मूलगामी आणि आशय अतिशय प्रगल्भ आहेत, असं ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या भाषाविज्ञान विभागाच्या प्रोफेसर आर्किबाल्ड हेन्री साईस (२५ सप्टेंबर १८४५- ४ फेब्रुवारी १९३३) यांनी त्यांच्या सायन्स ऑफ लँग्वेज भाग १ च्या पहिल्याच पानावर या सूक्ताचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात की, या आठ ऋचांत वाक् तत्त्वाविषयी, भाषा विज्ञानाविषयी अतिशय गंभीर आणि सघन विचार मांडण्यात आलेले आहेत.

भारतीय अध्यात्म शास्त्राची रुजुवात या सूक्तात झालेली दिसते. ब्रह्मसाक्षात्काराने पावन झालेली वाक् ही देवता स्वत:च प्रस्तुत सूक्तातून स्वत:ची विश्वात्मक अनुभूती व्यक्त करते आहे. चिदानंदरूप शिवाची अनुभूती वर्णित करते आहे. म्हणूनच दुर्गा सप्तशती आणि देवी अथर्वशीर्ष या दोन्हीही शाक्त भक्तिकवनांचा अंगभूत भाग म्हणून प्रस्तुत सूक्ताचं पठन करण्याची परंपरा फार जुनी आहे. या आठ ऋचा आणि त्यांचा अर्थ जाणून घेऊ या-

**'अहं रुद्रेभिर्वसुभिश्चराम्यहं आदित्यैरुत विश्वदेवै:। अहं मित्रावरुणोभा बिभर्म्यहं इन्द्राग्नी अहं अश्विनोभा ।।१।।'**

मी (वाग्देवी) रुद्र (अकरा), वसु (आठ), आदित्य (बारा) तथा विश्वदेवांसह विचरण करते. मी मित्र, वरुण, इन्द्र, अग्नी आणि अश्विनीकुमारांना धारण करते.

**'अहं सोमं आहनसं बिभर्म्यहं त्वष्टारं उत पूषणं भगम्। अहं दधामि द्रविणं हविष्मते सुप्राव्येख्प् यजमानाय सुन्वते ।।२।।'**

मी (वाग्वेदी) सोमतत्त्वाची पालक आणि रक्षक आहे. मीच त्वष्टा, पूषन् आणि भग (ऐश्वर्य) यांचीही पालक आहे. मी यज्ञकर्ता यजमानाला ऐश्वर्यानं समृद्ध करते.

**'अहं राष्ट्री संगमनी वसूनां चिकितुषी प्रथमा यज्ञियानाम्। तां मा देवा व्यदधु: पुरुत्रा भूरिष्ठात्रां भूर्यावेशयन्तीम् ।।३।।'**

मी राष्ट्राचं निर्माण करणारी शक्ती (राष्ट्री) आहे. मीच धनसंपत्तीचं संयोजन करून (संगमनी) पृथ्वीसह वसुंना ते प्रदान करणारी आहे. मी परम ज्ञानानं युक्त (चिकितुषी) असून यज्ञसमयी ज्यांचं पूजन करण्यात येतं त्यांच्यात अग्रणी (प्रथमा) आहे. देवांनी मला नाना रूपं देऊन नाना प्रकारांनी प्रतिष्ठित केलं आहे. (विविध विद्वानांनी आणि भाषाशास्त्रींनी मला नाना भाषांची रूपं देऊन नाना तऱ्हेनं ख्याती मिळवून दिली आहे.) **'मया सो अन्नं अत्ति यो विपश्यति य: प्राणिति य ईं शृणोत्युक्तम्। अमन्तवो मां त उप क्षियन्ति श्रुधि श्रुत श्रद्धिवं ते वदामि ।।४।।'** जो माझा (वाग्देवी किंवा प्रतिभा) साक्षात्कार करतो, जो मला हृदयात धारण करतो आणि माझं कथन ऐकतो, तो या भौतिक जगाचा उपभोग घेतो. जे माझ्यावर विश्वास ठेवत नाहीत, ते स्वत:च नष्ट होतात. श्रद्धेस पात्र असे हे वचन स्वत: सांगते आहे.

**'अहं एव स्वयं इदं वदामि जुष्टं देवेभिरुत मानुषेभि:। यं कामये तं-तं उग्रं कृणोमि तं ब्रह्माणं तं ऋषिं तं सुमेधाम् ।।५।।'** हे मी स्वत: सांगते आहे की, देवता आणि मनुष्यमात्र सारेच माझी उपासना करतात, माझा आश्रय घेतात. माझी दयादृष्टी ज्याच्यावर असते त्याला मी तेजस्वी (उग्र) करते, त्याला ब्रह्मवेत्ता (ब्रह्म जाणणारा) करते. त्याला ऋषी आणि मेधावी करते.

**'अहं रुद्राय धनुरा तनोमि ब्रह्मद्विषे शरवे हन्तवा उ। अहं जनाय समदं कृणोम्यहं द्यावापृथिवी आ विवेश ।।६।।'**

मैं ब्रह्मद्वेष्ट्याचा विनाश करण्यासाठी मी रुद्राचं धनुष्य सुसज्जित करते. मी जनकल्याणासाठी युद्ध करते. मी द्युलोक आणि पृथ्वी सर्वत्र व्यापून आहे.

**'अहं सुवे पितरं अस्य मूर्धन् मम योनिरप्स्व् अन्त: समुद्रे। ततो वि तिष्ठे भुवनानु विश्वोतामूं द्यां वर्ष्मणोप स्पृशामि ।।७।।'** या विश्वाच्या मूर्धा म्हणजे शिरोभागी विराजमान असलेल्या द्युलोक किंवा आदित्यरूप मीच प्रसवते. त्यामुळेच या विश्वाचं संपूर्ण कार्य दिसून येतं.

दिव्य कारण-वारिरूप समुद्र म्हणजे असा ब्रह्मचैतन्यमय महासागर ज्यात सर्व प्राणी आणि पदार्थांचा उदय आणि विलय होतो. तो माझं निवासस्थान आहे. म्हणूनच मी समस्त भूतमात्रांत अनुप्रविष्ट होऊन राहते आणि त्यांना स्पर्श करून कार्यान्वित करत असते.

**'अहं एव वात इव प्र वाम्यारभमाणा भुवनानि विश्वा। परो दिवा पर एना पृथिव्यैतावती महिना सं बभूव ।।८।।'**


मीच वायूसारखी सर्वत्र व्याप्त आहे, मीच हा सगळा संसार निर्माण करते. मी द्युलोक आणि पृथ्वीच्या पलीकडे म्हणजे त्यांच्यापासून अलिप्त आहे. मी माझं सामर्थ्य प्रकट करते. 'ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति।' या न्यायाने वाणीला जाणणारा वाणीतच विलीन होतो, नेमका तोच भाव या सूक्तातही व्यक्त होतो. स्वयंप्रभ आणि आत्मभान असलेल्या म्हणूनच कीर्तिरूपानं उरलेल्या या वागाम्भृणी ऋषिकेची ही आठवकथा!

बोली आणि संस्कृती

प्रा. अजय देशपांडे

# भाळी चांदवा माह्या राजाचा...

बोली भाषेतील विविध शब्दांची निर्मिती ही चाकाचा शोध आणि निर्माण यासारखी आहे. चाकाच्या शोधाने माणसांचे जगणे आणि संस्कृती यात आमूलाग्र बदल घडवून आणले. बदलत्या काळानुसार चाकाचे



रूप बदलले. चाकाचे अस्तित्व अनेक प्रकाराने सर्वत्र असू लागले. बदलत्या काळानुसार चाकात खूपच बदल झाले; त्याची मूळ संकल्पना मात्र कायमच आहे. समजा आता चाक ही संकल्पना संपूर्ण नष्ट केली तर मानवाचे अतोनात आणि कधीही भरपाई होणार नाही असे नुकसान होईल.

भाषेतील शब्द चाकासारखे असतात ते वेगवेगळ्या रूप स्वरूपात भाषा आणि संस्कृतीची गतिमानता व जिवंतता कायम ठेवत असतात. बोलीतला शब्द विशिष्ट सामाजिक सांस्कृतिक आशयसंदर्भ घेऊन जन्मला असतो. शब्द काळानुसार बदलत जातात. त्याच्या अर्थातही काही बदल घडून येतात. पण शब्दांची भाषा टिकवून ठेवण्याची, तिची गतिमानता कायम ठेवण्याची मूळ संकल्पना आणि कृतिशीलता कायम राहत असते. शब्द हे बोलीचे मूलद्रव्य आहे. एखाद्या भाषेतील शब्दच हळूहळू नष्ट केले गेले तर ती भाषा बोलणाऱ्या लोकसमूहाची सामाजिक सांस्कृतिकदृष्ट्या झालेली हानी कधीच भरून निघणार नाही, हे समजून घेण्याची गरज आहे. एखाद्या शब्दाचा मृत्यू झाल्यानंतर कालांतराने कोशांच्या पानांवरूनही शब्दांचे अस्तित्व नष्ट केले जाते आणि शब्द नामशेष होतो; अशीही उदाहरणे आहेतच. लोकभाषांच्या शब्दसमृद्धीची कोशांतही मोजदाद नसल्याने भाषा मरणपंथाला लागल्याचे सांगितले जात नाही. विस्मृतीत गेलेले अथवा मृत्युपंथाला लागलेले लोकभाषेत शब्दांचे अर्थ जर आजच्या मराठी भाषेत सांगितले नाहीत तर ते शब्द परभाषेतील वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही, एवढे ते आज अपरिचित झाले आहेत. लोकबोलीतील 'चांदवा' हा शब्द अनेक सांस्कृतिक सामाजिक अर्थसंदर्भांनी परिपूर्ण असा आहे. ना. धों. महानोरांच्या एका कवितेत हा शब्द आला आहे. 'गाव कोसाला पाणतळ्याला सात गौळणी आल्या पाण्याला तांब्या घागरी पाणी भरती साऱ्या गौळणी खेळ मांडती' 'एक गौळण गीत म्हणते पाणी फेकते चोळी भिजते नाव घेण्याचा हट्ट धरते पाणी सांडते मम' 'आंब्या साप्याचं हिरव्या चाफ्याचं नाव घेते वोऽऽ नाव घेते वोऽऽऽ चांद मोत्याचा भांग मोत्याचा भाळी चांदवा माह्या राजाचाऽऽ' ना. धों. महानोर यांच्या 'रानातल्या कविता' या संग्रहातली ही २२ क्रमांकाची कविता. गावापासून कोसभर दूर असणाऱ्या पाणतळ्यावर पाणी भरायला गेलेल्या सात गौळणी. त्या जवळपास समवयस्क आहेत. तरुण आहेत. पाणतळ्याजवळ आता त्यांच्याशिवाय कुणीच नाही, म्हणून त्या खेळ मांडतात. एक गौळण गाणं म्हणते, कुणीतरी एक दुसरीच्या अंगावर पाणी फेकते, अंग भिजते, चोळी भिजते आणि अशा सलज्ज अवस्थेतल्या एकीला दुसरी नाव घेण्यासाठी आग्रह धरते, तिच्या अंगावर पुन्हा पाणी टाकते. नाव घेण्याचा हट्ट धरते आणि शेवटी ती नाव घेते. हे नाव घेणे थेट लोकवाणीतीलच आहे. पहिल्या दोन ओळींत ती नवऱ्याचं नाव घेते; पण पुढच्या दोन ओळी मोठ्या सूचक आहेत. तिच्या कपाळावरचे कुंकू 'चांद मोत्याचा'. तिच्या भांगातले कुंकू 'भांग मोत्याचा'. कपाळावरचे कुंकू आपल्या राजाची निशाणी असल्याचे सूचित करते. 'भाळी चांदवा माह्या राजाचाऽऽ' असे ती अभिमानाने म्हणते. 'चांदवा' हा लोकवाणीतील शब्द मोठा अन्वर्थक आहे. कपाळावरचे चंद्रासारखे ठसठशीत कुंकू हा अर्थ तर आहेच; पण 'चांदवा' म्हणजे तान्ह्या मुलाचा पाळणा किंवा पाळण्यावरचा चमचमता मंडप असाही एक अर्थ लोकवाणीत आहे. नवऱ्याचे नाव घेताना आपल्या उदरात वाढणाऱ्या जिवाची चाहूलही ती व्यक्त करते. 'भाळी चांदवा माह्या राजाचाऽऽ' या ओळीत तिला होणाऱ्या मुलाचा आठव आहे किंवा ती आई होणार असल्याचे सूचित करीत आहे. तिच्या पोटी त्याची खूण अंकुरली असल्याचे ती सांगत आहे. 'चांदवा' या लोकवाणीतल्या शब्दाचे सुरेख उपयोजन येथे केले आहे. महानोरांच्या 'गंगा वाहू दे निर्मळ' या संग्रहातल्या पाचव्या क्रमांकाच्या कवितेत पुढील ओळी आहेत. 'निरखित बसली, अंगावरली, पिवळीधम्मक साय गऽ पोटी गर्भ सौभाग्याचा, शकून सांगे माय गऽ' येथे 'पोटी गर्भ सौभाग्याचा, शकून सांगे माय गऽ' या शब्दांचा अर्थाचा अनुबंध 'भाळी चांदवा माह्या राजाचा' या ओळीशी आहे. खरं तर मराठवाड्यातील अनेक शब्दांचे नाते उर्दू शब्दांशीसुद्धा आहे. उर्दूतील 'चँदवा' हा शब्द बोलीतील 'चांदवा' या शब्दाच्या जवळचा असू शकतो. चँदवा म्हणजे मोराच्या पिसाच्या मध्यभागी असणारा सुंदर डोळा.

(पान ६ वर)

उगवतीचे रंग

भ्र. ९४०३७४९९३२
विश्वास देशपांडे

# जॅकपॉट

ही गोष्ट आहे साधारण पाच वर्षांपूर्वीची. त्यावेळी मी 'घे भरारी' या नावाचा लेख नुकताच लिहिला होता आणि तो समाज माध्यमांद्वारे वाचकांपर्यंत पोहोचला होता. हा लेख 'सीबिस्कीट' या चित्रपटाशी संबंधित होता. या चित्रपटात असे दाखवले आहे की सीबिस्किट या नावाचा एक अश्व रेस खेळताना जबर जायबंदी होतो. सगळ्यांना असे वाटते की यापुढे हा रेसमध्ये भाग घेऊ शकणार नाही. परंतु आश्चर्य म्हणजे त्यातूनही तो उभा राहतो भरारी घेतो आणि रेस जिंकतो. एका दुर्दम्य इच्छाशक्तीची ही अत्यंत प्रेरणादायी अशी कथा आहे.

एके दिवशी हा लेख वाचून मला एका वाचक भगिनीचा फोन आला. त्या म्हणाल्या, नमस्कार, मी सरिता वाकलकर पुण्याहून बोलते आहे. मी आपला 'घे भरारी' हा लेख वाचला. आपण हॉर्स रेसिंगशी संबंधित आहात का? आपण रेस खेळता का? असे प्रश्न त्यांनी विचारले आणि मी आश्चर्यचकित झालो. मी म्हटले, नाही बुवा. मी फक्त त्या चित्रपटाबद्दल लिहिले. हॉर्स रेसिंग बद्दल मला फारशी माहिती नाही आणि मी कधी रेस खेळलो नाही. पण आपण असे का विचारता आहात? त्या म्हणाल्या, कारण मी हॉर्स रेसिंगशी संबंधित आहे. मी रेस खेळले आहे. आता आश्चर्यचकित होण्याची माझी पाळी होती. मी म्हटले, काय, आपण रेस खेळता? त्या म्हणाल्या एकेकाळी मी रेस खेळत होते आणि त्यात मी उत्तमप्रकारे पैसेही मिळवले आहेत. आता माझे वय ८३ वर्षे आहे. म्हणजे साधारण त्या माझ्या आईच्या वयाच्याच होत्या. हॉर्स रेसिंग हा अजूनही एक प्रकारचा जुगारच मानला जातो आणि अशा या अश्व शर्यतीत चक्क एका महिलेने भाग घ्यावा. तोही ४०/४५ वर्षांपूर्वी! आणि अशा महिलेचा मला फोन यावा याचे मला आश्चर्य वाटले. त्याहूनही जास्त आश्चर्य मला या गोष्टीचे वाटले की त्यांनी या वयात माझा लेख वाचून मला फोन केला होता.

मला त्यांच्याबद्दल खूपच कुतूहल वाटले. त्यांच्याबद्दल अधिक जाणून घ्यावेसे वाटले. नंतर माझे आणि त्यांचे काही वेळा फोनवर संभाषणही झाले. त्यांनी मला पुण्याला आल्यानंतर भेटीसाठी येण्याचे निमंत्रण दिले. आपण काही पुस्तके लिहिल्याचेही त्यांनी सांगितले. आणि माझा पत्ता विचारून त्यांनी लिहिलेले 'जॅकपॉट' हे पुस्तक मला पाठवून दिले. हे पुस्तक हातात आल्यानंतर मी जणू काही एक अद्भुत कादंबरी वाचतो आहे किंवा एखादा उत्कंठावर्धक चित्रपट पाहतो आहे असेच मला वाटले. हे पुस्तक संपेपर्यंत मला खाली ठेवावेसे वाटेना. सरितातार्इंचा जन्म नामदेव शिंपी समाजात झाला. त्यांच्या वडिलांचे पुण्यात बुधवार पेठेत शंकरराव पाटसकर अँड कंपनी या नावाचे कापडाचे दुकान होते. एका मोठ्या एकत्र कुटुंबामध्ये त्या राहत होत्या. त्यांच्या वडिलांनी दोन लग्ने केली. त्यांच्या आईला एकूण दोन मुली आणि चार मुलगे होते. तर शकुंतला या नावाच्या दुसऱ्या आईला चार मुली आणि दोन मुलगे होते. त्यांना दोन सख्खे काका होते. त्यांचे वडील पुरोगामी विचारांचे होते. त्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाची आवड होती. सिनेमा, नाटक, मेळे यासारख्या विविध कार्यक्रमांना ते जात असत. जाताना आपल्या सोबत घरातील मुलांना देखील बरोबर नेत असत. त्यामुळे मुलांमध्ये आपोआपच सांस्कृतिक कार्यक्रमाची आवड निर्माण झाली, वैचारिकदृष्ट्या मुले प्रगल्भ झाली आणि त्या माध्यमातून अनौपचारिक असे शिक्षणही त्यांना मिळाले. सरितातार्इंचे शिक्षण भावे हायस्कूल, कसबा पेठेतील म्युनिसिपल शाळा, सेवासदन इत्यादी ठिकाणी नववीपर्यंत झाले. त्या अभ्यासात हुशार असून त्यांना शिक्षणाची आवड होती. आईने त्यांच्यावर उत्तमसंस्कार केले. त्यांच्या लहानपणीचा एक प्रसंग पुस्तकात दिला आहे. शाळेतील एका श्रीमंत घरच्या एका विद्यार्थिनीच्या सुंदर चपला त्यांना आवडल्या आणि त्यांनी कोणाचे लक्ष नाही असे पाहून त्या चपला चोरून आणल्या आणि घरात लपवल्या. परंतु जेव्हा त्यांच्या आईच्या लक्षात ही गोष्ट आली तेव्हा आई त्यांना अतिशय रागावली आणि त्या चपला शाळेत परत करून ये नाहीतर मी तुझ्याशी बोलणार नाही अशा प्रकारची ताकीद दिली. त्यांच्या सावत्र आईने म्हणजेच शकुंतलाबाईंनी त्यांचे लग्न तिथून जवळच असणाऱ्या वाड्यातील एका मुलाशी लावण्याचा घाट घातला. हा मुलगा, हे घर योग्य नाही असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यामुळे त्यांनी त्या गोष्टीला निक्षून विरोध केला. शिक्षणाची आवड असल्यामुळे मॅट्रिकच्या परीक्षेला बाहेरून बसायचे असे त्यांनी ठरवले आणि त्यासाठी एक क्लास लावला. याच दरम्यान पुढे योगायोगाने श्री शंकरराव वाकलकर यांच्याशी ओळख झाली. त्यांचे विचार आणि मने जुळली आणि



एकमेकांना कायमस्वरूपी साथ देण्याचा निश्चय त्यांनी केला. शंकरराव वाकलकरांचे पुण्यात स्टेशनरीचे एक प्रसिद्ध दुकान होते. तेथून केवळ पुण्यातच नव्हे तर महाराष्ट्रातील बर्याच ठिकाणी स्टेशनरीचा पुरवठा केला जात असे. शंकरराव हे ब्राह्मण समाजातील होते. अशा रीतीने सरितातार्इंच्या आयुष्याला एक वेगळी कलाटणी मिळाली. त्यांच्या आणि शंकररावच्या वरचेवर भेटी होऊ लागल्या. मात्र एक मोठी अडचण होती. ती म्हणजे दोघांच्याही घरून त्यांच्या लग्नाला मोठा विरोध होता. एकदा ते आळंदीला दर्शनासाठी गेले असताना मंदिरातील पुजाऱ्याने त्यांना नवरा-बायको समजून आशीर्वाद दिला. हा शुभशकुन समजून आपल्या एका मित्राच्या घरी ते राहिले. आणि तेथेच त्यांनी एकमेकाला वरमाला घातली. आपण लग्न केले आहे हे आपल्या घरच्यांना कळू न देता हे दोघेही एक भाड्याचे घर घेऊन वेगळ्या राहीले. त्यांच्या संसाराला सुरुवात झाली. त्यांच्या गाठीभेटी, त्यांच्यातील प्रेमया सगळ्या गोष्टी जशा रोमांचक होत्या तशाच अनेक अडचणींना देखील त्यांना तोंडही द्यावे लागले. परंतु दोघांचेही एकमेकांवर जीवपाड प्रेमअसल्यामुळे त्यांनी या सर्व अडचणींवर मात केली. सरितातार्इंना आपल्या मनाजोगता जोडीदार मिळाला होता आणि शंकररवांना आपली आवडती सहचारिणी. यथावकाश त्यांच्या संसार वेलीवर तीन फुले उमलली. दोन मुली आणि एक मुलगा. अनिता, तरिता आणि चेतन. या मुलांच्या शिक्षणाकडे आणि त्यांच्यावर उत्तमसंस्कार कसे होतील याकडे सरितातार्इंनी अत्यंत काळजीपूर्वक लक्ष दिले. त्यांच्यावर संस्कार केले. शंकररावांचे जरी त्यांच्यावर जीवापाड प्रेमहोते तरी त्यांच्या स्वच्छतेच्या सवयी जगावेगळ्या होत्या किंबहुना काही वेळा त्याचा अतिरेक ते करत असत. पण त्यांच्या या सगळ्या लहरी देखील सरितातार्इंनी सांभाळल्या. शंकररावांना नवनवीन मोटार गाड्या घेण्याची आणि चालवण्याची आवड होती. त्याचप्रमाणे हॉर्स रेसिंगमध्ये त्यांना खूप रस होता. घोड्यांच्या शर्यतीत भाग घेण्यासाठी ते बर्याच वेळा रेस कोर्सवर जात असत. घोड्यांवर पैसे लावत असत. काही वेळा जिंकत आणि काही वेळा हारतही. मग ते काही वेळा आपल्या सोबत सरितातार्इंनाही घेऊन जाऊ लागले. सुरुवातीला अशा ठिकाणी जाणे सरितातार्इंना आवडत नव्हते. परंतु त्यांना लवकरच त्याची सवय झाली.

शर्यतीत कोणता अश्व जिंकेल याबद्दलचे त्यांचे अंदाज बऱ्याच वेळा बरोबर येऊ लागले. कोणता अश्व जिंकेल याचे संकेत त्यांना नकळत आपल्या अंतरातून मिळायला लागले. मग त्यांनी अश्व शर्यतीचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास केला. त्यांचे गणितही उत्तमहोते. त्याचा त्यांना या अभ्यासात उपयोग झाला. शर्यतीत कोणता अश्व जिंकेल याबद्दलचे त्यांचे अंदाज, त्यांचा अभ्यास किंवा त्यांचे भाकीत बरोबर येऊ लागले. आता त्यांना अश्व शर्यतीतून चांगल्या प्रकारे कमाई होत होती. हे करत असताना मात्र त्यांनी आपल्या घराकडे आणि मुलांकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. अनिताला जग फिरण्याची आवड होती. त्याप्रमाणेच तिने आपले क्षेत्र निवडले आणि ती एअर होस्टेस झाली. तरिता राज्यशास्त्र हा विषय घेऊन बीए झाली. पुढे ती एल एल बी उत्तीर्ण झाली. चेतन देखील अभ्यासात अतिशय हुशार होता. तो इलेक्ट्रिकल इंजिनियर झाला. अनिता एअर होस्टेस झाली आणि मग तिच्याबरोबर शंकरराव आणि सरिताताई जवळपास संपूर्ण जग फिरले. इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटची त्यांनी स्थापना केली. सरितातार्इंना अनेक मोठमोठ्या व्यक्तींचा सहवास लाभला.

आयुष्यात जसे सुखाचे दिवस येतात तसाच दु:खाचाही काळ येतो. अशीच संकटे सरितातार्इंवर ओढवली. २००३ मध्ये शंकर रावांचे दु:खद निधन झाले आणि सरितातार्इंवर फार मोठा आघात झाला. या दु:खातून सावरत नाही तोच अनिताला कॅन्सर असल्याचे निष्पन्न झाले आणि २००६ मध्ये ती देखील हे जग सोडून गेली. जेव्हा त्यांनी मागे वळून पाहिलं तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की आपल्याजवळ इतरांना सांगण्यासारखा आणि आगळावेगळा असा अनुभवाचा खजिना आहे. आपलं आयुष्य त्यांनी जणू एका धुंदीत घालवलं परंतु ते जगताना त्या कधीच बेधुंद झाल्या नाहीत. त्यांचे पाय सतत जमिनीवरच राहिले. त्यांच्या 'जॅकपॉट' या आत्मचरित्रात त्यांनी कोणताही आड पडदा न ठेवता सगळ्या गोष्टी जशा घडल्या तशाच सांगितल्या आहेत. त्यांच्या भाषेमध्ये एक नैसर्गिक सौंदर्य असल्यामुळे वाचक अत्यंत उत्कंठेने हे पुस्तक वाचत जातो आणि ते पूर्ण केल्याशिवाय ते खाली ठेवण्याची इच्छा होत नाही इतके ते मनोवेधक झाले आहे. हे पुस्तक वाचताना सरितातार्इंचा प्रांजळपणा जसा जाणवतो तशीच जीवनाचा आनंद घेण्याची वृत्ती आणि त्यांची रसिकता ठायी ठायी जाणवल्याशिवाय राहत नाही.

आज सरितातार्इंचे वय ८८/८९ वर्षे आहे. वयानुसार त्या थकल्या आहेत परंतु स्मरणशक्ती उत्तम आहे. मी पुण्यात गेलो तेव्हा त्यांची सहकुटुंब भेट घेतली. त्यांनी आमचे उत्तम आदरातिथ्य केले. मी माझी काही पुस्तके देखील त्यांना भेट दिली. अजूनही रोज काहीतरी वाचन केल्याशिवाय त्या झोपत नाहीत. त्यांचे 'जॅकपॉट' हे पुस्तक मुळातून वाचण्यासारखे आहे. इतरही काही पुस्तके त्यांनी लिहिली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यात पूर्वीचे पुणे, त्याचप्रमाणे त्यांच्या काही हृदयस्पर्शी आठवणी यासारख्या गोष्टींचा समावेश आहे. परंतु ती पुस्तके आता उपलब्ध होऊ शकली नाहीत. पण खरोखरीच इतरांनी प्रेरणा घ्यावी अशा प्रकारचे त्यांचे जीवन आहे. त्यांना मिळालेले जॅकपॉट हे त्यांच्या प्रयत्नांचे आणि अभ्यासाचे फलित आहे.

# ग्रहसंकेत

**(रविवार, ५ एप्रिल ते शनिवार, ११ एप्रिल २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार

'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ५ एप्रिल-** संकष्ट चतुर्थी,(चंद्रोदय- मंबई-२१: ४७, अहिल्यानगर-२१: ३९, कलबुर्गी-२१: २७, कोल्हापूर-२१: ३७, जालना-२१: ३६, धाराशिव-२१: ३२, नांदेड-२१: २८, पंढरपूर-२१: ३४, परभणी-२१: ३१, पुणे-२१: ४२, बीड-२१: ३५, लातूर-२१: ३०, विजयपूर-२१: ३१, छत्रपती संभाजीनगर-२१: ३२, सातारा-२१: ३९, सोलापूर-२१: ३१), दुसरी तीज, नागनाथदेव (खर्ग) पालखी वडवळ (जि. सोलापूर), धानाई यात्रा कार्वे ता. कराड, ईस्टर संडे, औंध यात्रा खटाव, धोंडोपंतदादा पुण्यतिथी पंढरपूर ✻ **सोमवार, ६ एप्रिल-** श्री सदगुरू काडसिध्देश्वर स्वामी महाराज जयंती कणेरी, कृष्णामाई यात्रा कराड, ब्रम्हनाथदेव यात्रा डोर्ली, श्री बीरदेव यात्रा कुरंदवाडी, धुळोबा यात्रा आळते (ता. हातकणंगले) ✻ **मंगळवार, ७ एप्रिल-** जागतिक आरोग्य दिन, श्री चंदलादेवीचा उत्सव, शांतादुर्गा रथोत्सव, भैरवनाथ यात्रा भैरववाडी (ता. तासगाव) ✻ **बुधवार, ८ एप्रिल-** तिकोटेकर महाराज पुण्यतिथी विजापूर, म्हंकाळेश्वर (दरगोबा देव) यांत्रा पारे (ता.खानापूर) ✻ **गुरुवार, ९ एप्रिल-** भैरवनाथ यात्रा चोपडी (ता. पाटण), जोगेश्वरीदेवी, काळभैरव यात्रा कंडारी सोनारी (परंडा)✻ **शुक्रवार, १० एप्रिल-** कालाष्टमी, नाथभैरव यात्रा देवर्डे (जि. सांगली), यमाई यात्रा मार्डी (जि. सोलापूर), अन्नपूर्णादेवी यात्रा मानेगाव (ता. माढा), भैरवनाथ यात्रा भिगवण, नाथ भैरव सिध्दाष्टमी उत्सव फुलचिंचोली ✻ **शनिवार, ११ एप्रिल-** महात्मा फुले जन्मदिन, खंडोबा यात्रा कोकळे, राष्ट्रीय सुरक्षित मातृत्व दिन, श्री सिध्देश्वर यात्रा उपळावी (ता. तासगाव)

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ८ (१९ पर्यंत), १०, ११ एप्रिल ✻ **डोहाळ जेवण-** ६ एप्रिल (१५ पर्यंत), ✻ **गृहप्रवेश-** ८ एप्रिल

### मेष :- चिंता नको

मनाची श्रीमंती पैशांपेक्षा मोठी आहे. व्ययात रवि, मंगळादि पापग्रह असल्याने धनचिंता राहणार आहे. मन विचलीत होऊ देऊ नका. राशीतील शुक्र सौख्य देईल. अनावश्यक खर्च टाळायलाच हवेत. गुंतवणूक विचाराने करावी. डोळ्यांच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. गुरूकृपेने सर्व मनासारखे घडेल. शुभ ता. १०, ११

### वृषभः- दगदग टाळावी

माणसाने माणसाशी माणसारखे वागणं हीच खरी भक्ती व शक्ती आहे. लाभस्थानी पंचग्रही जमली आहे. धनस्थ गुरूही समस्यातून मार्ग काढत जाणार आहे. नव्या विचारांना चालना मिळेल. प्राप्ती विविध मार्गांनी समाधानकारक होत जाईल. नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. अडचणीतून मार्ग निघत जाईल. सुसंधी लाभतील. दगदग टाळावी. शुभ ता. ८, १०

### मिथुनः- संधीचे स्वागत करावे

माणुसकी जेथे जपली जाते, तेथेच खरा विठ्ठल उभा असतो. राशीतील गुरूमुळे आपला विचार व्यापक व परोपकारी असेल. कार्यक्षेत्रात पाप ग्रहांमुळे समस्या भासल्या तरी मार्गही निघत जाईल. कला - गुणांतून अर्थाजन घडेल. सरकारी नोकरीत अनुकूलता राहील. नव्या संधीचे स्वागत करावे. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. शुभ ता. ९, ११

### कर्कः- अपेक्षित घटना

सत्याचं रूप एकच, असत्य मात्र बहुरूपी असत. सुखेश, लाभेश शुक्र कर्मस्थानी असल्याने कार्यक्षेत्रात आनंददायी घटना घडतील. कला-गुणांचा विकास होत जाईल. संघर्षातून भाग्योदय होईल. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावेत. अडचणीतून वेळीच मार्ग निघत जाईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १०, ११

### सिंहः- समस्या संभवतात

जीवन एक रंगमंच आहे, त्यावर आपणास विविध भूमिका कराव्या लागतात. अष्टमातील पापग्रहांमुळे आपले शारीरिक स्वास्थ बिघडण्याची शक्यता आहे. आर्थिक बाबतीतही काही समस्या निर्माण होणार आहेत. आपल्या कर्तव्य कर्मास प्राधान्य द्यावे. संततीसंबंधात शुभ घटना घडतील. कार्यक्षेत्रात विशेष जागरूक असावे. समस्या संभवतात. शुभ ता. ९, ११

### कन्याः- वादाचे प्रसंग टाळावेत

कोणी कितीही घेरलं तरी स्वतःचे अस्तित्व स्वतः निर्माण करता यायला पाहिजे. राशीसमोरच सध्या रवि, मंगळादि ग्रह आहेत. त्यामुळे कालचा दिवस बरा होता, असे म्हणण्याची वेळ येईल. आपले स्वास्थ टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करावा. वादाचे प्रसंग कसोशीने टाळावेत. धरसोडपणा टाळून विचाराने रहावे. वडिलांशी मतभेद टाळावेत. शुभ ता. ८, ११

### तुलाः- आरोग्य बिघडेल

गुंता व चिंता यांना कधीच अंत नसतो. षष्ठातील रवि, मंगळादि ग्रहांमुळे आपले आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. कौटुंबिक जीवनात समाधानाच्या घटना घडतील. स्पर्धांमध्ये यश मिळेल. यांत्रिक, प्रशासन क्षेत्रात विशेष अनुकूलता लाभेल. अडचणींची चिंता नको. मार्ग निघत जाईल. भाग्यवृध्दिंगत करणार्या घटना घडतील. शुभ ता. १०, ११

### वृश्चिकः- मतभेद टाळावेत

प्रश्न आपला आपणच सोडवायचा असतो. पाठीशी भगवंत असतो. पंचमात रवि, मंगळादि ग्रह असल्याने आर्थिक गणित चुकण्याची शक्यता आहे. जमाखर्चाचा विचार करून पुढील व्यवहार करावेत. सुखस्थ राहूमुळे थोडी अस्वस्थता राहिल. मतभेदाचे प्रसंग टाळावेत. भागीदारीच्या व्यवसायात समस्या संभवतात. शुभ ता. ९, ११

### धनुः- नशिबाला दोष देऊ नका.

साक्षात भगवंताने सुध्दा प्राक्तन भोगले, आपण तर माणूस आहोत. सुखस्थानी पापग्रह असल्याने कोणत्याना कोणत्या समस्येला तोंड द्यावे लागेल. नशिबाला दोष देऊ नका. चांगल्याच मार्गावरून चालावे, संकटे येणार नाहीत. स्थावर प्रश्न वाढवू नका. फार दगदगही सध्या टाळायला हवी. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. शुभ ता. ९, १०

### मकरः- घाईने निर्णय नकोत

खूष राहणे हीच जीवनातील मोठी दौलत आहे. पराक्रमातील पापग्रहांमुळे चार पाऊले पुढे व दोन पाऊले मागे अशिच गती सध्या राहणार आहे. त्यामुळे कोणत्याही बाबतीत फार आग्रही राहू नका. सुखस्थ शुक्रामुळे सौख्याच्या घटना घडतील. नवे विचार विचारपूर्वक स्वीकारावेत. घाईने निर्णय नकोत. शुभ ता. ९, ११

### कुंभः- फार चिंता करू नका

आरोग्यापेक्षा मोठे कोणतेही धन नाही. राशीत राहू, धनात पापग्रह त्यामुळे आर्थिक समस्या संभवतात. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. पंचमातील गुरू त्रास फार वाढविणार नाही. विचारपूर्वक वाटचाल करावी. गुंतवणूक विचाराने करावी. कलेत प्रगती होत जाईल. संततीबाबत शुभ घटना घडतील. फार चिंता करू नका. शुभ ता. १०, ११

### मीनः- सामंजस्याने रहावे

निरोगी व्यक्तीच जीवनात खरा आनंद मिळवित असते. आपल्या राशीतच सध्या रवि, मंगळादि पापग्रह आहेत. त्यामुळे आपले स्वास्थ टिकविण्याकडे अधिक लक्ष द्यावे. नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. उष्णतेपासून त्रास संभवतो. काळजी घ्यावी. भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. दगदग टाळावी. शुभ ता. ११

!! शुभ भवतु !!

पान ४ वरून

## पृथ्वीचा 'आईस हाऊस' ते 'ग्रीन...

डायनासोरांच्या युगात, विशेषतः मेसोजोईक काळात वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण जास्त होते आणि पृथ्वी तुलनेने उष्ण होती. ध्रुवीय भागातही वनस्पती वाढत होत्या. उष्णतेमुळे समुद्रपातळी वाढली आणि अनेक सखल भाग पाण्याखाली गेले.

ज्वालामुखीय उद्रेकांमुळे वातावरणात मोठ्या प्रमाणावर हरितगृह वायू साचले, तापमान झपाट्याने वाढले आणि समुद्रातील ऑक्सिजन कमी झाला. परिणामी सुमारे ९० टक्के सागरी प्रजाती नष्ट झाल्या. या घटनेने दाखवून दिले की, हवामानातील तीव्र बदल जीवनासाठी खूप घातक ठरू शकतात. पृथ्वीच्या पृष्ठभागावरील टेक्टॉनिक प्लेट्सची हालचाल ही दीर्घकालीन हवामान बदलाची एक महत्त्वाची शक्ती आहे. खंडांचे एकत्र येणे किंवा विभक्त होणे, महासागर प्रवाहांचे स्वरूप बदलणे आणि पर्वतरांगा उभारल्या जाणे या सर्वांचा हवामानावर खोलवर परिणाम होतो. हिमालयासारख्या पर्वतरांगांच्या निर्मितीमुळे कार्बन डाय ऑक्साईडचे शोषण वाढले आणि पृथ्वीच्या थंडाव्यास हातभार लागला, असे अनेक अभ्यास सुचवतात. (लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## भाळी चांदवा माह्या राजाचा...

'सोहत हैं चँदवा सिर मोर के जैसिय सुंदर पाग कसी हैं। मोरन के चँदवा माथे बने राजत रुचिर सुदेस री। बदन कमल ऊपर अलिगन मनों घूँघरवारे केस री।' या ओळी चँदवा या उर्दू आणि हिंदीतील शब्दाचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या आहेत. बोलीतील 'भाळी चांदवा माह्या राजाचा' या आशयघन ओळीतील चांदवा म्हणजे मोरपिसाच्या मध्यभागी असणाऱ्या डोळ्याएवढे कुंकू! कपाळावर चांदवा दिमाखाने मिरवत आहे. कारण 'पोटी गर्भ सौभाग्याचा' आहे.

डोळ्यात आई होण्याचे स्वप्न आहे. होणाऱ्या लेकराच्या पाळण्याला बांधणारा चमचमता चांदवा कुंकू लावताना सारखा डोळ्यासमोर येत आहे. आता बोलीतील 'चांदवा' हा अर्थसघन शब्द आणि त्याचे सांस्कृतिक संदर्भही लुप्त झाले आहेत.

तत्त्वदर्शन

डॉ. राजेंद्र डोळक

# वैज्ञानिक पद्धती



तत्त्वज्ञान आणि विज्ञान या दोन्ही शब्दात 'ज्ञान' हा शब्द आहे. या शब्दात 'ज्ञा' हा जो मूळ धातू त्याचा अर्थ 'जाणणे' असा होतो. जगातील, सृष्टीतील सर्व व्यवहार हे माहीत करून घ्यायचे असतात, जाणून घ्यायचे असतात. म्हणजेच त्यांचे ज्ञान प्राप्त करून घ्यायचे असते. हे सर्व माहिती करून घेण्याकरिता आपल्याकडे विद्येची म्हणजेच विद्यादानाची परंपरा निर्माण करण्यात आली. परंतु मुळात विद्या व ज्ञान यात फरक आहे. विद्या ही स्वरूपाने तांत्रिक म्हणजे एकीकडून दुसरीकडे संक्रमित केली जाते, तर ज्ञान हे अनुभव व चिंतन याद्वारे प्राप्त होते. विद्या बुद्धीशी संबंधित असते हे खरे आहे; तथापि ती पढीक असू शकते.

ज्ञान मात्र आत्मसात केलेले असते. ज्ञानाचा प्रत्यक्ष शिक्षणाशी संबंध असतोच असे नाही. अशिक्षित माणूसही ज्ञानवान असू शकतो. पढतमूर्ख आणि ज्ञानी यातील फरक त्यामुळेच कळतो. विद्येचा जाणिवेशी संबंध नाही; पण ज्ञान हीच जाणीव आहे, असे मानण्याची आपल्याकडे परंपरा आहे. अशा या ज्ञानाचे महत्त्व जीवनात किती असते हे सांगण्याची आवश्यकता नाही.

मनुष्याच्या जीवनात ज्ञानाचे सदासर्वकाळ महत्त्व आहे. ज्ञानाशिवाय कोणताच व्यवहार होणे शक्य नसते. आपल्या व्यवहारातील एकही क्षण असा जात नसेल ज्याला ज्ञान चिकटले नाही. एखादी वस्तू, पदार्थ अथवा घटना याबद्दलची यथार्थ माहिती अथवा सत्य करून घेणे म्हणजे ज्ञान. हे ज्ञान आपल्याला स्वतःच्या किंवा इतरांच्या बुद्धीने होत असते. परंतु हे ज्ञान 'यथार्थ' असले पाहिजे. मिथ्या अथवा चुकीचे नको. नाहीतर 'सहा आंधळे आणि हत्ती' या कथेसारखी आपली अवस्था व्हायची. एकाच वस्तूचे भिन्नभिन्न व्यक्तींना भिन्नभिन्न ज्ञान प्राप्त होत असेल तर त्या वस्तूच्या ज्ञानाला मूल स्वरूपाचे ज्ञान म्हणता येणार नाही. ते व्यक्तिनिद्र सत्य असू शकेल, परंतु वस्तुनिद्र सत्य राहू शकणार नाही. म्हणून प्रत्यक्ष अथवा प्रमाणाने होणारे सत्य किंवा असत्य याबद्दलचा निर्णय म्हणजेच निश्चयात्मक ज्ञान. ॲरिस्टॉटलने 'मनुष्य हा बुद्धिवादी प्राणी आहे' असे म्हटले आहे.

बुद्धीच्या या देणगीतूनच त्याचे सतत चिंतन चालू असते आणि त्यातूनच तत्त्वज्ञान निर्माण होत असते. ॲरिस्टॉटलचा गुरू प्लेटो याने 'तत्त्वज्ञानाचा उगम कुतूहलातून होतो' असे म्हटले आहे. 'तत्त्वज्ञानात्मक चिंतन' म्हणजे एका पद्धतीने व एका दृष्टिकोनातून एखाद्या विषयाचे चिंतन करीत त्याच्या मुळापर्यंत पोहोचणे. मनुष्याला जसजसे प्रश्न पडतात तसतसे त्यांची उत्तरे तो शोधीत जातो आणि मुळापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतो. एकदा त्याला प्रश्न पडणे बंद झाले की शेवटले उत्तर हे तत्त्वज्ञान बनते. परंतु कालांतराने पुन्हा त्याला किंवा दुसऱ्याला त्या विषयाविषयी प्रश्न पडले तर नवीन प्रश्न हा जुन्या प्रश्नांची जागा घेतो आणि पुन्हा त्याचे तत्त्वचिंतन सुरू होते.

'पाणी' हे विश्वातील एक तत्त्व म्हणून मान्य आहे; पण मनुष्याच्या चिकित्सक बुद्धीने एवढ्यावरच न थांबता त्याने आणखी त्याच्या मुळाशी जाऊन शोध घेतला. त्यावेळी त्याच्या हे लक्षात आले की, पाणी हे मूलद्रव्य नसून त्याच्या मुळाशी हायड्रोजन व ऑक्सिजन ही मूलद्रव्ये असतात. सृष्टीतील या तत्त्वांचा शोध अथवा घटनांचा बुद्धीस पटेल, असा कार्यकारणसंबंध उलगडून दाखविणे म्हणजेच विज्ञान होय. भारतीय परंपरेत सर्व विद्या व ज्ञान दोन प्रकारात विभागल्या होत्या- पराविद्या आणि अपराविद्या.

पराविद्या म्हणजे ब्रह्मविद्या तर अपराविद्या म्हणजे भौतिक जगताचे ज्ञान. यालाच अध्यात्मवाद आणि भौतिकवाद किंवा तत्त्वज्ञान आणि विज्ञान असेही म्हणता येईल. विज्ञान याचा अर्थ विशेष ज्ञान. या शब्दात ज्ञान या शब्दामागे 'वि' हा उपसर्ग लागला आहे. 'वि' याचा अर्थ जे अज्ञात असते त्याचे ज्ञान होणे. किंवा सामान्य ज्ञानाचे विशेष ज्ञान होणे. जे आतापर्यंत काहीसे धुसर आणि वरवरचे होते ते आता स्वच्छ प्रकाशमान झाले. आपण प्रत्यक्षाचा विषय असलेला निसर्ग आणि सृष्टी यांच्या सान्निध्यात राहत असतो. यात असंख्य पदार्थ असतात, घटना असतात. या घटना कशा घडतात, त्यामागे काय कारणे असतात याचा शोध विज्ञान घेत असते. कारण कारणाशिवाय कार्य होत नाही. हा कार्यकारणभाव शोधणे हेच विज्ञानाचे कार्य असते. दुसऱ्या शब्दांत सत्यनिर्णयाची कसोटी निश्चित करण्याचे कार्य विज्ञान करीत असते. या सत्याच्या कसोटीला स्वतःचे इंद्रियानुभव व त्यावर आधारलेला तर्क किंवा अनुमान यांचा आधार असतो. कार्यकारण मालिकेच्या अगदी मागे मागे जात त्याच्या मूळापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करणे हे जे विज्ञानाचे उद्दिष्ट आहे तेच उद्दिष्ट तत्त्वज्ञानाचेही आहे.

भगवद्गीतेत हेच स्पष्टपणे सांगितले आहे. भगवान म्हणतात 'सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययसमीक्षते। अविभक्तं विभक्तेषु तत्ज्ञानमं विद्धि सात्त्विकं।।' (१८-२०) याचा अर्थ सृष्टीतील अनेक व्यक्त पदार्थांत एकच अव्यक्त मूलद्रव्य आहे हे ज्याने समजते ते ज्ञान म्हणजेच तत्त्वज्ञान. तसेच 'यदा भूतप्रृथग्भावं एकस्थमनुपश्यति। तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा।। (१३-३०).' म्हणजे एकाच मूलभूत अव्यक्त द्रव्यापासून भिन्नभिन्न अनेक व्यक्त पदार्थ प्रत्येकी कसकसे निर्माण झाले हे ज्याने समजते ते विज्ञान होय. यावरून सृष्टी आणि मानव यांच्या संबंधाचा शोध घेणे हे तत्त्वज्ञान आणि विज्ञान या दोघांचाही एकच विषय आहे, हे लक्षात येते. भारतात अध्यात्म-तत्त्वज्ञानाची परंपरा फार पुरातन आहे आणि ती अतिशय समृद्ध आहे. पण दुर्दैवाने ती तशी वैज्ञानिक अथवा भौतिक शास्त्राविषयी नाही. १७ व्या-१८ व्या शतकात युरोपियन शास्त्रज्ञांनी या क्षेत्रात इतकी प्रगती केली की, आपण त्यांच्या पासंगालाही पुरणार नाही. विज्ञानाची बैठक ही सर्वस्वी तर्क, अनुभव आणि इंद्रियगोचर पुराव्यांवर आधारित असते. जी गोष्ट इंद्रियाला गोचर नाही, प्रयोगशाळेत जिचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही ती मानावयाची नाही, असे विज्ञान म्हणते. १७ व्या- १८व्या शतकात भौतिकशास्त्राचे नवनवे शोध लागले. त्यामुळे धर्ममार्तंडांच्या श्रद्धामूलक प्रमेयांवर जोरात हल्ले होऊ लागले. प्रसिद्ध तत्त्वज्ञानी नित्शे यानेही यांसारखेच उद्गार काढले आहेत. आपल्याकडेही या विचारसरणीचा प्रभाव पडायला सुरुवात झाली. अशा रीतीने विज्ञानवादाला आधुनिक काळात पाश्चात्त्यांनी अतिशय प्रतिष्ठा मिळवून दिली. 'तत्त्वज्ञान चिकित्सा हा एक प्रकारे रिकामपणाचा उद्योग होय' हे आपल्याकडे थट्टेने म्हटले जाणारे वाक्य; हे थट्टेचे नव्हे तर गंभीरपणाचे आहे, हे सिद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांना तसे सिद्ध करणे सोपेही गेले. कारण तत्त्वज्ञानामध्ये प्रामुख्याने चर्चा असते ती अदृश्य अशा पदार्थांच्या ज्ञानाविषयी आणि विज्ञानामध्ये भर असतो तो प्रत्यक्षात दिसत असलेल्या पदार्थांविषयी. परंतु हा मुद्दा विशेष गांभीर्याने घेण्यासारखा नाही. तत्त्वज्ञान चिकित्सा करणे हे येऱ्यागबाळ्यांचे काम नसते. त्यासाठी सुसंगत आणि खोल विचार करणारेच लोक उपयोगी पडतात. भारतीय तत्त्वज्ञान आणि संस्कृती यांना किमान पाच हजार वर्षांची समृद्ध अशी परंपरा आहे. या विषयांचा विस्तृत विचार करणाऱ्या ग्रीकांपेक्षाही भारतीयांनी वरची पायरी गाठली आहे. भारतीय तत्त्वज्ञानाने पाश्चात्त्यही वेडावून गेले होते, एवढे सांगितले म्हणजे पुरे.

पान २ वरून

## बक्षीस

ही बातमी बाईंना मुख्याध्यापिका भाकरे बाईंनी सांगितली. लगेच साने बाईंनी अथर्वला स्टाफ रूममध्ये बोलावले आणि तुला बालश्री पुरस्कार प्राप्त झाला ही बातमी दिली. अथर्वच्या आनंदाला पारावरच उरला नाही. कधी एकदा घरी जातो आणि आई-बाबांना सांगतो, असं त्याला झालं. शाळा सुटली आणि घरी अथर्व पोहोचला तेव्हा सगळ्यांना त्याने या पुरस्काराबद्दल सांगितले. आई, बाबा, आजींनी त्याचे कौतुक केले; कारणही तसेच होते. हा पुरस्कार काही साधारण नव्हता. दिल्लीला राष्ट्रपती भवनात राष्ट्रपतींच्या हस्ते तो पुरस्कार मिळणार होता. २५ जानेवारी जवळ आली.

दिल्लीला जाण्यासाठी रिझर्व्हेशनमध्ये एक पालक आणि एक शिक्षक व पुरस्कारप्राप्त करणारा विद्यार्थी अशी सोय होती. साने बाईंना जाण्याची परवानगी मिळाली. अथर्व व त्याची आई सोबत येणार होती. मात्र, साने बाईंच्या मनाचा मोठेपणा काय म्हणावा. त्यांनी अथर्वला सांगितले की, ''तू, तुझी आई आणि बाबांना घेऊन जा पुरस्कार सोहळ्याला. मी मार्गदर्शन केले असले, तरी हा सोहळा तुझ्या आई-बाबांनी अनुभवावा, असं मला वाटतं.'' फारच तामझाम होता त्या सोहळ्याचा. त्याला शिक्षणासाठी शिष्यवृत्तीही मिळणार होती. अथर्वसाठी तर हा क्षण सुवर्णक्षण ठरला. अत्यंत दिमाखदार सोहळा झाल्याची बातमी अथर्वने साने बाईंना शाळेत येऊन सांगितली. त्याच्या या यशाचा शाळेतही गौरव करण्यात आला.

अथर्वचे बाबा साने बाईंना धन्यवाद देत म्हणाले की, ''तुमच्या ऐवजी मी या सोहळ्याला उपस्थित राहू शकलो. वडील म्हणून मला तो सोहळा अनुभवता आला.'' नियती, दैव काय असते कुणास ठाऊक? पण हा पुरस्कार मिळाल्यानंतर एक दिवस अथर्वचा साने बाईंना फोन आला की, त्याचे बाबा हे जग सोडून गेले. बातमी वाईट होती पण... साने बाईंनी परमेश्वराचे मनोमन उपकार मानले ते यासाठी की, पुरस्कार सोहळ्याला त्या स्वतः न जाता आईसोबत अथर्वच्या बाबांना पाठविण्याचा निर्णय देण्याची क्षमता त्या क्षणी परमेश्वराने त्यांना दिली. आज अथर्व सीए झाला अन् एक प्रथितयश कवी अथर्व देशपांडे म्हणून सुप्रसिद्धही झाला. याचे सारे श्रेय तो सानेबाईंनाच देतो.

पान ३ वरून

## इच्छामरणाच्या निमित्ताने...

माझे जीवनकार्य पूर्ण झाले आहे. आता शरीर ठेवण्याचे काही प्रयोजन नाही. त्या निर्णयात कोठेही अस्थिरता नव्हती. जे ठरवले ते पूर्ण विचारांती. उद्देश पूर्ण झाल्याची मनोमन खात्री म्हणून त्यांच्या कृतीला 'आत्मार्पण' असे गौरवाने म्हणता येईल. विनोबांनी आयुष्यभर गीता आणि उपनिषदांचा फक्त अभ्यासच केला असे नसून त्यातील तत्त्वज्ञान ते प्रत्यक्ष जगले. त्यांचा ऋषितुल्य जीवनपट म्हणजे अभ्यासातील सातत्य, अखंड चिंतन, त्यानुसार साधना, सेवा आणि त्याग. 'वासांसि जीर्णानि यथाविहाय' म्हणजे जीर्ण वस्त्र सहजपणे काढून टाकावे तसे त्यांनी प्रायोपवेशन करून तृप्त मनाने, आनंदाने, शांततेने आणि सहजतेने देहत्याग केला. पण सावरकर आणि विनोबांच्या जीवन समारोपात किंचित फरक सांगता येईल; तो म्हणजे सावरकरांच्या निर्णयात कर्तव्यपूर्तीचे समाधान, तर्कबुद्धी अधिक जाणवते तर विनोबांच्या निर्णयात विरक्ती लक्षात येते.

**५) समाधी :** हर्ष खेद ते मावळले अशा अवस्थेनंतर, कर्मफळांना त्यजून, पूर्ण शांततेनंतर, आत्मसाक्षात्कार, मोक्षप्राप्तीकरिता 'जन्माचे तोडिती बंध पावती पद अच्युत-' नश्वर शरीराचे बंधन टाकून चैतन्यात विलीन होणे. योगशास्त्रातील ही सर्वोच्च अवस्था आहे. याची तुलना वरीलपैकी कशाशीही होऊ शकत नाही. अर्जुन विषाद, आत्महत्या.

**भीष्मांचे इच्छामरण :** धर्मयुद्धाच्या सुरुवातीला अर्जुन मानसिकदृष्ट्या खचला. त्याचा शस्त्रत्याग म्हणजे जातिवंत क्षत्रीयाची आत्महत्याच. त्याच युद्धभूमीवर भीष्मांनी मात्र शरशय्येवरील वेदना सोसत अनुकूल वेळेची वाट बघत स्थिरबुद्धीने इच्छामरण स्वीकारले. दयामरण म्हणजे न्यायालयाच्या संमतीने, वैद्यकीय मार्गाने, वेदनारहित इच्छामरण. काही दिवसांपूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने विशिष्ट परिस्थितीत याकरिता अनुमती दिली आहे.

## चैत्र

उंच उभारली गुढी
नववर्षाचे स्वागत
लागे चैत्राची चाहुल
दाटे आनंद मनात
नवी पालवी फुटली
झाडे हिरवी नटती
आम्र मंजिऱ्याचा गंध

बाळ कैऱ्या ही झुलती
रामनामाचा गजर
दुदु आसमंती
आली गौराई माहेरा
झुले पाळण्यावरती

शुभ्र मोगरा फुलला
मंद गंध दरवळे
सख्या मैत्रिणी जमल्या
सुख लाभते आगळे

अनुजा तातावार

## चिऊताई...!

चिऊताई... तू आल्याशिवाय
आम्ही लहानपणी जेवत नव्हतो
आम्ही बनलो तुझे मारेकरी आता
मात्र तुझीच वाट पाहतो ।१।।

तुझ्या किलबिलाटाचा आनंद
ज्याने ऐकला होता खरा तो
शहरामध्ये राहून आता शोधू
लागलाय चित्रात चेहरा ।२।।

आमच्या ऐटदार बंगल्यासाठी
घरट्यांची झाडे कशी तोडली
उभ्या केल्या सिमेंटच्या भिंती
त्यातही जागा नाही सोडली।३।।

पूर्वी मातीच्या घरांमध्ये तुझ्या
घरट्याची होती हमी आता मोबाईल
टॉवरच्या लहरींनं तुझी 'जात'च
होतीय कमी ।।४।।

तुझ्या चिवचिवाटासाठी जो मानं
सारे प्रयत्न करूया आपल्या
चिऊताईच्या घराला चला थोडी
जागा देऊ या...।।५।।

संतोष ह. राऊत



# रेवडी आवडे सर्वांना...

समाजभान **विजय कुलकर्णी**

**आजवर महिलांना मोफत बसप्रवास, दरमहा 'सन्मान निधी'अंतर्गत दिली जाणारी ठरावीक रक्कम अशा रेवडीवाटपामुळे, राज्यांच्या आर्थिक तिजोरीवर ताण आला. पण, तामिळनाडूच्या द्रमुक सरकारने आता रेवड्यांच्या यादीत वस्तूखरेदीच्या कुपन्सची भर घालून, महिलांची मते पदरात पाडण्याचा नवीन पायंडा पाडला आहे, जो राज्याच्या अर्थस्वास्थ्याच्या दृष्टीने सर्वस्वी घातक ठरू शकतो.**

आ पण संपूर्ण भारतात कोणत्या प्रकारची संस्कृती विकसित करीत आहोत? जर तुम्ही सकाळपासून मोफत जेवण द्यायला सुरुवात केली, त्यानंतर मग मोफत सायकल, मग मोफत वीज आणि आता आपण अशा टप्प्यावर पोहोचलो आहोत, जिथे आपण लोकांच्या खात्यात थेट रोख रक्कम हस्तांतरित करतो. कल्याणकारी व्यवस्थेचा भाग म्हणून, जे पैसे देऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी तरतूद करणे हे समजण्यासारखे आहे. पण, जर तुम्ही पैसे देऊ शकणारे आणि न देऊ शकणारे यांच्यात कोणताही भेद न करता वाटप केले; तर सगळेच कठीण आहे. अशी काही मुले आहेत, ज्यांना शिक्षण परवडत नाही. अशा वेळी राज्याने ते उपलब्ध करून दिलेच पाहिजे. ते राज्याचे कर्तव्यच आहे. पण, जे श्रीमंत आहेत, त्यांच्यासाठी कोणतीही मोफत गोष्ट आधी त्यांच्याच खिशात जाते.

राज्यांनी या धोरणात्मक चौकटींचा पुनर्विचार करण्याची हीच योग्य वेळ नाही का? असा परखड सवाल सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी गेल्याच वर्षी मोफत वीजवाटपासंबंधीच्या प्रकरणावर तामिळनाडूच्या स्टॅलिन सरकारला विचारला होता. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने कान टोचल्यानंतरही द्रमुक सरकारने यंदाच्या आपल्या जाहीरनाम्यात रेवडीवाटपालाच प्राधान्य दिल्याचे दिसून आले.

यंदा तामिळनाडूतील द्रमुक सरकारने 'महिला सन्मान निधी'बरोबरच आता महिलांना घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी अथवा जुन्या वस्तू देऊन नवीन विकत घेण्यासाठी आठ हजार रुपयांचे कुपन्स देण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे या योजनेचा उद्देश महिला सशक्तीकरणाचा नसून, महिलांची एकगठ्ठा मते पदरात पडावी, हाच असल्याचे स्पष्ट होते. तामिळनाडूमधील २३४ विधानसभा मतदारसंघांसाठी दि. २३ एप्रिल रोजी एका टप्प्यात मतदान होऊ घातले आहे. त्या पार्श्वभूमीवर रविवारी द्रमुक सरकारने जाहीरनामा प्रसिद्ध केला. द्रमुकच्या जाहीरनाम्यात महिला कल्याणाच्या नावाखाली रेवड्यांची उधळण होणार, हे अपेक्षित होते आणि झालेही तसेच. 'कलाइग्नार मगलिर उरिमई थोगाई योजना' अर्थात, 'लाडकी बहीण' योजनेप्रमाणेच, आता तामिळनाडूच्या महिलांना महिन्याला एक हजार रुपयांऐवजी दोन हजार रुपये खात्यात प्राप्त होतील. याच्या लाभार्थी ठरणार आहेत, तामिळनाडूतील तब्बल १.३४ कोटी महिला. आता तामिळनाडूमधील महिला मतदारांची संख्या आहे, २.८९ कोटी. त्यापैकी १.३४ कोटी महिला लाभार्थी म्हणजे, जवळपास ४६ टक्के महिलांना या योजनेचा थेट लाभ मिळणार. या जुन्याच 'महिला सन्मान योजने'ची रक्कम वाढवून एवढ्यावरच स्टॅलिन सरकार थांबले नाही, तर त्यांनी 'इल्लाथु अरसी' नामक आणखीन एका योजनेची यामध्ये भर घातली. या शब्दाचा अर्थ होतो 'घरातली राणी.' तर या योजनेनुसार, आयकराच्या कक्षेत नसणार्‍या महिलांना एकदाच आठ हजार रुपयांचे कुपन्स सरकारतर्फे दिले जातील. हे कुपन्स घेऊन महिला आपल्या जवळच्या कोणत्याही दुकानातून इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी करू शकतात. म्हणजे बघा, निवडणुकीपूर्वी महिलांना साड्या, मिक्सरसारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे छुपे वाटप केले जाते. तसे करताना राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आढळल्यास तो आदर्श आचारसंहितेचा भंग ठरतो व निवडणूक आयोगाकडून कारवाईदेखील होऊ शकते. म्हणूनच, मग द्रमुकने यावर 'स्मार्ट' मार्ग शोधत, आम्हाला मतदान केले, तर निवडणुकीनंतर ही कुपन्स मिळतील, असे आगाऊ आमिषच महिलावर्गाला दिले. पण, तामिळनाडूसाठी असे रेवड्यांचे राजकारण नवीन नाही.




२००६ साली करुणानिधींनी सर्वप्रथम दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना मोफत रंगीत टीव्हीचे आश्वासन दिले. नंतर अण्णाद्रमुकच्या शासनकाळात जयललिता यांनीही मोफत मिसर, ग्राइंडर, पंखे, मंगळसूत्रासाठी सोने, मोफत लॅपटॉप, गणवेश, विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके, ग्रामीण कुटुंबांसाठी शेळ्या- गायी आणि एका ठरावीक वापराच्या मर्यादेपर्यंत वीजही मोफत दिली. त्यावेळी तर पात्रतेचे निकषसुद्धा शिथिल करण्यात आले किंवा पूर्णपणे रद्द करण्यात आले.

त्याचीच पुनरावृत्ती आता तामिळनाडूत कुपन्सच्या योजनेच्या माध्यमातून होऊ घातली आहे. म्हणजे द्रमुकची तामिळनाडूमध्ये पुन्हा सत्ता आलीच, तर अशा इलेक्ट्रॉनिक दुकानांसमोर महिलांच्या लांबच लांब रांगा लागतील. त्यातच ही योजना राबविताना पुन्हा पात्र महिलांची निवड करणे, दुकानदारांना विश्वासात घेणे, अशी बनावट कुपन्स तयार होण्यापासून रोखणे, असे नसते उद्योग करण्यात प्रशासनाचा ऊर्जा, वेळ आणि पैसा खर्ची पडणार. याव्यतिरिक्त महिलांना मोफत बसप्रवास, ज्येष्ठ महिलांना दोन हजार, दिव्यांगांना दीड हजार साहाय्यता निधी, ३६ लाख विद्यार्थ्यांना मोफत लॅपटॉप, 'मुख्यमंत्री नाश्ता योजने'चा इयत्ता पाचवीपासून ते आठवीपर्यंत विस्तार, पाच लाखांपर्यंत 'मुख्यमंत्री आरोग्य विमा योजने'अंतर्गत सरकारी व खासगी रुग्णालयात मोफत उपचार, १५ लाख सरकारी नोकर्‍या अशा आश्वासनांची जनतेवर खैरातच स्टॅलिन यांनी केली. त्यामुळे 'फुकट ते पौष्टिक' या न्यायानुसार, तामिळनाडूतही रेवडीवाटपाला जनतेची पसंती मिळण्याची शक्यताच अधिक. म्हणूनच तर स्टॅलिन या योजनेला निकालाआधीच 'गेमचेंजर' ठरवून मोकळे झाले.

सत्ताधारी भारी, मग विरोधी का बरं राहतील माघारी, म्हणून अण्णाद्रमुकनेही आपल्या जाहीरनाम्यात प्रत्येक कुटुंबाला दहा हजार रुपये सिलिंडरसाठी अर्थसाहाय्य, महिलांना दोन हजार रुपये मासिक रक्कम देण्याबरोबरच पुरुषांसाठीही बसमध्ये मोफत प्रवासाची घोषणा केली. अशी ही रेवडीवाटपाची केविलवाणी चढाओढ!

एकीकडे राज्यांचे घटते उत्पन्नाचे स्रोत आणि दुसरीकडे रेवड्यांचे हे वाढते इमले, असे हे घातक अर्थसमीकरण. राज्याचे कर्ज ते 'जीएसटीपी' (ग्रॉस स्टेट डोमेस्टिक प्रॉडक्ट) गुणोत्तर २० टक्क्यांपेक्षा कमी असावे, असे 'एफआरबीएम' (फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी बजेट मॅनेजमेंट) कायदा सांगतो. पण, तामिळनाडूमध्ये हे गुणोत्तर सध्या २६ टक्के इतके आहे. २०२४-२५ मध्ये तामिळनाडूतील मोफत योजना आणि कल्याणकारी अनुदानांचा खर्च अंदाजे ५२ हजार, ६०३ कोटी रुपये असून, राज्याची थकबाकी ९.३० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. त्यामुळे मतानुनयासाठी आज गोड वाटणार्‍या याच रेवड्यांमुळे, भविष्यात राज्याची अवस्था कवडीमोल होऊ नये, यासाठी कडक कायदेमर्यादा आता आवश्यकच!



# तुका म्हणे ऐसा नरा!

विवेचन **भागा वरखडे**

**अलिकडच्या काळात नगर आणि नाशिक जिल्ह्यात दाखल झालेले गुन्हे तसेच देशभरात विविध कथित गुरूंवर झालेले गंभीर आरोप ही चिंतेची बाब आहे. हे प्रकार केवळ व्यक्तींच्या पतनाचे निदर्शक नसून समाजातील अंधश्रद्धा आणि विवेकहानीचे द्योतक आहेत. संत तुकारामांनी अभंगांमध्ये संतांचे वर्णन केले आहे. त्यात न बसणाऱ्या आणि संतांचा मुखवटा घालून समाजाला फसवणाऱ्यांचे काय केले पाहिजे, हेही सांगितले आहे...**

अध्यात्म म्हणजे दिखावा, संपत्ती, प्रसिद्धी नव्हे; तर आत्मशुद्धी, नैतिकता आणि इतरांप्रती करुणा. या मूल्यांपासून दूर जाणारा 'संत' असूच शकत नाही. आजची वेळ ही केवळ निषेधाची नाही, तर परिवर्तनाची आहे. समाजाने ठामपणे ठरवले पाहिजे की, अशा प्रवृत्तीला स्थान नाही. कायदा, प्रशासन, माध्यमे आणि सर्वसामान्य नागरिक हे सर्व मिळून या समस्येला सामोरे गेले, तरच खऱ्या अर्थाने न्याय आणि नैतिकता प्रस्थापित होईल. अन्यथा, 'संत' या पवित्र शब्दाची किंमत उरणार नाही आणि समाजाचा विश्वास कायमचा ढासळेल.

आधुनिक माध्यमांच्या प्रसारामुळे 'महाराज' किंवा 'बाबा' यांची प्रतिमा मोठ्या प्रमाणावर उभी केली जाते. सोशल मीडिया, टीव्ही चॅनेल्स आणि मोठ्या प्रमाणावर होणारे धार्मिक कार्यक्रम यामुळे या व्यक्तींना प्रचंड लोकप्रियता मिळते; पण या लोकप्रियतेच्या आड अनेकदा अनैतिक कृत्ये लपलेली असतात. महिलांवर अत्याचार, आर्थिक फसवणूक, मानसिक शोषण यासारखे गंभीर आरोप समोर येत आहेत. काही प्रकरणांमध्ये न्यायालयांनी दोष सिद्धही केले आहेत, जे अत्यंत धक्कादायक आहे. महिलांच्या संदर्भात ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. मनःशांती, समाधान, आध्यात्मिक आधार शोधण्याच्या प्रयत्नात अनेक महिला अशा कथित गुरूंच्या संपर्कात येतात. भावनिक, मानसिक किंवा कौटुंबिक अडचणींमुळे त्या अशा गुरूंवर सहज विश्वास ठेवतात; पण या विश्वासाचा गैरफायदा घेतला जातो.

'आशीर्वाद', 'उपचार', 'साधना' अशा नावाखाली त्यांचे शोषण केले जाते. ही बाब केवळ वैयक्तिक शोकांतिका नसून समाजाच्या नैतिक अधःपतनाची लक्षणे आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये दिसणारा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राजकीय आश्रय. अनेक कथित गुरूंना स्थानिक तसेच राज्यस्तरीय नेत्यांचा पाठिंबा मिळतो. त्यांच्या कार्यक्रमांना राजकीय उपस्थिती असते, निधी उपलब्ध करून दिला जातो आणि त्यांच्या विरोधातील तक्रारींकडे दुर्लक्ष केले जाते. यामुळे अशा व्यक्तींचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांचे गैरप्रकार अधिक बिनधोक सुरू राहतात. धर्म आणि राजकारण यांचे हे अयोग्य मिश्रण समाजासाठी घातक ठरते. बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांच्या संदर्भात दोष सिद्ध होण्याचे प्रमाण कमी असल्याचेही दिसून येते. यामागे अनेक कारणे आहेत. पीडितेवर येणारा सामाजिक दबाव, पुराव्यांचा अभाव, दीर्घकालीन न्यायप्रक्रिया आणि प्रभावशाली आरोपींचा दबाव यामुळे अनेक महिला तक्रार दाखल करण्यासही घाबरतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी अधिक कडक आणि संवेदनशील असणे आवश्यक आहे. या पृष्ठभूमीवर समाजाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. संतांनी कधीही अंधश्रद्धेला प्रोत्साहन दिले नाही; उलट त्यांनी प्रश्न विचारण्याची, सत्य शोधण्याची शिकवण दिली. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला 'देव' मानणे, त्याच्यावर अंधविश्वास ठेवणे हे आपल्या थोर परंपरेच्या विरोधात आहे. शिक्षण आणि जागृती हा यावरील सर्वात प्रभावी उपाय आहे. समाजातील प्रत्येक घटकाने, विशेषतः महिलांनी, स्वतःच्या अधिकारांची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. कोणत्याही आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी जाताना विवेकबुद्धी वापरणे, प्रश्न विचारणे आणि शंका उपस्थित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे तसेच माध्यमांनीही जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. केवळ प्रसिद्धीच्या मोहापायी अशा व्यक्तींना प्रोत्साहन देणे टाळले पाहिजे.



सरकार आणि प्रशासनाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. अशा प्रकरणांमध्ये तत्काळ आणि निष्पक्ष चौकशी होणे, दोषींवर कठोर कारवाई करणे आणि पीडितांना संरक्षण आणि न्याय मिळवून देणे ही त्यांची जबाबदारी आहे. तसेच धार्मिक संस्थांच्या कार्यपद्धतीवर काही प्रमाणात नियंत्रण ठेवणे, पारदर्शकता वाढविणे आणि जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. संतांच्या शिकवणीचा अर्थ केवळ भजन- कीर्तनात नाही, तर दैनंदिन जीवनात नैतिकता, प्रामाणिकपणा आणि सहिष्णुता यांचा अवलंब करण्यात आहे. समाजाने या मूळ मूल्यांकडे परत जाणे आवश्यक आहे. अन्यथा, आध्यात्मिकतेच्या नावाखाली सुरू असलेली ही अधोगती पुढील पिढ्यांसाठी घातक ठरेल. आजची वेळ ही जागृतीची आहे.

अंधश्रद्धा आणि व्यक्तिपूजेपासून दूर राहून विवेक आणि सत्याचा मार्ग स्वीकारण्याची. आपल्या परंपरेचा खरा वारसा जपायचा असेल, तर 'मद, मोह, मत्सर' यांच्यापासून दूर राहण्याबरोबरच 'अज्ञान, भीती आणि अंधविश्वास' यांच्याशीही लढा देणे आवश्यक आहे. वारकरी संप्रदायाची परंपरा ही महाराष्ट्राच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा कणा मानली जाते. 'मद, मोह, मत्सर यांपासून दूर राहणे' हा वारकरी तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. साधेपणा, समता, नामस्मरण आणि सामूहिकतेतून व्यक्त होणारे अध्यात्म हे या परंपरेचे वैशिष्ट्य आहे.

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यासारख्या संतांनी या परंपरेला प्रबोधनाची धार दिली. त्यांच्या अभंगांमधून आणि कीर्तनातून समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, अन्याय यावर प्रखर प्रहार झाला. म्हणूनच वारकरी परंपरा ही केवळ धार्मिक चळवळ नसून सामाजिक परिवर्तनाची एक मोठी लाट होती; परंतु आजच्या काळात या परंपरेच्या नावाखाली काही विकृत प्रवृत्ती डोके वर काढताना दिसतात. वारकरी संप्रदायाचा मूळ संदेश जिथे आत्मसंयम, विवेक आणि नैतिकता यांवर आधारलेला आहे, तिथे काही कथित गुरू भोगवृत्ती, सत्तेची लालसा आणि व्यक्तिपूजेला खतपाणी घालताना दिसतात. गेल्या काही वर्षांमध्ये देशभरात घडलेली प्रकरणे पाहिली की, स्वतःला संत-महंत म्हणाऱ्यांचे पाय मातीचे असल्याचे दिसते.

कुंटणखाने चालवल्याच्या थाटात आश्रम चालवण्याचे प्रकार दिसले. त्याग वृत्तीऐवजी भोगवृत्ती आणि विलासी वृत्ती फोफावली. अनेकदा मधुर वाणीखाली काय दडलेले असते, हे लवकर कळत नाही. त्यातही भक्त परिवार धूर्त गुरूंच्या प्रेमात इतका आंधळा झालेला असतो की बलात्काराचे गुन्हे दाखल झाल्यानंतरही भक्त आरत्या ओवाळण्याचे कमी करत नव्हते. अलिकडच्या काळात महाराष्ट्रासह देशभरात उघडकीस येणाऱ्या काही घटनांनी समाजमन हादरवून सोडले आहे. अध्यात्म, साधना, कीर्तन, प्रवचन या पवित्र संकल्पनांच्या आड लपून काही कथित गुरूंनी उभारलेले साम्राज्य आर्थिकच नाही, तर नैतिक अधःपतनाचेही प्रतीक बनले आहे.

नाशिक जिल्ह्यातील अशोक खरात याच्याविरोधात महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचे आरोप, नगर जिल्ह्यातील यशवंत एकनाथ थोरात उर्फ गुंजाळ यांच्यावर अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केल्यामुळे दाखल झालेला गुन्हा आणि या सर्वांमध्ये कथित राजकीय-सामाजिक आश्रयाची चर्चा या सगळ्यांनी एक गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे, तो म्हणजे आपण नेमके कुठे चाललो आहोत? खरात याने आध्यात्मिक मार्गदर्शनाच्या नावाखाली महिलांशी गैरवर्तन केल्याचे आरोप झाले आहेत.

विशेष म्हणजे, त्याच्या ट्रस्टमधील काही विश्वस्त आणि प्रभावशाली व्यक्तींशी असलेल्या त्याच्या कथित संबंधांमुळे या प्रकरणाने अधिकच वादळी स्वरूप धारण केले. या संदर्भात काही राजकीय नावेही समोर आली. खरातचे सर्वपक्षीय राजकारण्यांशी संबंध होते. त्याच्याकडे सापडलेल्या ५८ व्हिडीओंमधून आता कोणत्या आणि किती महिलांवर अत्याचार झाले, यावर आता प्रकाश पडेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत घेतलेली भूमिका स्वागतार्ह आहे.

तेजस्विनी सातपुते यांच्या अध्यक्षतेखालील विशेष तपास पथक आता त्याचा तपास करणार आहे; मात्र एकूणच अशा प्रकरणांमागे दडलेल्या वृत्तींचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे.

## ऋतुराज वसंत

असा हा ऋतुराज वसंत
विरक्त चाफा उभा दूरवरी
एकटाच फक्त श्वेत फुलांचा भार
लेऊनी भासे अव्यक्त...
गंधाळलेला मोगरा अंगणी
फुलतो सहर्ष विठुचरणी तो सजतो
तेव्हा होतो परिस स्पर्श...
लवथवला गुलमोहर सर्वांगी
वसंत राजा जसा बहरला
तप्तदाह सोसुनी निशिदिनी
योग तपस्वी भासे मजला...
केशरी पिवळा पळसं सांगतो
रंग प्रे ाचे जणु उधळतो
मना भुलवतो, कानी गुंजतो
कैफ गुलाबी लेऊन फुलतो...
आरक्त तो आम्र ेहर
गर्भतेजाने लवला कुठवर
पानोपानी लपवून ठेवतो
स्वगंधाचा सुगंधी दरवळ...
निंबमोहरही देई गारवा
निर्मोहाचा जणु इशारा
कारुण्याचा जणु विसावा
वाटे तो वृक्ष संत असावा...
असा हा ऋतुराज वसंत सजला
नवचैतन्याचा चैत्र फुलला
मनी मानसी निरामयतेचा
शुभ संदेश घेऊनी आला...

**अमरजा परांजपे-ढुमे**

## पानगळ

पानगळ म्हणजे निसर्गाची किमया
ओलावत राहते डोळ्यात अगदी खोलवर
पापण्यांना ओल येईस्तोवर...
झाडावरची पाने सरसरत खाली येतात
अन् झाडे ओकीबोकी होतात
अगदी एकटी, पोरकी झाल्यासारखी...
निष्पर्ण झाड बघताना मनाची घालमेल
होते प्रत्येक पानाच्या अस्तित्वाची
जाणीव होते एक अस्वस्थता पसरते
सगळीकडे खुडलेल्या बहरासारखी...
ऋतू संपलेला असतो झाडाने नवपालवी
धारण करायला सुरुवात केलेली असते
ही नवपालवी अलवारपणे मनात चाल-
लेली पानगळ आवरून घेते
आणि शिकवून जाते आयुष्याचे सार..
पिकलेलं पान हे गळणारच आणि
त्याजागी नवीन जीव जन्माला येणार
लवलवणाऱ्या पानाप्रमाणे
कोवळा, निरागस...

**अलका माईणकर**



# भविष्यासाठी धोक्याची घंटा

वेध विजय जोशी कर्नल (नि.)

अमेरिकेचे व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानमधील हस्तक्षेप हे जागतिक राजकारणातील अत्यंत महत्त्वाचे आणि तितकेच वादग्रस्त विषय आ-हेत. या युद्धांनी अमेरिकेचे लष्करी सामर्थ्यच नाही, तर त्यांच्या परराष्ट्र धोरणातील मर्यादाही जगासमोर आणल्या. अमेरिकेच्या इतिहासातील ती दोन सर्वात प्रदीर्घ युद्धे आहेत. शीतयुद्धकालीन साम्यवाद रोखणे आणि २१ व्या शतकातील दहशतवाद संपवणे या उद्दिष्टांनी अमेरिका या संघर्षात उतरली. मात्र, भौगोलिक आव्हाने, स्थानिक गनिमी कावा आणि राजकीय अस्थिरतेमुळे अमेरिकेला या दोन्ही युद्धांमधून अपेक्षित यश न मिळताच माघार घ्यावी लागली.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका जगातील महासत्ता म्हणून उदयाला आली. स्वतःची लोकशाही मूल्ये आणि हितसंबंध जपण्यासाठी अमेरिकेने जगभरातील विविध संघर्षांमध्ये हस्तक्षेप करण्याचे धोरण अवलंबले. एक देश साम्यवादी झाला तर शेजारील देशही साम्यवादी होतील, या भीतीपोटी १९५५ मध्ये व्हिएतनाममध्ये साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी अमेरिका युद्धात उतरली. दक्षिण व्हिएतनाममध्ये लोकशाही सरकार टिकविणे हा त्यावेळी युद्धाचा उद्देश असल्याचे अमेरिकेने जगाला भासवले. २००१ मध्ये ९/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी आणि 'अल-कायदा'चा नायनाट करण्याचे निमित्त साधून अमेरिकेने अफगाणिस्तानवर आक्रमण केलेले आपण पाहिले. मूळ उद्देश तालिबान राजवट संपवून लोकशाही प्रस्थापित करणे हा होता. ही दोन्ही युद्धे सुरुवातीला लष्करीदृष्ट्या यशस्वी वाटली तरी, काळानुरूप ती अमेरिकेसाठी आर्थिक आणि मानवी दृष्टीने प्रचंड महागडी ठरली. असा हा अमेरिकेच्या अपयशाचा पाढा जगभर वाचला जातो. स्थानिक जनतेचा विरोध आणि राष्ट्र उभारणीमधील अपयश यामुळे अमेरिकेला या युद्धांमध्ये ऐतिहासिक पराभवाचा सामना करावा लागला. व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानच्या अनुभवानंतर अमेरिकेने काही धोरणात्मक बदल केले असले, तरी काही चुकांची पुनरावृत्ती होताना दिसत आहे. त्यामुळे मागील युद्धांमधून अमेरिकेने काहीच शिकवण घेतली नाही का, असा प्रश्न संरक्षणविषयक अभ्यासकांना पडणे क्रमप्राप्त आहे. व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानप्रमाणे लाखो सैनिक जमिनीवर उतरवण्याऐवजी अमेरिका हवाई हल्ले, नौदल आणि विशेष दलांचा अधिक वापर करीत आहे. याला लाईट फूटप्रिंट धोरण म्हणजे प्रत्यक्ष जमिनीवरील युद्ध टाळून स्वतःच्या सैनिकांची जीवितहानी टाळणे म्हणतात. लष्करी ताकदीने शत्रूला हरवणे सोपे असते, पण तिथे स्थिर लोकशाही किंवा भ्रष्टाचारमुक्त सरकार स्थापन करणे अवघड असते, जे अमेरिकेला आजवर जमलेले नाही. इराकमधील सध्याची राजकीय अस्थिरता हे याचेच उदाहरण आहे. अमेरिकेचा इराणवरील हल्ला आणि एकूणच मध्यपूर्वेतील सध्याचा हस्तक्षेप पाहता आणि सध्याच्या जागतिक स्थितीचा विचार करता अमेरिकेसाठी ही परिस्थिती खरोखरच गुंतागुंतीची आणि खर्चिक बनून पुन्हा एकदा गंभीर वळणावर आहे. अमेरिकेने नुकत्याच सुरू केलेल्या ऑपरेशन 'एपिक फ्युरी' मुळे लष्करी खर्च गगनाला भिडला आहे. काही अंदाजानुसार, या मोहिमेसाठी अमेरिका दररोज दीड ते दोन अब्ज डॉलर्स खर्च करत आहे. युद्धाच्या सुरुवातीच्या १२ दिवसांमध्येच सुमारे १६.५ अब्ज डॉलर्स खर्च झाले आहेत. इराणसोबतच्या तणावामुळे आणि होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे जागतिक तेलाचे भाव ११०-११५ डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचले आहेत. याचा थेट फटका अमेरिकन अर्थव्यवस्थेला बसत असून तिथे महागाई वाढली आहे. इराक, जॉर्डन, यूएईमधील अमेरिकन दूतावास आणि तळांवर वारंवार ड्रोन आणि मिसाईल हल्ले होत आहेत. अमेरिकेने आपल्या गैर-अत्यावश्यक कर्मचाऱ्यांना इराक सोडण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती आहे. परकीय सैन्याच्या उपस्थितीमुळे स्थानिक जनतेमध्ये निर्माण होणारा असंतोष आणि त्यातून उभे राहणारे सशस्त्र गट यांचा अंदाज घेण्यात अमेरिका अफगाणिस्तानप्रमाणेच पुन्हा एकदा कमी पडत असल्याचे दिसते. युद्ध सुरू करणे सोपे असते, पण ते कधी आणि कसे संपवायचे याची योजना ट्रम्प यांच्याकडे नसल्याचे टीकाकार मानतात.

थोडक्यात सांगायचे तर, अमेरिकेने तंत्रज्ञान आणि लष्करी डावपेचांमध्ये सुधारणा केली असली, तरी युद्धाचे मानवी आणि राजकीय परिणाम हाताळण्यात त्यांना अजूनही जुन्याच आव्हानांचा सामना करावा लागत आहे. लष्करी ताकद हे प्रत्येक समस्येवरचे उत्तर असू शकत नाही, ही व्हिएतनाममधील शिकवण आज २०२६ मध्येही अमेरिकेला तितकीच लागू पडते. व्हिएतनाम आणि अफगाणिस्तान या दोन्ही युद्धांचा इतिहास पाहिला, तर अमेरिकेने केलेल्या चुकांची एक ठरावीक पद्धत दिसून येते. इराणच्या संदर्भातही अमेरिका त्याच मार्गावर असल्याचे दिसते. व्हिएतनाममध्ये कम्युनिझमचा विरोध करताना अमेरिकेने तिथल्या राष्ट्रवादाकडे दुर्लक्ष केले. अफगाणिस्तानमध्येही स्थानिक टोळीयुद्ध आणि संस्कृतीचा अंदाज त्यांना आला नाही.

**व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानच्या युद्धातून बोध न घेता अमेरिकेने इराणवर केलेला हल्ला ही एक मोठी धोरणात्मक चूक ठरली. सत्तापरिवर्तनाचा उद्देश बाळगून पुकारलेल्या या संघर्षात अमेरिकेला प्रचंड आर्थिक हानी आणि मानवी जीवनाची मोठी किंमत मोजावी लागत आहे. यामुळे जागतिक राजकारणातील अमेरिकेचे वर्चस्व पुन्हा एकदा धोक्यात येऊ शकते. जगातील या महासत्तेसाठी हा धोक्याचा इशारा आहे.**

इराणमध्येही सत्तापालट करताना तिथल्या जनतेची धार्मिक आणि सांस्कृतिक अस्मिता अमेरिकेला भारी पडू शकते. त्यातच धार्मिक नेते आयातुल्ला खामेनाई यांच्या मृत्यूमुळे इराणी जनतेला मोठा धक्का बसला असून अमेरिकेबद्दल त्यांच्या मनात रोष आहे. युद्ध का लढले जात आहे आणि विजय म्हणजे नक्की काय, याची स्पष्ट व्याख्या या तिन्ही ठिकाणी अभावित दिसते. केवळ लष्करी ताकद वापरून लोकशाही लादता येत नाही, हा धडा अमेरिका विसरत आहे. व्हिएतनामला चीन आणि रशियाची मदत होती. अफगाणिस्तानमध्ये तालिबानला शेजारील देशांचे पाठबळ होते. इराणकडे स्वतःचे हिजबुल्ला आणि हमास यांचे मजबूत नेटवर्क आहे. त्यामुळे हे युद्ध केवळ एका देशापुरते मर्यादित न राहता संपूर्ण पश्चिम आशिया पेटले आहे. अफगाणिस्तानमधून २० वर्षांनंतर ज्या घाईने अमेरिकेला बाहेर पडावे लागले, तशीच परिस्थिती इराणमध्ये उद्भवू शकते. इराणची भौगोलिक रचना आणि प्रगत क्षेपणास्त्र प्रणाली पाहता या देशाला हलक्यात घेणाऱ्या अमेरिकेसाठी हे युद्ध व्हिएतनामपेक्षाही भीषण आणि प्रदीर्घ ठरू लागले आहे. व्हिएतनाम, अफगाणिस्तान आणि इराणच्या भौगोलिक आणि लष्करी परिस्थितीची तुलना केली, तर इराणसोबतचे जमिनीवरील युद्ध अमेरिकेसाठी आतापर्यंतचे सर्वात घातक आणि खर्चिक युद्ध ठरू शकते, हे आता दिसत आहे. व्हिएतनाम युद्धात अमेरिकेला सर्वात मोठा फटका तिथल्या घनदाट जंगलांमुळे आणि उत्तर व्हिएतनामी सैन्याच्या गनिमी काव्यामुळे बसला. अमेरिकेने अत्याधुनिक विमाने आणि बॉम्बचा वापर केला, पण जमिनीवर उतरलेले त्यांचे सैनिक प्रादेशिक रचनेची सखोल माहिती असलेल्या शत्रूला रोखू शकले नाहीत.

साध्या बोगद्यांच्या जाळ्याचा वापर करून व्हिएतनामी सैन्याने अमेरिकन सैन्याला अशा ठिकाणी खेचले, जिथे तंत्रज्ञान निकामी ठरले. या युद्धात ५८ हजारांहून अधिक अमेरिकन सैनिक मारले गेले. त्यामुळे अमेरिकन समाजात मोठा असंतोष निर्माण झाला. अफगाणिस्तानला साम्राज्यांची स्मशानभूमी म्हटले जाते आणि अमेरिकेलाही तब्बल २० वर्षांनंतर तिथून रिकाम्या हाती परतावे लागले. अफगाणिस्तानचा डोंगराळ भाग आणि दुर्गम खिंडी यामुळे अमेरिकन पायदळाला हालचाली करणे कठीण झाले. तालिबानने कधीही समोरासमोर युद्ध न खेळता आयईडी स्फोट आणि अचानक हल्ले करून अमेरिकन सैन्याला थकवून सोडले. आधुनिक शस्त्रास्त्रे असूनही, स्थानिक पाठबळ असलेल्या कट्टर सैनिकांसमोर अमेरिकेची हाय-टेक यंत्रणा अपयशी ठरली आणि त्यांना शेवटी माघार घ्यावी लागली. इराणची परिस्थिती व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानपेक्षा कितीतरी पटींनी वेगळी आणि कठीण आहे. इराणकडे सुसज्ज आणि प्रशिक्षित नियमित सैन्य आहे, स्वतःची प्रगत क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि नौदल आहे. इराणचा भूगोल हा नैसर्गिक किल्ल्यासारखा आहे, त्यांच्या सीमांवर उंच डोंगररांगा आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लष्करी टँक किंवा पायदळ घुसवणे अमेरिकेसाठी आत्मघातकी ठरू शकते. अमेरिकेने जमिनीवरून हल्ल्याचा प्रयत्न केल्यास, इराणचे बॅलिस्टिक मिसाईल्स मोठा विध्वंस करू शकतात. अमेरिकन सैन्य इराणमध्ये जमिनीवरून घुसले, तर त्यांना एका देशाच्या राष्ट्रवादाशीही लढावे लागेल. इराणची प्रॉक्सी युद्धाची क्षमता (उदा. हिजबुल्ला) अमेरिकेच्या पुरवठा साखळीवर आणि इस्रायल, सौदी अरेबियासारख्या मित्रराष्ट्रांवर भीषण हल्ले करीत आहेत. अशा युद्धात पहिल्या काही महिन्यांमध्येच अमेरिकेला हजारो सैनिकांच्या बलिदानाची तयारी ठेवावी लागेल. व्हिएतनाममध्ये झालेली जीवित हानी ही केवळ सुरुवात वाटू शकेल, इतका भीषण प्रतिकार इराणकडून होण्याची शक्यता आहे. इराणकडे अण्वस्त्रे असल्याचे कोणतेही पुरावे अमेरिकेने दिलेले नाहीत. तरीही अमेरिकेने या राष्ट्रावर हल्ला केला हे जगासमोर आल्यास प्रचंड टीका होईल. विनाशकारी शस्त्रास्त्रांचा खोटा दावा पुन्हा एकदा जगासमोर येईल. यामुळे अमेरिकेची विश्वासार्हता पूर्णपणे रसातळाला जाईल. या युद्धामुळे आर्थिक मंदी आणि इंधनटंचाईचा सामना करणाऱ्या देशांची प्रतिक्रिया अत्यंत तीव्र असेल. कच्च्या तेलाचे दर कडाडल्यामुळे या देशांच्या अर्थव्यवस्था कोलमडतील. त्यामुळे हे देश अमेरिकेच्या या निर्णयाचा केवळ निषेधच करणार नाहीत, तर जागतिक मंचावर अमेरिकेला एकतर्फी आणि बेजबाबदार राष्ट्र म्हणून घोषित करून निर्बंध लादण्याची किंवा राजनैतिक संबंध तोडण्याची मागणीही करू शकतात.

# 'लाल दहशती'वर अंतिम प्रहार!

वेधक प्रतिनिधी



देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी अनेक दशकांपासून सर्वांत मोठे आव्हान ठरलेला नक्षलवाद आता अखेरच्या टप्प्यात पोहोचल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या लोकसभेतील भाषणात 'हातात शस्त्र घेणार्यांना किंमत मोजावीच लागेल,' असा स्पष्ट इशारा देत नक्षलवादाच्या समूळ उच्चाटनाचा निर्धार पुन्हा एकदा अधोरेखित केला. बस्तर परिसरातून 'लाल दहशती'ची सावली जवळपास हटली असून, हा दुर्लक्षित परिसर आता विकासाच्या मार्गावर येत आहे, ही बाब दीर्घकालीन धोरण, सातत्यपूर्ण कारवाई आणि स्थानिक समाजाच्या सहभागातून साधलेले यश म्हणावे लागेल. तसेच हातात शस्त्र घेणार्यांना किंमत मोजावीच लागेल; पण शरण येणार्यांसाठी सरकारचे दरवाजे कायम खुले आहेत, हा अमित शाह यांचा संदेश केंद्र सरकारच्या धोरणाचा गाभा स्पष्ट करतो.

नक्षलवादाचा उगम समजून घेतल्याशिवाय त्याच्या समाप्तीचे महत्त्व लक्षात येणार नाही. १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी येथे जमीनविषयक अन्यायाविरोधात उभ्या राहिलेल्या चळवळीने पुढे हिंसक वळण घेतले. सामाजिक विषमता, वनवासी भागातील विकासाचा अभाव, प्रशासनाची अनुपस्थिती आणि स्थानिकांमध्ये असलेली असंतोषाची भावना या सर्वांचा उपयोग करून नक्षलवादाने आपले जाळे विस्तारले. क्रांतीच्या नावाखाली सशस्त्र संघर्षाला वैचारिक अधिष्ठान देण्यात आले. परंतु, ही विचारसरणी लवकरच हिंसा, भीती आणि खंडणीच्या चक्रात अडकली. या नक्षलवादाचे परिणाम अत्यंत भयावह असेच होते. हजारो निरपराध नागरिक, पोलीस, जवान यांचे हकनाक प्राण गेले. रस्ते, शाळा, आरोग्य केंद्रे उभारण्यास अडथळे निर्माण झाले. संपूर्ण प्रदेश विकासापासून वर्षानुवर्षे वंचित राहिला. वनवासी समाजाला विकासापासून दूर ठेवून राज्यशत्रूच्या विरोधात उभे करण्याचे षड्यंत्र रचले गेले.

शिक्षण, आरोग्य, रोजगार या मूलभूत गरजांऐवजी बंदुका आणि स्फोटकांचा विद्धवंसक मार्ग त्यांना दाखवण्यात आला. परिणामी, अनेक पिढ्या अंधारातच राहिल्या. या सगळ्या प्रक्रियेत काही राजकीय शक्तींनी नक्षलवादाकडे दुर्लक्ष केले किंवा त्याला अप्रत्यक्ष पाठबळ दिले. वर्षानुवर्षे या समस्येकडे केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणूनच पाहिले गेले. मात्र, त्याच्या मूळ कारणांवर ठोस उपाययोजना करण्यात काँग्रेसी काळात कुचराई झाली. डाव्या विचारसरणीच्या काही गटांनी नक्षलवादाला वैचारिक समर्थन दिले, तर काही राजकीय पक्षांनी या प्रश्नावर स्पष्ट भूमिका घेण्याचेच टाळले. त्यातच बाह्य शक्तींचे, विशेषतः पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणेचे आणि चीनकडून मिळणार्या वैचारिक प्रेरणेचे संदर्भ अधूनमधून पुढे येत राहिले. याच संदर्भात एका माजी नक्षलवाद्याचे विधान लक्षवेधी ठरते. नोटाबंदीने आमच्या फंडिंगला मोठा फटका बसला. रोख पैशावर चालणारी संपूर्ण यंत्रणा कोलमडली. या एका वाक्यातून नक्षलवादाच्या आर्थिक कणखरतेचा कणा किती कमकुवत होता, हे स्पष्ट होते. नक्षलवादाने वनवासी समाजाची दिशाभूल कशी केली, याची अनेक उदाहरणे आहेत. शाळा उभारण्यास विरोध, रस्ते बांधकामावर हल्ले, आरोग्यसेवकांना धमक्या या सर्वांतून विकासाच्या प्रत्येक प्रयत्नाला अडथळा आणण्यात आला. 'सरकार तुमचा शत्रू आहे,' असे विष कालवून स्थानिकांना मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यात आले. परिणामी, त्या भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि सामान्य माणूस दोन चक्रांमध्ये सापडला. एकीकडे नक्षलवाद्यांचा दबाव, तर दुसरीकडे प्रशासनाची मर्यादित उपस्थिती. अशा परिस्थितीत केंद्र सरकारने, विशेषतः गेल्या काही वर्षांत नक्षलवादाविरोधात बहुआयामी रणनीती अवलंबली. केवळ सुरक्षा कारवाई न करता विकास, संवाद आणि पुनर्वसन असा त्रिसूत्री कार्यक्रम राबविण्यात आला. बस्तरसारख्या भागात रस्ते, मोबाईल टॉवर्स, बँकिंग सुविधा, शाळा आणि आरोग्य केंद्रे उभारण्यात आली. सुरक्षा दलांनी अचूक माहितीच्या आधारे कारवाया करत नक्षलवाद्यांचे जाळे पद्धतशीरपणे कमकुवत केले. यासोबतच, शरणागती धोरण अत्यंत प्रभावी ठरले. शेकडो नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवून मुख्य प्रवाहात परतण्याचा मार्ग स्वीकारला. त्यांना आर्थिक मदत, कौशल्य प्रशिक्षण, निवास व्यवस्था आणि नवे आयुष्य देण्यात आले. अनेकांनी शेती, व्यवसाय किंवा नोकरीच्या माध्यमातून आपले जीवन पुन्हा उभे केले. ही केवळ धोरणात्मक यशोगाथा नसून, मानवी पुनर्वसनाचे उदाहरण आहे. गडचिरोलीतील एका माजी नक्षलवाद्याची कहाणी या प्रक्रियेचे जिवंत उदाहरण ठरते. काही वर्षांपूर्वी 'माडवी हिडमे' (नाव बदललेले) ही तरुणी नक्षल संघटनेत सक्रिय होती. जंगलात राहून बंदूक हातात घेतलेल्या हिडमेने अनेक वर्षे हिंसक कारवायांमध्ये सहभाग घेतला. मात्र, सततचा जीवघेणा संघर्ष, विकासापासून दूर राहणे आणि कुटुंबाशी तुटलेला संबंध, यामुळे ती मानसिकदृष्ट्या खचत गेली. शेवटी, राज्य सरकारच्या शरणागती धोरणाचा लाभ घेत तिने आत्मसमर्पण केले. आज ती गडचिरोलीतच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आपले आयुष्य नव्याने उभारत आहे. जंगलात आम्हाला सांगितले जायचे की, सरकार शत्रू आहे; पण प्रत्यक्षात शरण आल्यानंतरच कळले की, खरी मदत इथेच मिळते, हे तिचे शब्द नक्षलवादाच्या वास्तवाचे दर्शन घडवतात.

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशातील नक्षलवाद जवळपास संपुष्टात आल्याची संसदेतून केलेली घोषणा, ही फक्त सुरक्षा यंत्रणांची कामगिरी नसून, भारताच्या लोकशाहीची ती मोठी विजयगाथा आहे. बस्तरपासून गडचिरोलीपर्यंत विकास, संवाद आणि कठोर कारवाई यांच्या एकत्रित प्रयत्नातून 'लाल दहशती'च्या पसरलेल्या लांबच लांब सावल्या आता विरत चालल्या आहेत, त्याचेच हे द्योतक!**

महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातही अशाच प्रकारची सकारात्मक बदलाची प्रक्रिया दिसून येते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भागात प्रत्यक्ष जाऊन विकास प्रकल्पांना गती दिली. नक्षलवाद्यांच्या शरणागती कार्यक्रमांमध्ये सहभाग घेत, त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. परिणामी, एकेकाळी भीतीचे प्रतीक असलेला गडचिरोली जिल्हा आज औद्योगिक आणि विकासाच्या दृष्टीने नव्या शक्यता निर्माण करणारा जिल्हा ठरला आहे. छत्तीसगढमधील दंतेवाडा जिल्ह्यातील 'चिंतलनार' हे एकेकाळी नक्षल हल्ल्यांसाठी कुप्रसिद्ध असलेले गाव. आज त्याच भागात शाळा, रस्ते, मोबाईल नेटवर्क आणि बाजारपेठ उभी राहत आहे. स्थानिक युवक आता बंदूक न उचलता पोलीस दलात किंवा कौशल्य प्रशिक्षणातून रोजगाराकडे वळताना दिसतात. या सर्व यशामागे एक महत्त्वाचा घटक कारण होता आणि तो म्हणजे विश्वास. एका अधिकाऱ्याचे निरीक्षण येथे उल्लेखनीय ठरते; नक्षलवाद बंदुकीने नाही, तर विकास आणि विश्वासाने हरला. विकास हीच मोठी सुरक्षा आहे, हा सिद्धांत या प्रक्रियेत अधोरेखित झाला. तथापि, नक्षलवाद संपुष्टात आल्याची घोषणा हा अंतिम टप्पा असला, तरीही सावधगिरी बाळगणे आवश्यक.

वैचारिक पातळीवर हिंसेचे समर्थन, संस्थांवर अविश्वास निर्माण करणे आणि युवकांना दिशाभूल करणे, या माध्यमातून ही प्रवृत्ती वाढू शकते. त्यामुळे ग्रामीण भागातच नव्हे, तर शहरी पातळीवरही सजगता तितकीच आवश्यक. आज बस्तर, दंतेवाडा, गडचिरोली या नावांशी जोडलेली भीती हळूहळू कमी होत आहे. त्याजागी विकास, रोजगार आणि नव्या संधींच्या युगाचा हा नवा प्रारंभ आणि हीच या लढ्याची खरी कमाई. अनेक जवानांचे बलिदान, स्थानिक नागरिकांचे धैर्य आणि प्रशासनाचे सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या संगमातून हा बदल शक्य झाला. एकूणच अमित शाह यांच्या भाषणाचा अन्वयार्थ असा आहे की, भारताने आता सुरक्षा आणि विकास यांचा संतुलित मार्ग स्वीकारला आहे, तो केवळ बंदुकीच्या जोरावर नव्हे; तर विश्वास आणि विकासाच्या बळावर नक्षलवादावर विजय मिळवला. हा विजय टिकवण्यासाठी आणि पुढील पिढ्यांना हिंसेपासून दूर ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, हीच खरी कसोटी असेल. 'लाल दहशती'च्या सावल्या विरत असल्या, तरी त्यांचा इतिहास विसरून चालणार नाही. त्या चुका पुन्हा होऊ नयेत, यासाठी शासन, समाज आणि सुरक्षा यंत्रणा यांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचेच. जेव्हा राज्य आणि समाज यांच्यात विश्वास निर्माण होतो, तेव्हा दहशत दीर्घकाळ टिकू शकत नाही आणि भारताने हे पुन्हा सिद्ध केले. इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवले जाईल, अशा या कामगिरीबद्दल सरकारचे पुनश्च अभिनंदन!